मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

साहित्य संमेलन विशेषांक

फेब्रुवारी १९६०

★

मूल्य एक रुपया



श्री. ना. रा. शेंडे, अध्यक्ष,
विदर्भ साहित्य संमेलन, अधिवेशन २२ वे

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

संपादक :
पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

युगवाणी

संमेलन विशेषांक

वर्ष १४] [अंक ११

कला : जीवन समीक्षा

फेब्रुवारी १९६०

क वि ता

नवकाव्याची किमया

पु. य. देशपांडे

चालू आहे, चालू आहे
काहोतरी नवीनसे
शब्द आहे, काव्य आहे
अर्थशून्यास बाळसें —१—

अर्थ सारा व्यर्थ आहे
जीवनात मृत्यू आहे
मांजरीचे डोळे गेले
उंदिरांची चैन आहे —२—

झोप आहे, स्वप्न आहे
जागृतीला सीमा आहे
जागृतीच्याहि गर्भात
विस्मृतीला वाव आहे —३—

काळामधे क्षण आहे
शरीरात कण आहे
कणोकणी क्षणिकता
क्षणिकची सत्य आहे —४—

देह आहे मानवाला
देहामधे जीव आहे
अर्थ आहे देहालाच
जीव अर्थशून्य आहे —५—

अर्थ आहे इंद्रियांना
मन, बुद्धि व्यर्थ आहे
अंतरात्मा थाप आहे
शिळचाची ती वाफ आहे —६—

क्षणात हे, क्षणात ते
क्षितिजात अनंतता
क्षितिज ते दूर आहे
जवळिकात सार्थता —७—

सार्थता जवळिकात
लाल निळी शुभ्र काळी
पोकळीत वासनांची
ज्योतिशून्यशी दिवाळी —८—

पिवळ्याशा पोकळीत
रिते कुंभ कवनांचे
कणाकणास वाळूच्या
नवे कोंभ कल्पनांचे -९-

गंध रंगीत होतात
रसनेला रूपकळा
स्पर्श आकाशी भासतो
अर्थपूर्णात भोपळा -१०-

शून्यासहि अर्थ आहे
आकड्याच्या पुढे-मागे
व्हावे न का हो, ते सार्थ
शब्दांच्याहि आगेमागे -११-

अर्थपूर्ण असो शब्द
किंवा असो अर्थशून्य
तत्त्वज्ञान नव्हे कला
प्राण कलेचा नावीन्य -१२-

सार्थ जे, ते कलाशून्य
कला प्रतिमांची माया
प्रतिमांना अर्थ नको
नवकाव्याची किमया -१३-

* *

चंद्रास

दत्तु गोरे

तुझे रूप मी घेउन, चंद्रा
धाडिन तुजला जरा रजेवर.
चंद्रिका सवे मी मग पाहिन,
हिंडुन सगळे अवघे अंबर !

गुरु-शुक्राला भेटुनिया मी
लाल मंगळावरती जाइन.
अणू जगातिल प्रगत मानवे,
कसा मिळविला जय तो पाहिन !

राहु-केतुना टाळित टाळित
सप्तर्षीना करीत वंदन !
ध्रुवताऱ्याला भेटुनिया मग,
स्वर्गंगेतच करीन स्नान !

कलेन वाढत पौर्णिमेस मी,
पसरिन ज्योत्स्ना, झुलविन सागर.
अखेर आणि क्षय-ग्रहणातुन
देइन जगता नित आधार !

तुझ्या कृपे या एक दिवस मी
त्रैलोक्या बघ झालो भूषण,
उपकारास्तव यत्ने क्षालिन,
तुझेच चंद्रा हे मृगलांछन !

ढगाळलेल्या निळ्या नभातुन,
वा ताऱ्यांच्या घन गर्दीतुन.
निरोप घेउन जातो चंद्रा
जलाशयाच्या प्रतिबिंबातुन !

卐

अनुक्रमणिका

भला माणूस

ग. त्र्यं. माडखोलकर

श्री. ना. रा. शेंडे यांचे गुणवर्णन जर मला कोणी मोजक्या शब्दांत करावयाला सांगितले, तर ते मी दोनच शब्दांत करीन. ते दोन शब्द म्हणजे 'भला माणूस'!

किंबहुना, नागपुरातील ज्या ज्या संस्थात त्यांनी आजपर्यंत काम केलेले आहे, त्या त्या सर्व संस्थातील कार्यकर्ते एकमुखाने त्यांच्या भलाईबद्दल ग्वाही देतील, असे मला वाटतें. व्यक्तिशः माझ्यापुरते बोलावयाचे झाले, तर गेल्या चाळीस वर्षांच्या माझ्या सार्वजनिक आयुष्यात सदैव निष्ठेने साथ देणारे जे हाताच्या बोटांवर मोजण्यासारखे मित्र मला मिळाले, त्यात, 'तरुण भारता'तील माझे सहकारी श्री. ए. श्री. पटवर्धन यांच्या बरोबरीने, मी त्यांची गणना करीन.

नागपुरातील लोक श्री. शेंडे यांना कळकळीचे कार्यकर्ते आणि तळमळीचे लेखक म्हणून ओळखतात. महाराष्ट्रातील वाचकवर्गाला ते मुख्यतः दलितांच्या जीवनावर ललित आणि गंभीर असें दोन्ही प्रकारचें उद्बोधक वाङ्मय लिहिणारे ऋजु प्रवृत्तींचे कनवाळू साहित्यिक म्हणून माहीत आहेत. या दोन्ही गोष्टी श्री. शेंडे यांच्या थोरवीला पोषक आहेत, हे निस्संशय. पण, माझ्या दृष्टीने, त्यांची खरी थोरवी त्यांच्या साधु आणि शालीन वृत्तीत आहे; स्वतःच्या मर्यादा आणि वैगुण्ये जाणून वागण्यात आहे; व स्वतःची शक्ति आणि क्षेत्र या दोहोंचा अचूक अंदाज घेऊन आपल्याला झेपेल ते काम जिवाभावाने करण्यांत आहे. त्यांचा विनय आणि त्यांची साधुता ही अनेकांना पुष्कळदा कृत्रिम वाटतात. विशेषतः ज्या निरनिराळ्या अधिकारपदांवर गेली सात आठ वर्षे ते सारखे चढत गेलेले आहेत. ती त्यांची वाढती प्रतिष्ठा आणि लोकप्रियता ध्यानात घेतली असता, त्यांच्या वागणुकीतील लीनता ही केव्हा केव्हा त्यांच्या मित्रांनासुद्धा चमत्कारिक वाटत असल्याचे मी पाहिले आहे. पण श्री. शेंडे यांचा विनय काय किंवा साधुत्व काय हे दोन्ही गुण स्वानुभूतीतून विकसित होत आलेले आहेत. स्वतःच्या व्यक्तित्वाचे काटेकोर मोजमाप ज्याने आपल्या मनाशी केलेले असते आणि आपले

अनुक्रमणिका

गुणावगुण ज्याने पूर्ण पारखलेले असतात, अशा माणसाच्या ठिकाणी जो संयम, जो सावधानता आणि जे सौजन्य आपोआपच येते आणि उत्तरोत्तर वाढत जाते, त्यातून श्री. शेंडे यांचा विनय आणि साधुत्व ही दोन्ही आकाराला आलेली आहेत.

पहिली भेट

१९४४ सालच्या जानेवारीत आमची पहिली भेट झाली. आमचा 'तरुण भारत' सुरू होऊन त्या वेळी पुरते पंधरा दिवसहि झालेले नसावेत. जेल रोड वरील श्री उधोजी यांच्या बंगल्याच्या पडवीत तेव्हा आमचे छोटे कार्यालय होते. एक दिवस सायंकाळीं हातसुताच्या खादीचे पांढरे शुभ्र कपडे ल्यालेला काळचा सावळचा रंगाचा पीळदार तरुण माझ्याकडे आला आणि आपल्या हातातले कागद माझ्या टेबलावर ठेऊन अगदी नम्रतेने म्हणाला, "हा एक लहानसा लेख मी आणला आहे. आपल्याला बरा वाटला, तर तो 'तरुण भारता'तून प्रसिद्ध करावा' मी चटकन त्या लेखावर नजर टाकली. वळणदार अक्षर आणि शुद्ध भाषा हे त्याचे दोन गुण तत्क्षणीच माझ्या नजरेत भरले; व पहिली दोन तीन पाने चाळून मी त्यांना म्हटले, "आपला हा लेख मी जरूर प्रसिद्ध करीन."

अशा रीतीने त्या दिवशी जो आमचा परिचय झाला, त्या परिचयाची परिणति हळू हळू गाढ स्नेहात आणि विश्रब्ध सहकार्यात झाली. ते महार असतील, अशी शंकाहि त्या वेळी माझ्या मनाला शिवली नाही! व पुढेहि कित्येक दिवस मी त्यांना ब्राह्मण समजूनच चाललेलो होतो. पण, अस्पृश्य विद्यार्थ्यांत वाङ्मयाची अभिरुचि आणि लेखनाची आवड उत्पन्न करण्यासाठी त्यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या साहित्य चर्चा मंडळाचे अध्यक्ष म्हणून जेव्हा ते मला त्याच्या वार्षिकोत्सवाचे निमंत्रण द्यावयाला आले, तेव्हा त्यांची जात मला संभाषणाच्या ओघात सहजासहजी कळून गेली. कारण त्यांच्या व्यक्तिवांत त्यांची जात कोठेहि सहसा उमटून दिसत नाही. इतकी की, कै. प्रा. श्री. म. माटे हे एकदा विदर्भ साहित्य संघाला भेट द्यावयाला आले असता, श्री. शेंडे यांना ज्या वेळी त्यांनी बोलताना ऐकले, त्या वेळी अगदी सहजगत्या त्यांनी मला विचारले, "काय गजाननराव, आपल्या सांगलीच्या शेंड्यांपैकीच आहेत का हे?" सांगलीचे शेंडे म्हणजे दक्षिण महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध संयुक्त महाराष्ट्रवादी कार्यकर्ते श्री. शंकरराव शेंडे! मी तावडतोब त्यांना सांगितले की, "बापूसाहेब, आमचे हे शेंडे खास नागपूरचेच आहेत आणि ते पूर्वास्पष्ट आहेत,—म्हणजे महार आहेत." त्याबरोबर प्रा. माटे आश्चर्याने उद्गारले, "काय सांगता? हे महार आहेत खरोखरी?" प्रा. माटे यांच्या या उद्गारावरून, श्री. शेंडे यांच्या व्यक्तित्वाने

त्यांच्या जातीवर कशी मात केलेली आहे, हे आपल्याला समजून येईल. मात्र एखादे वेळी केवळ जातीमुळे आपल्याला अन्याय होत असल्याचा जेव्हा अनुभव येतो, तेव्हा मात्र ते चिडून उद्गारतात, "अहो, किती केलं तरी शेवटी मी महार आहे ना ! "

वि. सा. संघात प्रवेश

१९४९ सालच्या फेब्रुवारीमधे चांदा येथे भरलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या वार्षिक अधिवेशनांत अध्यक्ष या नात्याने संघाच्या कारभाराची सूत्रे मी आपल्या हाती घेतली; व संघाचे केंद्रीय कार्यालय अमरावतीहून नागपूर येथे आणण्याचा



निर्णय त्या अधिवेशनात घेण्यात आला. चांद्याहून परत आल्यावर जेव्हा संघाची कचेरी आम्ही नागपूरला प्रथम उघडली, तेव्हा श्री. शेंडे यांना मी कार्यालयीन चिटणीस म्हणून संघात आणले. अशा रीतीने १९४९ साली विदर्भ साहित्य संघाशी त्यांचा जो संबंध आला, तो पुढे उत्तरोत्तर दृढ होत जाऊन, चिटणीस, सरचिटणीस, उपाध्यक्ष आणि आता शेवटी अध्यक्ष अशी संघातील एकाहून एक उच्च अधिकारपदें त्यांनी आपल्या गुणांच्या आणि निष्ठेच्या जोरावर संपादन केली. दहा वर्षांच्या या काळात संघामधे अनेक स्थित्यंतरे झाली. पण, त्या सर्व स्थित्यंतरात श्री. शेंडे यांचे स्थान मात्र अढळ राहिले, ही गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. किंबहुना, राजाराम वाचनालय, वाङ्मय प्रसारक मंडळ,

नाट्यनिकुंज इत्यादि संस्थांतील त्यांची कार्यपद्धति जर पाहिली, तर असे दिसून येते की, अगदी खालच्या पायरीपासून प्रारंभ करून क्रमाक्रमाने वर चढत जात शेवटी त्यांनी शिखर गाठलेले आहे.

निष्ठा, साधनशुचिता व इमान

याचा अर्थ असा की, श्री. शेंडे हे महत्वाकांक्षी आहेत; व ती महत्वाकांक्षा कोणत्या पद्धतीने साध्य करावयाची, याचा क्रम स्वतःच्या मनाशी ठरवून तदनुसार संयमाने आणि निग्रहाने वागणारे करारी कार्यकर्ते आहेत. तितकीच दुसरी महत्वाची गोष्ट ही की, आपली महत्वाकांक्षा तृप्त करून घेण्यासाठी ते कोणतेहि अशुचि किंवा आक्रमक साधन वापरीत नाहीत. मला असे अनेक प्रसंग आठवतात की, ज्या वेळी, आपण भक्कम बहुमताने निवडून येऊ अशी पूर्ण खात्री असताना सुद्धा, केवळ श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति, श्री. बाबासाहेब देशपांडे, श्री. पटवर्धन, आणि मी यांच्या शब्दाखातर त्यांनी निवडणूक लढविण्याचा मोह आवरलेला आहे. ज्यांना एकदा सहकारी म्हटले आणि शब्द दिला, त्यांच्याशी वागताना श्री. शेंडे ज्या निष्ठेने साथ देतात, ती निष्ठा सार्वजनिक जीवनात केवळ आदर्श होय. पाच वर्षांपूर्वी मी ज्या वेळीं त्यांना अध्यक्षीय निवडणुकीला उभे न रहाण्याचा सल्ला दिला, तेव्हा त्यांच्या डोळ्यांना पाणी आले. पण, आपला सगळा मनःक्षोभ गिळून ते मला शांतपणाने म्हणाले, "भाऊसाहेब, आपल्याला मी वडील भाऊ मानले आहे आणि आपल्या शब्दाबाहेर जाणार नाही, असे वचन दिले आहे. आपला सल्ला मला प्रमाण आहे. हे महाराचं इमान आहे, असं आपण समजा." डोळ्यात आसवे आणून त्यांनी उच्चारलेले ते शब्द माझ्या हृदयात अगदी भिनून गेले. त्यांच्या पाठीशी केवढे बहुमत होते, याची जाणीव आम्हा सर्वांनाच होती; व मला तर ती सर्वांत जास्त होती. त्यामुळे त्यांचे इमान हे आम्हा सर्वांनाच त्या वेळीं असामान्य वाटले. या बाबतीत आणखी सांगण्यासारखी विशेष गोष्ट ही की, त्यानंतर त्या प्रसंगाची कटुता त्यांच्या वर्तनात किंवा संघाच्या कारभारात कोठेहि आम्हाला जाणवली नाही. त्यामुळेच केव्हा केव्हा मला असे वाटते की, त्यांचे साधुत्व हे अंगभूत नसून कमावलेलें असावे. पण, ते जर खरोखरीच कमावलेले असेल, तर मग अधिकच स्पृहणीय आणि प्रशंसनीय ठरत नाही काय?

खंबीरपणा

त्यांचे हे इमान यापेक्षा नाजुक आणि बिकट परिस्थितीत त्यानंतर पुन्हा लवकरच आम्हा सर्वांच्या अनुभवाला आले. नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु-

पदाच्या निवडणुकीचा तो प्रसंग होता. निवडणूक अत्यंत चुरशीची झाली. श्री. शेंडे हे त्या वेळी मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमधे रुग्णावस्थेत होते. श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति यांना मत देण्याचा त्यांचा विचार पक्का झालेला होता. आपला हा विचार आपल्या कांही उच्चपदस्थ सुहृदांना आणि मित्रांना रुचणार नाही, याची त्यांना पूर्ण जाणीव होती. आजाराच्या सबबीवर निवडणुकीत भाग घेण्याचे जर त्यांनी टाळले असते, तर त्यांना कोणीहि दोष देऊ शकला नसता. तरीसुद्धा, निवडणुकीच्या दिवशीं त्यांनी हॉस्पिटलमधून युनिव्हर्सिटीत जाऊन, ठरल्याप्रमाणे आपले मत दिले. या प्रसंगी जो मनाचा आणि मताचा खंबीरपणा त्यांनी दाखविला, तो सार्वजनिक जीवनात खरोखरीच आदर्श ठरण्यासारखा आहे. त्यामुळें, " मी शब्द दिला आहे, " असे शब्द त्यांच्या तोंडातून एकदा बाहेर पडले, म्हणजे ते काम त्यांच्या हातून घडणार, असे लोक समजून चालतात.

विनम्र आणि गोड स्वभाव

श्री. शेंडे यांच्या या वैशिष्टयामुळे गेल्या दहा वर्षात विदर्भ साहित्यसंघातली जी जी कामे त्यांच्यावर सोपविण्यात आली, ती ती सर्व त्यांनी दक्षतेने आणि चोखपणाने पार पाडली. विदर्भ साहित्य मंदिर आणि रंगमंदिर या दोहोंचेहि बांधकाम, ते चिटणीस आणि सरचिटणीस असताना, सतत चालू होते. सौ. कुसुमावती देशपांडे या त्या काळात कोषाध्यक्ष होत्या; व बांधकामाची सर्व जबाबदारी कै. नानासाहेब जोग यांनी उचललेली होती. सौ. कुसुमताई यांचा सर्वच कारभार अतिशय व्यवस्थित. हिशेबाच्या बाबतींत तर त्या विलक्षण काटेकोर आणि कडक. थोडीसुद्धा चालढकल कोणी केलेली त्यांना सहन होत नसे. शिवाय, या सर्व कामकाजावर मनाने पराकाष्ठेचे प्रेमळ आणि निर्मळ पण किंचित् शीघ्रकोपी असे. श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति हे कार्यकारी विश्वस्त म्हणून स्वत: जातीने देखरेख करणारे ! ते रोज सायंकाळी संघाच्या कार्यालयांत येऊन सबंध दिवसाच्या कामाचा झाडा घेत असत. या काळात हजारो रुपयांच्या देणग्या संघाकडे आल्या आणि त्या बांधकामात खर्ची पडत गेल्या. कै. नानासाहेब जोग यांची दृष्टि अशी की, कमीत कमी वेळांत आणि खर्चात कामे झपाटयाने व्हावीत, म्हणून पैसा हाती येईल तसतसा त्याचा विनियोग लगेच करावयाचा. अशा या भिन्न वृत्तीच्या आपल्या ज्येष्ठ सहकाऱ्यांबरोबर काम करीत असताना श्री. शेंडे यांची स्थिति प्रसंगी किती बिकट झाली असेल, याची खरोखरी कल्पनाच करावयाला हवी ! पण, आपल्या विनम्र आणि गोड स्वभावामुळे, कोणत्याहि बाबतीत विकोप होण्याचा प्रसंग येऊं न देता, श्री. शेंडे यांनी आपल्या उत्तम कारभारावद्दल सर्वा-

कडून धन्यवाद घेतले. "संत जेणे व्हावे। जगबोलणे सोसावे" हाच आदर्श जणू त्यांनी आपल्या डोळ्यापुढे ठेवला होता. त्यामुळे कै. नानासाहेब जोग, सौ. कुसुमताई देशपांडे आणि श्री. अण्णासाहेब मंगळमूर्ति या तिघांचाहि आपल्यावरील विश्वास आणि लोभ ते टिकवू शकले.

कार्यकौशल्य

या त्यांच्या कार्यकौशल्याबरोबरच आणखीहि एका गोष्टीचा उल्लेख करणे अवश्य आहे. ती म्हणजे सरकारी अनुदान मिळविण्याच्या कामी त्यांचा संघाला झालेला हुकमी उपयोग ! ते स्वतः सरकारी नोकरीत असल्यामुळे त्यांना उघड रीतीने या बाबतीत काही करणे कठीण जात असे. त्यामुळे या बाबतीतील त्यांच्या कामगिरीची माहिती आणि जाणीव कै. नानासाहेब जोग, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. बाबुराव चिमोटे प्रभृति त्यांच्या निकटच्या मित्रांशिवाय फारशी कोणाला नाही. राज्यपुनर्रचना अमलात येण्याच्या एक दोन दिवस आधी १९५६ सालच्या नोव्हेंबर महिन्यात कै. नानासाहेब जोग यांनी जी ५०,००० रुपयांची देणगी मध्यप्रदेश सरकारकडून मोठ्या चातुर्याने मिळविली, तिची पूर्व तयारी श्री. शेंडे यांनी तितक्याच चातुर्याने केली होती, हे लक्षात ठेवले पाहिजे. रंगमंदिराचे काम हाती घेण्याचे जेव्हा कै. नानासाहेब जोग यांनी ठरविले, तेव्हा संघाची गंगाजळी कोरडी पडून गेलेली होती आणि काम सुरू करण्यासाठी तर त्यांचा जीव अगदी तळमळत होता. शेवटी त्यांनी श्री. शेंडे यांना एक दिवस म्हटले की, "हे पहा नारायणराव, आपल्या जवळ आता फक्त १७ रुपये ९ आणे शिल्लक आहेत. माझी इच्छा तर अशी आहे की, माझ्या डोळ्यांसमोर रंगमंदिर उभे राहिले पाहिजे. तेव्हा तुम्हाला आता या बाबतीत जे काय करता येण्यासारखे असेल, ते तावडतोब करा." जुन्या मध्यप्रदेशाचे उपवित्तमंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे यांच्याकडे अर्थखात्याचे संपूर्ण अधिकार या वेळी सुदैवाने आलेले होते. श्री. शेंडे यांनी त्यांची भेट घेऊन संघाची अडचण त्यांच्या कानावर घातली. श्री. तिरपुडे हे मंत्री होण्यापूर्वी विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य होते; व त्याच्या कार्याविषयी त्यांना अत्यंत आपुलकी होती. त्यामुळे त्यांनी श्री. शेंडे यांना अनुदान लवकर मिळविण्याच्या दृष्टीने काही सूचना केल्या. त्यांच्या या सल्ल्यानुसार श्री. पटवर्धन, श्री. बाळासाहेब ढवळे, कै. नानासाहेब जोग, श्री. बाबूराव चिमोटे प्रभृति आम्ही मंडळींनी त्या वेळचे मुख्य मंत्री कै. पं. रविशंकर शुक्ल यांची तावडतोब भेट घेतली; त्यांच्याकडून देणगीचे अभिवचन मिळविले; व नंतर लगेच श्री. शेंडे यांच्या बरोबर श्री. तिरपुडे यांना भेटून ती देणगी पदरांत पाडून घेण्याचा कार्यभाग साधला. अशा रीतीने राज्यपुनर्रचनेच्या मुहूर्तावर

अनुक्रमणिका

कै. नानासाहेब जोग यांना ही मोठी देणगी मिळवून रंगमंदिराच्या कामाला प्रारंभ करता आला. यानंतर मुंबई सरकारकडून जी उदार अनुदाने रंगमंदिराच्या बांधकामासाठी मिळाली, ती मिळवून देण्यातहि श्री. शेंडे यांचा हात प्रामुख्याने आहे, हे सांगावयाला मला हरकत वाटत नाही. किंबहुना, त्यांना चिटणीस, सरचिटणीस आणि उपाध्यक्ष करण्याचा जो आग्रह नानासाहेबांनी धरला, तो खरोखरी त्यांची या बाबतीतील प्रभावी उपयुक्तता ध्यानात घेऊनच ! आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य माणसे हेरण्यात आणि त्यांचा योग्य वेळी उपयोग करून घेण्यात नानासाहेबांचा अगदी हातखंडा होता.

भूषणास्पद जात्यभिमान

श्री. शेंडे हे जात्यभिमानी आहेत, असे जर मी म्हटले, तर ते त्यांच्या बाबतीत दूषण न ठरता खरोखरी भूषणच ठरेल. महार हा सच्चा, शूर, बुद्धिमान् आहे व जागल्याचे, वेसकरचे किंवा सरकारी खजिन्यात रसद भरण्याचे इत्यादि राष्ट्ररक्षणाची जी अत्यंत जबाबदारीची कामे या जातीकडे अगदी जुन्या काळापासून चालत आलेली आहेत, ती ध्यानांत घेतली असता हा अभिमान इतिहाससिद्ध आहे. असेच खरोखरी म्हटले पाहिजे. 'महाराचें इमान' असा जो शब्दप्रयोग भावनेच्या भरांत श्री. शेंडे हे केव्हा केव्हा करतात, तेव्हा तो आपल्या जातीच्या या ऐतिहासिक गुणविशेषांबद्दल जो उत्कट अभिमान त्यांना आहे, तो कळवळा गेल्यामुळे ! या अभिमानामुळेच विदर्भ साहित्यसंघाच्या गेल्या दहा वर्षांच्या अनेक दृष्टींनी अविस्मरणीय अशा उत्कर्षकाळात त्यांना इतकी महत्त्वाची कामगिरी बजावता आली; व केवळ साहित्यिक म्हणूनच नव्हे, तर विदर्भातील एक अव्वल दर्जाचा कार्यकर्ता म्हणूनहि पहिल्या प्रतीचे यश संपादन करता आले. विदर्भ साहित्य संघाच्या प्रशस्त प्रांगणात ज्या दोन भव्य इमारती आज उभ्या आहेत, त्यांच्या उभारणीचा यथार्थ वृत्तांत ज्या वेळी लिहिला जाईल, त्या वेळी 'महाराचे इमान' संघाच्या उत्कर्षाला किती बाबतीत आणि कोणत्या प्रकारे साधनीभूत झाले, याची हृदयस्पर्शी कथाहि त्यात सुवर्णाक्षरांनी नमूद करावी लागेल, याबद्दल मला शंका नाही.

अग्रपूजेचा मान

विदर्भ साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाच्या रूपाने मराठी शारदेच्या दरबारातला परमोच्च मान श्री. नानासाहेब शेंडे यांना देऊन विदर्भाने त्यांच्या या मानाचे योग्य चीज केले आहे. महाराष्ट्राच्या वाङ्मयीन इतिहासात संत चोखामेळा यांच्या नंतर शारदेच्या दरबारातील अग्रपूजेचा मान संपादन करणारे श्री.

शेंडे हेच बहुधा गेल्या आठशे वर्षातले दुसरे हरिजन असावेत. विदर्भाला त्यांच्या विषयी नितांत अभिमान आणि आणि आदर वाटावा, असेच त्यांचे चरित्र आणि चारित्र्य, साधुत्व आणि सेवा आहे.

१९४९ साली माझ्याबरोबर श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. बाळासाहेब ढवळे, कै. नानासाहेब जोग आणि श्री. ना. रा. शेंडे हे चार कार्यकर्ते विदर्भ साहित्य संघात आले. गेल्या दहा वर्षात त्यांनी संघामधे जी कामगिरी केली, ती आज मूर्तिमंत लोकांच्या डोळ्यांपुढे उभी आहे. श्री. शेंडे हे या चौघात कनिष्ठ. वयाने, शिक्षणाने, अनुभवाने आणि बुद्धिमत्तेनेहि ! तरीसुद्धा त्या तिघांच्या इतकेच काम त्यांनी गेल्या दहा वर्षात केले, आपली कर्तबगारी दाखविली आणि त्यांच्याइतकेच मानाचे स्थानहि अखेर मिळविले, हा त्यांचा केवढा गौरव ! कै. नानासाहेब जोग हे मला एकदा म्हणाले होते, "आपल्या विदर्भ साहित्य संघात मी निखालस भली माणसे दोनच पाहिली. एक हरिभाऊ नेने आणि दुसरे नारायणराव शेंडे !" नानांचा स्वभाव कोणालाहि झुकते माप देण्याचा नव्हता. त्यांच्यासारख्या खाष्ट कार्यकर्त्याने श्री. शेंडे यांच्यासंबंधी व्यक्त केलेला हा अभिप्राय म्हणजे त्यांच्या सौजन्याची खरोखरी पावतीच होय. श्री. शेंडे यांची ही भलाई हे विदर्भ साहित्य संघाचे जसे एक अमोल भूषण तशीच एक संधायक शक्तीहि आहे. ती शक्ति विदर्भ साहित्य संघाला चिरकाल लाभो, एवढेंच मी शेवटी म्हणतो.

卐

वार्ड नं. २३, बेड नं. २७

ना. रा. शेंडे

जीवनातील चढउताराच्या, नरमागरमीच्या, श्रीमंतीगरीबीच्या आणि सत्ताचाकरीच्या तफावतींची नारायणला जाणीव होती. म्हणूनच आपल्या रखरखीत जीवनात जपूनच पाऊल टाकायचं त्याचं धोरण होतं. तो आपला मुक्काम जाणून होता. खेड्यापाड्याकडे नदीनाले, डोंगरपहाड ओलांडत अळणंवळणं देत जाणारी आपल्या जीवनाची चिंचोळी वाट तो हळूहळू चालत होता. धनसंपत्तीचं, मोठेपणाचं, अधिकाराचं अथवा सत्तेचं स्वप्न ना कधी त्यानं राखलं, ना कधी त्यानं तशी अभिलाषाहि बाळगली. त्याची वाट ठरलेली. त्याची दिशा ठरलेली. त्याची चाल ठरलेली अन् त्याची गतिहि ठरलेली.

होय, नारायणचं घर तसं कांचेचं होतं नि तें गडद अंधारात दडलेलं होतं. त्यात त्याच्या सद्भावनेची मिणमिणती पणती जळत होती. त्या पणतीचा मंद प्रशांत प्रकाश त्याच्या काचेच्या घरात प्रवर्तित झाला होता. तेच त्याचं असीम सुख होतं. ऐहिक सुखाच्या कल्पनेचं कलदार धन अन् स्थावर भांडवल त्याचेजवळ काही नव्हतंच. पण नाही म्हणायला तसा तो मोठा धनवान होता, भांडवलदार होता. सुहृदाचा लाभलेला जिव्हाळा हेच त्याचं मोलाचं धन होतं, भांडवल होतं. या ऐपतीवर त्याची ऐट काही कमी नव्हती. समजा, चैतन्येश्वर प्रसन्न झाला नि त्यानं नारायणाला वर देऊन विचारलं, "माग नारायण, तुला काय हवं ते माग"; निसर्गदेवता प्रसन्न झाली नि तिनं नारायणाला वर देऊन विचारलं, "माग नारायण, तुला काय हवं ते माग"; देवी शारदा प्रसन्न झाली नि तिनं नारायणला वर देऊन विचारलं, "माग नारायण, तुला काय हवं तें माग." तेव्हा नारायण हात जोडून प्रणाम करीत फक्त एकच मागणी करील. "हे भगवन्, हे निसर्गदेवते, हे देवी शारदे, मला केवळ जनतेचा जिव्हाळा प्रदान कर आणि काचेचं घर ढासळलं तरी माझ्या सद्भावनेची मिणमिणती पणती मात्र विझू देऊ नकोस ! व्हायचं झालें तर एवढं वरदान दे आणि माझ्या शत्रूचंहि कल्याण साधण्याची शक्ति मला लाभू दे !

आपल्या वाटेनं जात असताना नारायणनं गेल्या पाच वर्षांत मृत्यूला अनेकदा निमंत्रित केलं होतं–अनेकदा कळवळून हाका दिल्या होत्या. पण मृत्यूनं ना त्याचं निमंत्रण स्वीकारलं, ना त्याच्या आर्त हाकेला ओ दिली. आणि मग एके दिवशी, गुरुवार १८ डिसेंबर १९५८ रोजी रात्री दहाच्या सुमाराला कसलीहि चाहूल लागू न देता, अगदी नकळत मृत्यूनं नारायणवर झडप घालण्याचा प्रयत्न केला !

त्या दिवशी सायंकाळपासून नारायण विदर्भ साहित्य संघाच्या धनवटे रंगमंदिरात सारखा भिरभिरत होता. इकडच्या तिकडे त्याची सारखी ये–जा सुरू होती, सारखी धावपळ चालू होती. मुंबई राज्याच्या पाचव्या नाटयमहोत्सवाचे प्रयोग धनवटे रंगमंदिरात होत होते. आजच्या प्रयोगाला मुख्य मंत्री उपस्थित राहणार होते.

'काचेचं घर' हा त्या रात्रीचा नाटयप्रयोग.

मुख्य मंत्री आले. नाटकाला सुरवात झाली. बाहेरची वर्दळ गेली. सगळीकडे शांत वातावरण झालं. त्याच रात्री त्याचवेळी शेजारच्या एका भवनांत नवभारती बहुउद्देशीय समाज सेवा संस्थेच्या मदतीसाठी नृत्याचा एक कार्यक्रम घडविणाऱ्या चालकांना त्या कार्यक्रमाला हजर राहण्याबद्दल त्यानं संमति दिली होती. दिलेल्या शब्दाची आठवण होताच नारायण लगबगीनं शेजारच्या भवनात गेला. शिवपार्वतीचं तांडव नृत्य पाहून लगेच तो रंगमंदिरात परतला. व्हरांडयात आल्यावर कार्यालयात आपली सहलकाठी विसरल्याचे स्मरण होताच त्याच पावली तो ती आणण्यास परतला. बस्स ! त्याचा एक पाय पायरीवर आणि दुसरा जमिनीवर असताना अगदी एकाएकी त्याला भोवळ आली. त्याच्या खांद्यावरची शाल खाली पडली. त्याच्या छातीत धस्स झालं. त्याला दरदरून घाम सुटला. हातपाय लटलटू लागले. सारं रंगमंदिर गरगरू लागलं—सबंध आकाश गरगरू लागलं. सगळी घरं गरगरू लागलीं. तो चीत्कारला, धावा ! आणि आता तो कोलमडून खाली पडणार—त्याचं काचेचं घर कोसळून त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडणार इतक्यात बाजूनं जात असलेला समाज सेवा अधिकारी धावला. त्यानं नारायणला सावरण्याचा प्रयत्न केला.

नारायणची अवस्था गंभीर ! धावले, सर्व अधिकारी धावले. कार्यकर्ते धावले. साहित्यिक धावले. डॉक्टर धावले. धावपळ सुरू झाली. पहा पहा, काय झालं नारायणला ते पहा. सर्वांच्या ओठावर दोनच शब्द, नारायण सिरियस !

अनुक्रमणिका

अगदी थोड्याच वेळापूर्वी तो अनेकांना भेटला होता. अनेक त्याला भेटले होते. त्यानं अनेकांना लवून मुजरा केला होता. अनेकांनी त्याला प्रणाम केला होता. काही मिनिटापूर्वीच एका ख्यातनाम पत्रकाराचा एका महत्वाच्या कामासाठी फोन घणघणला होता. नारायणनं उत्तर दिलं होतं, "भाऊसाहेब बघतो मी काय ते." एक दुःखी जीव त्याला भेटला होता. त्यानं विनंती केली, "माझं काम होईल ना हो ? दया करा गरिबावर." त्याची पाठ थोपटून नारायण धीर देत म्हणाला होता, "चिंता करू नका. दिलेला शब्द अवश्य पाळीन." समाजकल्याण अधिकारी म्हणाला होता, "आज गर्दी फार आहे. तुमची राखीव खुर्ची दुसऱ्याला देतो. हरकत नाही ना तुमची ?" नारायण चटकन उत्तरला, "हरकत कसली ? पाहुण्यांची सोय आधी. त्यांचा मान राखणं आपलं कर्तव्यच आहे." आणि मुख्य मंत्र्याचे स्वागत करण्याआधी एक साहित्यिक समाजसेविका त्याला निमंत्रण देत म्हणाल्या, "उद्या सकाळी आमच्याकडे चहापान आहे. अवश्य या बरं का ?" अन् निमंत्रणाचा स्वीकार करीत नारायण म्हणाला होता, "होय, अवश्य येईन."

मग नारायणला एकाएकी असं काय झालं ? – त्याची प्रकृति अशी एकाएकी का बिघडली ? असं काही घडेल याची कोणाला थोडी शंका सुद्धा आली नव्हती. हातात सहलकाठी व अंगावर काळी शाल घेऊन नारायण सर्वांशी हसत बोलत होता नि आता एकदम असं कसं झालं बरं ? अनेकजण अनेक तर्क करू लागले. काही जण कुजबुजू लागले. नारायण अज्ञात जगाचं काही संशोधन करतो म्हणतात, त्याचा तर काही परिणाम झाला नसेल ना ? कोणी म्हणाले, नारायण सिद्धिसाधनेचा काही प्रयोग करतो म्हणतात, एखादा प्रयोग त्याचेवर उलटला नसेल कशावरून ? तर कोणी म्हणाले, नारायणाला मंत्रविद्येचाहि छंद आहे म्हणतात, चुकून एखाद्या मंत्रानं तर त्याला ग्रासलं नसावं ना ? तर कोणी पुटपुटायचे. छे हो ! हृदयाला जबर धक्का बसणारा एखादा प्रसंग घडला असावा ! काय असेल ते असो, पण एकाएकी असं घडलं खरं. पहा पहा, नारायणला काय झालं ते पहा.

नारायणाची गंभीर अवस्था पाहून प्रत्येकजण हळहळत होता, चुकचुकत होता.

तसं नारायणाजवळ काय होतं ? ना धन, ना अधिकार अन् ना कसली सत्ता. तो जातिहीन होता. तो विद्याहीन होता. तो भूमिहीन होता अन् तो रूपहीनहि होता. आणि ना कसली त्याला समाजात प्रतिष्ठा. अशा अगदी सामान्य, अगदी दरिद्री नारायणावर सुहृदांचा केवढा लोभ, केवढी माया, केवढा

अनुक्रमणिका

जिव्हाळा ! आणि नारायणचा स्वभाव तरी धड होता काय ? कठोर, कोपिष्ट ! तलवारीची तीक्ष्ण धार ! पण त्याच्या सुहृदांनी त्याचेवर शालीनतेची, विनम्रतेची, साधुशीलतेची अत्यंत मुलायम, अत्यंत मऊ मखमली प्रावणं चढवून आपला लोभ, माया, जिव्हाळा व्यक्त केला, शेंदुर फासलेल्या दगडाला देवत्वाचं स्वरूप दिलं ! आणि म्हणून प्रत्येकजण कळकळीनं म्हणायचा, पहा पहा, नारायणाला काय झालं ते पहा.

होय ना, नारायणचा मृत्यु काहींना हवा होता. काही साहित्यिकांना, काही चित्रकारांना, काही फोटोग्राफर्सना. त्यात त्यांचा दुष्टपणा नव्हता सद्भावनाच होती, असीम जिव्हाळा होता. अगदी स्वच्छपणे अगदी प्रांजळपणे नारायणाच्या मृत्यूनंतर दोन शब्द लिहिता येतील, दोन शब्द बोलता येतील अन् शेंदूर फासलेल्या खेड्यातील दगडाचं वजन मापता येईल – हा काही साहित्यिकांचा सद्हेतु. नारायणचा मृत्यु व्हावा अन् मग त्याचा मृतात्मा कपातील चहाच्या उंचावत जाणाऱ्या वाफेकडे कसा झेप घेतो नि ते पाहून स्वर्गातील सुंदर अप्सरा आपल्या कोमल हातात चहाचा कप घेऊन नारायणाच्या मृतात्म्याच्या स्वागतासाठी लगबगीनं कशा पुढं सरसावतात याचे अत्यंत मनोहारी व सूचक चित्र रेखाटण्याचा –त्याच्या मृत्यूनंतरच कसे उठावदार होईल हा चित्रकारांचा सद्हेतु. तर अनेकदा प्रयत्न करूनहि नारायणाचा एकहि फोटो नीट निघेना म्हणून त्याच्या मृत्यूनंतर प्रेतयात्रेचं त्याचं चित्र मात्र कसलंहि वैगुण्य दाखवायला कोणाला जागा रहाणार नाही असा फोटो काढण्यासाठी वाट पहाणाऱ्या फोटोग्राफर्सचा सद्हेतु. या सर्वांनी नारायणला यात्रात्रत जाणीव करून दिली होती आणि त्यांच्या सुदैवाने त्यांना आता ही सुवर्णसंधि लाभणार अशी नारायणचीहि सदिच्छा होती.

उन्हात तडफडणाऱ्या मासोळीसारखा नारायण तडफडत होता नारायणाला डॉक्टर्सनी, तज्ज्ञ डॉक्टरांनी तपासलं. एकानं तपासलं, दुसऱ्यानं तपासलं. तिसऱ्यानं तपासलं. नारायणची जगण्याची काही शक्यता आहे का ? सर्वांच्या नजरांनी [illegible]ॅक्टरांना मूक प्रश्न विचारला. त्याचं उत्तर द्यायला डॉक्टर असमर्थ होते. त्यांनी त[illegible]ात्कालिक उपचार केले. कसून प्र[illegible]न केले, पण नारायणचं काचेचं [illegible]. ते केव्हा कोसळणार हे [illegible] ? नारायणच्या ना[illegible] चालल्या होत्या; हातपाय गार पडून ते [illegible]डले जात होते; हृदयाची धुगधुगी काय ती आता शिल्लक होती. डॉक्टरांनी निर्णय घेतला, नारायणला तातडीनं, कसल्याहि विलंब न लावता मेडिकल–हास्पिटलमध्ये न्यायला पाहिजे. चला. त्वरा करा.

कळलं, डॉक्टरांच्या निर्णयाचा अर्थ सर्वांना कळला. झालं, नारायणला तावडतोब मेडिकल–कॉलेज हास्पिटलमध्ये हालविण्याचो व्यवस्था करण्यात आली. त्याचं जवळपास मृतवत् प्रेतच हास्पिटलमध्ये नेण्यात आलं.

नारायणला एकानंच नव्हे अनेक तज्ज्ञ डॉक्टरांनी पुन: पुन: नीट तपासलं. उपचारावर उपचार करण्यात आले. पण त्या रात्री निश्चित निर्णय घेणं कठीणच होतं. रात्रभर थोडचा थोडचा वेळानं नारायणची प्रकृति आता कशी ? असा प्रत्येक जण प्रश्न विचारीत होता. ठिकठिकाणचे फोन सारखे घणघणत होते. विचारलं जात होतं, आता नारायणची प्रकृति कशी ? काय, नारायणचं प्राण-संकट टळलं ? पण निश्चित उत्तर देणं कठीण होतं !

पण, एकदाचा नारायणचा प्राण हरण करणाऱ्या त्या काळरात्रीचा अंमल संपला. इहलोकच्या नारायणच्या नावावर लाल रेषा ओढायला उद्युक्त झालेल्या चित्रगुप्ताच्या हातातील तांबडी पेन्सिल गळून पडली. अचानकपणे नारायणचा प्राण ताब्यात घेणाऱ्या यमराजाचा फास ढळला. मृत्यूनं बेसावध असणाऱ्या नारायणावर एकाएकी झडप घालण्याचा केलेला प्रयत्न फसला. काळरात्र, चित्रगुप्त, यमराज आणि मृत्युशक्ति या सर्वांना माघार घ्यावी लागली. वस्तुत: त्या रात्री त्यांना नारायण हवा होता. पण चक्रव्यूह रचूनहि तो त्यांना गवसला नाही. त्यांचा पराजय झाला. नारायणनं स्वत: निमंत्रण दिलं होतं तेव्हा त्यांनी ते स्वीकारलं नव्हतं. आता या मृत्युलोकात जीवन जगण्याची इच्छा नाही, मला मुक्त करा अशी करुणा नारायणनं भाकली होती पण तीहि ऐकली गेली नाही. मृत्यूला त्यानं कळकळून हाक दिली होती, ये मृत्यु ये. पण या आर्त हाकेची दखल घेतली गेली नाही. नारायणच्या हाकेला, विनंतीला त्या वेळी आपण मान दिला नाही आणि आता अचानक त्याचेवर झडप घालण्याचा प्रयत्न केला याची खंत कदाचित त्या काळरात्रीला, चित्रगुप्ताला, यमराजाला आणि मृत्यूला वाटली असावी ! नारायणवर हा अन्याय होत असल्याची कदाचित् त्यांना तीव्र जाणीव झाली असावी. त्याच्या बेसावधपणाचा गैर फायदा घेत असल्याचा कदाचित् त्यांना पश्चात्ताप वाटला असावा. आणि याहिपेक्षा अधिक खंत, अधिक जाणीव, अधिक पश्चात्ताप त्या सर्वांना वाटला असेल तो, जनतेच्या—सुहृद जनतेच्या नारायणावरील निष्ठेचा, लोभाचा, मायेचा, जिव्हाळयाचा आपण विचार न करता क्रूरतेनं झडप घातली असल्याबद्दलचा; म्हणूनच कदाचित त्यांनी माघार घेतली असावी. सुहृद जनतेच्या पुण्याईची अवहेलना आपल्या हातून घडत असल्याचे आढळून त्यांनी आपले पाऊल या खेपेला मागे घेतले असावे. त्यामुळे एकदा का होईना नारायणला जीवदान लाभलं !

दुसरे दिवशी सायंकाळी नारायणला उपचार कोष्ठदालनातून वार्ड नं. २३, बेड नं. २७ वर हलविण्यात आले.

होय, वार्ड नं. २३, बेड नं. २७

आदल्या रात्री नारायणची प्रकृति एकाएकी बिघडली व त्याला वार्ड नं. २३ मध्ये ठेवण्यांत आले असे वृत्त वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले. नारायणाच्या समाचारासाठी सुहृदांची एकसारखी रोघ लागली. ब्राह्मण, ब्राह्मणेतर, दलित, बौद्ध, मुसलमान, ख्रिश्चन, महानुभाव, गुजराती, शीख आदि सर्व जातींचे, धर्मांचे, पक्षांचे लहानथोर, श्रीमंत-गरीब स्त्री-पुरुष त्याच्या परामर्शाला आले. वृद्ध आले, बालगोपाल आले, साहित्यिक आले, पत्रकार आले, अधिकारी आले, कार्यकर्ते आले कसलाहि दर्जा, कसलीहि योग्यता, कसलीहि सत्ता वा कसलीहि धनसंपदा नसलेल्या अत्यंत सामान्य, अत्यंत मामुली, अत्यंत दरिद्री नारायणला भेटायला सर्वांनी धाव घेतली. मेडिकल कॉलेज-हॉस्पिटल वार्ड नं. २३ गजबजून गेले.

वार्ड नं. २३ च्या साइड रूममधोल बेड नं. २७ वर नारायण अत्यवस्थ स्थितीत होता; मृत्युशय्येवर होता. सुहृदांच्या थव्यांच्या थव्यांनी बेड नं. २७ झाकला गेला. दर्शनोत्सुक हृदयवंताना आवर घालणे डॉक्टरांना नि सिस्टर्सना कठीण झालें. रोजच, मग सकाळ असो , दुपार असो वा सायंकाळ असो, सुहृदांचा नारायणवरील जिव्हाळा दुथडी भरून वहात होता.

पण नारायणला तीनचार दिवस कोण आले, कोण गेले आणि कुठं काय चाललं याची कसलीच भ्रांत नव्हती. डोळे असून तो काही पाहू शकत नव्हता, कान असून तो काही ऐकू शकत नव्हता. सारं शरीर बधीर झालं होत. चैतन्यशून्य झालं होतं. भेटायला येणाऱ्या हृदयवंतांना प्रणाम करण्यास तो असमर्थ होता; आपला प्रतिसद्‌भाव व्यक्त करण्यास त्याचं शरीर आणि मन अचेतन होतं.

नारायणच्या आजारासंबंधी पुनः पुन्हा संशोधन झालं. त्याच्यावरचं प्राणसंकट टळलं. पण रक्तक्षय, अन्नद्वेष आणि निद्रानाश हे प्रकृतिदोष मात्र त्याला जर्जर करीत होते. त्याला थोडीतरी झोप यावी, त्याला थोडीतरी स्वस्थता लाभावी याची विशेष दखल घेतली जात होती-त्याचं मन प्रसन्न राखण्याची दक्षता बाळगण्यात येत होती.

नारायणच्या आजाराचा पाचवा दिवस. त्याला रात्रीला झोप येईना म्हणून झोपेची गोळी देण्यात आली. त्यामुळं पहाटे तो झोपेत होता. बेड नं. २७ वरील त्याचा देह खोलीतील दिव्याच्या प्रकाशात अगदी स्पष्ट दिसत होता.

मध्यरात्रीनंतर सिस्टर त्याला एकदोनदा पहायला आली आणि तो झोपेत आहे असं पाहून समाधानाचा सुस्कारा टाकीत ती निघून गेली होती.

शिशिर ऋतूचे ते दिवस. रामप्रहरची ती रम्य वेळ. सुखद गार वारे खोलीत घोंगावत होते. दिवा अजूनहि पहारा देत होता.

रामप्रहरच्या अशा अत्यंत आल्हाददायक वेळी नारायणच्या मस्तकावर कुणीतरी आपला कोमल हात ठेवला नि त्या स्पर्शानं त्याचा निद्राभंग झाला. त्याचे नेत्र उघडले. एक सुंदर युवती त्याच्या पलंगाजवळ उभी होती. निळसर रंगाचा तलम ब्लाऊज तिनं घातला होता. गुलाबी रंगाचं पारदर्शक विरविरीत पातळ ती नेसली होती. तिचं अत्यंत गोंडस अंगप्रत्यंग उठून दिसत होतं. कपाळावर बारीकशी टिकली लकाकत होती. तिचे केस मोकळे होते व ते कटिखाली रुळत होते. लावण्यानं मुसमुसलेल्या त्या अनोळखी युवतीकडे नारायणची नजर जाताच तिनं आपले नाजुक कर जोडून विनम्रतेनं त्याला प्रणाम केला. प्रतिप्रणाम करायला त्यानं आपले हात वर उचलण्याचा प्रयत्न केला. पण त्याला शक्य झालं नाही. म्हणून आपल्या नजरेनंच त्यानं त्या सुंदरीचा प्रणाम स्वीकारला.

ती युवती अत्यंत देखणी होती, पण तिच्या चर्येवर कसल्याहि उन्मादाचे, कसल्याहि मदमस्तीचे विकारी भाव नव्हते; उलट तिचं ते सुंदर मुख निर्विकार, निर्विकल्प होतं. अत्यंत सोज्वळ, अत्यंत निर्मळ भावानं तिचं मुखकमल सतेज, तेजःपुंज दिसत होतं.

नारायणच्या पलंगाजवळ ती तशीच उभी होती. वाऱ्याच्या झुळकीनं तिचा पदर सारखा फडफडत होता व तो नारायणच्या छातीला आलिंगन देत होता.

ती मनमोहिनी त्याचेकडे अगदी टक लावून पहात होती. तिच्या त्या सुरेख टपोऱ्या डोळ्याला डोळा भिडविण्याचं नारायणात ना त्राण होतं, ना त्याला वाचा फुटत होती अन् ना कसल्या खुणेनं तो तिला काही विचारू शकत होता. तरी त्याच्या शुष्क ओठांनी किंचितशी हालचाल केली. "देवी तू कोण आहेस बरं ?" असा प्रश्न त्या ओठावर तरंगला आणि मग लगेच त्याच्या हातापायांना कंप सुटला. कडक थंडी असूनहि त्याचा निस्तेज चेहरा घर्मबिंदूंनी डबडबला.

त्याची ही अवस्था पहाताच त्या युवतीनं लगबगीनं त्याचं कृश शरीर आपल्या छातीशी धरून एका हातानं त्याच्या मानेला आधार दिला नि पदरानं त्याचे घर्मबिंदु टिपले. दुसऱ्या हातानं त्याला एकदोन घोट पाणी पाजलं आणि

मग ती मंजुळ शब्दात म्हणाली, "मी तुम्हाला शरण आले आहे. मला आशीर्वाद द्यावा."

"आशीर्वाद देवी, तुला आशीर्वाद ?" त्याच्या मुखातून अत्यंत क्षीण शब्द बाहेर पडले.

"होय, मला आशीर्वाद" ती हलक्या स्वरात उत्तरली आणि मग तिनं पलंगाच्या कठड्याला उशी टेकून तीवर त्याची मान ठेवली.

नंतर ती युवती—जयमंगला—नारायणच्या पायाकडे वळली. तेथून तिनं नारायणला पुन्हा दोन्ही कर जोडून प्रणाम केला नि आपलं मस्तक त्याच्या चरणावर ठेवलं.

नारायणानं डोळे मिटून आशीर्वाद देण्यासाठी आपला हात उंच करण्याचा प्रयत्न करून डोळे उघडले, तो ती युवती त्या एका क्षणात अदृश्य झाल्याचं आढळून आलं.

आपण स्वप्नात आहोत की हा एक चमत्कार घडला, हेच नारायणला कळेना. त्यानं बाजूला वळून पाहिलं. खोलीतील दिवा अजूनहि तेवत होता. बाजूच्या कपाटावरील फुलपात्रातील गुच्छ वाऱ्याच्या झुळकीनं डोलत होता. उशीजवळचा बौद्ध धर्मग्रंथ हसत होता. तो त्यानं छातीशी कवटाळला.

पण कुणास ठाऊक, ती युवती अदृश्य झाल्यावर त्या खोलीत अत्यंत मधुर सुगंध दरवळू लागला. नारायणला हुशारी वाटली. त्याचं मन उल्हसित झालं. खोलीतील प्रत्येक वस्तु त्याला मोहक वाटू लागली. ती अनोळखी युवती त्याच्या नजरेसमोर झळकू लागली. कोण होती ती ? ती का आली ? आपल्याला शरण यायला नि आशीर्वाद मागायला तिला कारण काय ?

नारायण विचारमग्न झाला. त्याला दोन वर्षांपूर्वीची घटना आठवली.

× × ×

रात्री एक नंतर नारायण घरी परतला होता व अशीच एक गोष्ट तो लिहीत होता. आश्विन महिन्याचे दिवस होते. मग प्रसन्न करणारं वातावरण होतं. घराचं दार मोकळं होतं. तो लिहिण्यात गढला होता. इतक्यात एक सुंदर मोटार त्याच्या दारापुढं येऊन थडकली. तेथून एक सुंदर तरुणी उतरली. तिनं दोनचारदा हॉर्न दिला. पण नारायणचं लक्ष तिकडे गेलं नाही. ती तरुणी दारावर उभी राहिली अन् तिनं त्याला अगदी कातर स्वरात हाक दिली. नारायणनं चमकून पाहिलं. त्याची लेखणी गळून पडली.

अनुक्रमणिका

नारायण त्या तरुणीकडे पहातच राहिला. तिच्या अप्रतिम सौंदर्यानं त्याला भारून टाकलं. त्याला बाहेर येण्यास तिनं आपल्या नाजुक तर्जनीचा अन् मोहक पापण्यांचा वापर केला. एक शब्द न बोलता तो उठला नि तिच्या मागोमाग जाऊन मोटारीत अगदी तिच्या शेजारी बसला. ती एकटी होती. तीच ड्रायव्हिंग करीत होती. मोटार चालू झाली, अन् वेगानं तेलंखेडी तळ्याला वळसा देऊन सिमिनरी हिल्सकडे ती जाऊ लागली. हायकोर्ट आणि टायगर गॅप ग्राऊंडच्या बाजूनं टेकडीकडे जाणाऱ्या रस्त्याला मोटार वळली व काही अंतर गेल्यावर ती एकाएकी थांबली. सर्वत्र अगदी सामसूम होतं. चंद्राचा शीतल प्रकाश त्या छोट्या माळरानाची शोभा वाढवीत होता. रोमांचकारी थंड हवा मन पुलकित करीत होती.

ती तरुणी मोटारीतून उतरली. मग आपल्या वेणीचा शेपटा नारायणच्या गालावर हलकेच मारून तिनं त्याला थोड्या वेळासाठी खाली उतरण्याची विनंती केली. तो खाली उतरल्यावर तिनं आपला स्निग्ध हात त्याच्या गळ्यात घालून माळरानातील एका वृक्षाखाली त्याला नेलं. चंद्रप्रकाशाचे कवडसे त्या उभयतावर नाचत होते. त्याच्या तळहाताचं चुंबन घेऊन ती मधुर शब्दात म्हणाली, "मला ओळखलंत का ?"

नारायणनं नकारार्थी मान डोलावली.

"तुम्ही मला ओळखत नाही, पण मी तुम्हाला ओळखते." मंद हास्य करीत ती म्हणाली, "मला तुम्ही हवे आहात."

"पण तू कोण ?" नारायणनं कंपित स्वरात विचारलं.

"ते नंतर तुम्हाला कळेल. पण तुम्हाला माझी भीति तर वाटत नाही ना ?" त्याचे दोन्ही हात आपल्या वक्षस्थळाशी कवटाळून तिनं विचारलं.

"भीति कसली ? पण—"

"हं. ठीक आहे." एवढं म्हणून त्या उर्वशीनं आपल्या बोटातील हिऱ्याची आंगठी काढून ती नारायणाच्या ओटात घालत, ती उद्गारली, "माझी एवढी भेट स्वीकारा." ती त्याला थोडी बिलगली.

नारायणचं शरीर शहारलं. त्याला आपल्या काठीचं स्मरण झालं. परंतु त्या मायावी तरुणीनं त्याला मुळीच अवसर दिला नाही. आपल्या नाजुक हाताचा त्याच्या कमरेला विळखा घालून लडिवाळपणे ती म्हणाली, आता चला. दूर फिरू या कुठंतरी."

मोटार पुन्हा वेगानं धावू लागली. सिमिनरी हिल्सवरून गोरेवाडा व तेथून सेंट्रल महाल आणि स्टेशनकडून सीताबर्डी टेकडीला वळसा देऊन व्हेरायटी

चौकापुढे मोटार गेल्यावर नारायण म्हणाला, "ही बाजूची इमारत विदर्भ साहित्य संघाची आहे वरं का ?"

"मला माहीत आहे." आपल्या कोमल मानेला किंचित्सा झटका देत ती म्हणाली, "एकदा आले होते भेटायला. पण तुम्ही नव्हता." नारायणनं आश्चर्यानं तिच्या कमनीय मूर्तीकडे नजर रोखली. "मी तुमच्या राजाराम वाचनालयातहि आले होते."

"काय राजाराम वाचनालयात ?"

"हो. रात्रीचे बारा वाजून गेले होते. पण तुमच्याजवळ पाचसहा व्यक्ति बसल्या होत्या. विरस झाला."

"हाक का दिली नाही मला ?"

"बरं वाटलं नाही. तुमच्याबरोबर कुणी असलं की राग येतो मला."

"कुणाचा ? माझा ?"

"छे हो. तुमच्याबरोबर असलेल्या व्यक्तीचा."

"भली माणसं आहेत ती."

"असेनात का" ती ठसक्यात म्हणाली आणि मग तिनं विचारलं, "तुम्हाला चहा हवा असेल नाही आता ?"

"हवा खरा, पण आता मिळेल कुठं एवढ्या रात्री ?"

"मिळेल ना ?" आणि तिनं सोनेगाव विमानतळाकडे भरधाव मोटार सोडली. तिथं चहा पिताना तिनं नारायणकडे रोखून पहात विचारलं,

"माझ्या संगतीचा कंटाळा तर आला नाही ना ?"

"कंटाळा ? ही तर सुखद स्मृति आहे."

"केवळ स्मृतिच ?"

"या स्मृतीत तुझ्या गोड सहवासाचा निर्मळ निर्झर सदैव झुळझुळत राहील."

ती तरुणी खुदकन् हसली नि म्हणाली, "आपण आणखी थोडी सहल करू या."

नारायण काहीच बोलला नाही. तो चुपचाप मोटारीत जाऊन बसला. मोटार कामठीरोडला आली तेव्हा त्यानं विचारलं,

"आपण कुठं जायला निघालो ?"

"रामटेकच्या डाक बंगल्यावर" ती चटकन् उत्तरली.

"डाक बंगल्यावर काही विशेष आहे का ?"

अनुक्रमणिका

" नाही. तसं काही नाही. पण ते रम्य स्थळ आहे अन् एकांत आहे. मला एकदा तुम्हाला तेथे न्यायचंच होतं. "

मोटार रामटेक वस्ती सोडून गडाच्या पायथ्याकडील गर्द झाडीत शिरली' तोच जोराचा वारा सुटला नि पानं सळसळली. नारायणला काहीसं सणसणल्यासारखं झालं. थोडं भीतिदायक वातावरण आहे." तो पुटपुटला. ती काहीच बोलली नाही.

नागार्जुनाची टेकडी मागं टाकून मोटार आता डाकबंगल्याच्या दिशेने वळली. आणि मग रामसागर तळ्याच्या कठड्याजवळ येऊन थांबली.

" थोडा वेळ आपण इथंच गप्पा मारू अन् मग डाकबंगल्यात जाऊ " असं म्हणत ती तरुणी खाली उतरली. नारायणहि खाली उतरला. आपला हात त्याच्या बाहूत अडकावून ती म्हणाली,

" बघा, किती रमणीय तळं आहे हे. आणि निसर्गसौंदर्य तरी किती मोहक नि मादक आहे. "

" पण तुझ्या लावण्यापुढं सारं फिकं आहे. तुझ्यात मद आहे अन् मस्ती सुद्धा."

" मद अन् मस्ती ?"

" होय."

" कशावरून. "

" शब्दांनी सांगता येत नाही. "

कठड्याला रेलून तिनं नारायणला आपल्या दोन्ही स्निग्ध बाहूंनी आवळलं नि म्हटलं, "

" किती सुन्दर प्रतिबिंब पडलं आहे चन्द्रताऱ्यांचं या तळ्यांत. चला आपण पोहू या थोडा वेळ. "

" एवढ्या रात्री ?"

" आता रात्र नाही. पहाट होत आली आहे. "

" पण मला पोहता येत नाही. "

" मी सांभाळीन. मी तुमची नाव आहे असं समजा. जलविहार करायची मला फार आवड आहे. पण आता एकटीनं नव्हे तर तुमच्यासह. विशेष मौज आहे अशा जलविहारात. अनुभव तर घ्या. "

त्या तरुणीनं ब्लाऊज काढला. साडी सोडली. तारुण्यानं मुसमुसलेला तिचा विश्वदेह पाहून नारायणनं लाजेनं मान खाली घातली. पण ती मात्र त्याला बिलगली. आपले दोन्ही हात तिनं त्याच्या गळ्याभोवती घातले.

अनुक्रमणिका

"नको नको. असं काही करू नकोस." तिचे मानेवरले हात काढण्याचा त्यानं प्रयत्न केला.

"आज मी माझी इच्छा पूर्ण करीन." तिनं उन्मादानं मादक श्वास सोडला.

नारायणचं अंग शहारलं. कंपित झालं.

तिनं त्याला अधिक घट्ट कवटाळलं. त्या कोमलांगीच्या अत्यंत मादक स्पर्शानं त्याचं शरीर थरथरलं. त्याची हनुवटी वर करीत ती कातर स्वरात म्हणाली,

"मी आवडत नाही का तुम्हाला ?"

"तू तर अप्सरा आहेस."

"माझी एक शेवटची इच्छा पूर्ण करणार का तुम्ही ?" आपलं मस्तक त्याच्या छातीवर टेकून तिनं विचारलं.

"इच्छा ? कोणती ?"

"आधी वचन द्या."

"दिलं." आपल्या हातानं तिचे केस कुरवाळीत नारायण वचनबद्ध झाला.

"किती छान आहात तुम्ही." ती पुटपुटली नि लगेच म्हणाली.

"स्मिताला ओळखता ना ?"

स्मिताचं नाव घेताच नारायण चपापला अन् आपण घाईनं वचन दिल्याचं त्याला दुःख झालं.

"स्मिता माझी छोटी बहीण" ती म्हणाली.

"तुझी छोटी बहीण ?"

"हो ना. चपापलात का असे ?"

"नाही. काही नाही." स्वतःला सावरीत तो म्हणाला. आणि मग त्या मायावी तरुणीनं त्याच्या कानात आपली इच्छा व्यक्त केली. नारायणला दरदरून घाम सुटला. त्याचे हातपाय लटलटू लागले. ती तरुणी मात्र खदखदा हसली. तिच्या त्या विकट हास्याचे स्वर आसमंतात दुमदुमले.

"पण तुझा हा सौदा आहे." आपल्या सुकलेल्या ओठाला जीभ घासत नारायण थोड्या कठोर शब्दात म्हणाला.

"असंच काही समजा. पण तुम्ही वचन दिलं आहे." ती तीव्रतेनं उत्तरली.

"परंतु सौदा मोठा महाग आहे."

"मला त्याची जाणीव आहे."

"वचन पूर्ण करणं म्हणजे जिवावरचा खेळ आहे."

"पण तो तुम्हीच खेळू शकता. स्मितासाठी बदला घेतलाच पाहिजे. आणि त्यासाठी तुम्ही आपला शब्द पाळलाच पाहिजे."

नारायणची मति गुंग झाली. त्याचे दोन्ही खांदे जोरानं हलवीत ती तरुणी आवाज चढवून कडाडली,

"लक्षात ठेवा हा माझ्या बहिणीचा प्रश्न आहे. तो तुम्ही कसा सोडवावा हा तुमचा प्रश्न आहे. मी काही दिवस वाट पाहीन."

तिनं डोळे विस्फारून नारायणकडे पाहिलं अन् मग क्षणभर अवतीभवती नजर टाकून, ती आपल्या हाताचा विळखा सोडून हात उंच करीत म्हणाली,

"पहा. वचनभंग होऊ देऊ नका."

हे शब्द आसमंतभर निनादले. त्याच्या प्रतिध्वनींनी नारायणला गरगरल्या-सारखं झालं.

त्या तरुणीनं पुन्हा एकदा नारायणकडे रोखून पाहिलं नि मग कठड्यावरून अत्यंत वेगाने तिनं रामसागर तळ्यात उडी घेतली.

ग्लानी येऊन नारायण खाली कोसळला.

तो शुद्धीवर आला तेव्हा आपण एका दूरच्या स्मशानघाटावरील एका प्रेताच्या उंचवट्याला टेकून पडलो असल्याचं त्याला आढळून आलं.

× × ×

आणि मग सतत दोन वर्षं त्याला बराच त्रास भोगावा लागला. त्या क्लेशातून तो मुक्त होतो न होतो तोच आता त्याला या दुसऱ्या चमत्कारानं चकित केलं.

नारायण विचारतंद्रीत निमग्न होता. त्याची मान पलंगाच्या रुळाला टेकली होती अन् एक हात खाली लोंबकळत होता. सूर्याचे कोवळे किरण खोलीत प्रवेश करीत होते अन् सुगंधाचा घमघमाट दरवळतच होता. वाऱ्याच्या झोतानं दरवाजावरील पडदा एकसारखा फडफडत होता अन् दिवा अजूनहि जळतच होता.

उंच टाचेच्या चपलांचा टप् टप् आवाज करीत सिस्टरनं खोलीत प्रवेश केला. तिनं प्रथम दिवा मालवला. दरवळणाऱ्या सुगंधानं तीहि भारल्यासारखी झाली. तिची नजर नारायणवर गेली नि ती चमकली. त्याची ती अवस्था पाहून तिला अशुभ कल्पना चाटून गेली. त्याचं देहावसान तर झालं नाही ना? ती धावतच गेली. तिनं त्याची नाडी पाहिली. श्वासोच्छ्वास नीट होतो की नाही म्हणून आपली चार बोटं तिनं त्याच्या नाकाजवळ धरली नि मग तिला हायसं

वाटलं. आपल्या दोन्ही तळहातांनी तिनं त्याचं डोकं उशीवर ठेवलं, तो त्याची विचारतंद्री भंगली. डोळे किलकिले करून त्यानं पाहिलं. सिस्टर त्याच्यापुढं उभी होती.

"कोण, सिस्टर?"

"हां. ही औषधि घ्या."

औषधीचा घोट घेऊन नारायणनं विचारलं, "सिस्टर, काही वेळापूर्वी कोणी तरुण बाई मजकडे आल्याचं तुम्ही पाहिलं का?"

"नाही तर. एवढ्या सकाळी कोण येणार?" मग ती म्हणाली, "हां. मी मात्र रात्री दोन-तीनदा तुम्हाला पहायला येऊन गेले. थोडी झोप लागली होती तुम्हाला. पण रात्री तुमचा नोकर नाही आला?"

"सिस्टर नोकर म्हणू नका. सेवक म्हणा. घनःश्याम नि उत्तम हे सेवक आहेत, नोकर नाहीत. रात्रीला घनःश्याम अन् दिवसाला उत्तम. सेवाधर्म पाळणारे सेवक."

सिस्टर काही बोलली नाही. जाताना ती म्हणाली,

"तुम्ही हालचाल काही करू नका, अन् अधिक काही बोलूहि नका. मनाई आहे हां. चहा पाठवू का थोडा."

"नको. घनःश्याम येईल. रात्रीला त्याला सुटी दिली होती. मोठा इमानी सेवक आहे तो. येतच असेल." तोच घनःश्याम खोलीत आला. त्यानं नारायणला लवून प्रणाम केला नि मग त्याचं लक्ष पलंगाखाली गेलं. तो आश्चर्यानं म्हणाला,

"मालक, पलंगाखाली तर फुलंच फुलं आहेत."

नारायणनं किंचित्सं वाकून पाहिलं. बेड नं. २७ खाली गुलाब आणि मोगऱ्याच्या फुलांचा सडा पडला होता अन् त्यावर केवड्याची पानं विखुरलेली होती. "नवल, मोठ्या नवलाईची गोष्ट." तो उद्गारला अन् मग क्षणभर डोळे मिटून तो म्हणाला,

"घनःश्याम, गोळा कर ती पानंफुलं आणि घरी जाशील तेव्हा एखाद्या तळ्यात ती अर्पण कर."

घनश्यामनं साबणानं हात स्वच्छ धुतले नि मग त्यानं पानंफुलं गोळा केली नंतर ती नीट ठेवण्यासाठी त्यानं कपाट उघडलं तो संपूर्ण कपाट विविध फळांनी गच्च भरलेलं असल्याचं आढळून आलं. नारायण तर स्तंभितच झाला. हा काय प्रकार! त्याला काही कळेना.

इतक्यात घनःश्यामची नजर फळावरील एका निळ्या लखोटयावर गेली. तो उचलून त्यानं नारायणला दिला.

" फळावर निळा लखोटा " ! नारायणला आणखी आश्चर्याचा धक्का बसला. त्यानं तो फोडला. आत एक लांबोळी कमलपाकळी होती. तीवर जांभळी अक्षरं कोरली होती. अत्यंत सुंदर वळणदार अक्षरं. 'आपल्या दर्शनाचा लाभ झाला. आशीर्वाद पावला. आपल्या चरणी माझा प्रणाम.'

त्या कमलपाकळीवरील तीन ओळी नारायणनं पुनःपुन्हा वाचल्या. आलटून पालटून ती पाकळी पाहिली. पण रामप्रहरला भेट देऊन गेलेल्या कमलिनीची स्वाक्षरी त्याला कुठं आढळली नाही. तो पुन्हा विचारमग्न झाला.

तोवर घनःश्यामनं स्टोव्ह पेटवला आणि चहाचं भांडं मांडलं. स्टोव्हचा सर्रर फुर्र आवाज होऊ लागला. त्या आवाजाबरोबर एका अत्यंत मधुर गीताची तान हवेत तरंगू लागली.

घनःश्यामनं भिऊन नारायणला हाक दिली. त्याच्या विचाराची साखळी पुन्हा तुटली. मधुर गीताची तान ऐकून तर तो सर्दच झाला. चमत्कारावर चमत्कार !

नारायणला हिरवट रंगाच्या काचेच्या ग्लासातून चहा घेण्यात विशेष आनंद. घनःश्यामनं चहाचा हिरवा ग्लास नारायणपुढं ठेवला. तो उचलून नारायण ग्लास ओठाला लावणार तोच तो दचकला. त्या ग्लासातील चहात ती तरुणी प्रणाम करीत असल्याचं त्याच्या निदर्शनास आलं. तो टक लावून त्या ग्लासातील तरुणीची मोहक मूर्ति न्याहाळू लागला. प्रणाम आटोपताच ती सुंदर तरुणी 'घ्या ना चहा, घ्या' असं खुणवू लागली. विनवू लागली.

नारायणनं घटाघट चहा पिऊन ग्लास रिकामा केला. त्याला आता किती तरी समाधान वाटलं. चित्तवृत्ति उल्हसित झाली. बरंच बळ अंगी आल्याचं वाटून तो स्वतः पाठ सरकावून पलंगाच्या कड्याशी टेकून बसला.

(अपूर्ण)

卐

विचारांचे विश्व

'साक्षी'

वैचारिकांचा संघर्ष ?

आधुनिक युगात दोन वैचारिकांना जागतिक माहात्म्य प्राप्त झाले आहे. आधुनिक विज्ञानाचीच ही दोन वैचारिक अपत्ये आहेत. उदारमतवाद हे पहिले अपत्य आणि मार्क्सप्रणीत साम्यवाद हे दुसरे. ही दोन्ही आधुनिक विज्ञानाची अपत्ये आहेत म्हणजे काय ? तर विज्ञानाची जी विशेष विचारप्रक्रिया आहे, तीच विचारप्रक्रिया या दोन्ही वादांच्या मुळाशी आहे.

असे असताहि हे दोन्ही वाद परस्परविरुद्ध आहेत, असे व्यवहारात दिसून येते. किंबहुना, आज समग्र जग हे या दोन वैचारिकात वा वादात दुभंगले गेले आहे आणि यांच्यातील संघर्षाचा केव्हा भडका उडेल व समग्र जग तिसऱ्या महायुद्धाच्या वणव्यात केव्हा लोटले जाईल, याचा आता नेम राहिला नाही.

हे असे का व्हावे ? एकाच वैचारिक-प्रक्रियेतून दोन इतक्या परस्परविरुद्ध वैचारिका का निर्माण व्हाव्यात ?—हा एक गहन-गभीर विचाराचा प्रश्न आहे; एवढेच नव्हे, तर जगातील प्रत्येक माणसाच्या जीवन-मरणाचा तो प्रश्न होऊन बसला आहे.

वैचारिका म्हणजे काय ?

वैचारिका म्हणजे जग व जीवन यांच्याकडे पाहण्याची एक व्यापक दृष्टि अथवा दर्शन आणि या दर्शनानुसार व्यावहारिक जीवनाला विशेष रंगरूप आणण्याचा प्रयत्न. 'आय्डिऑलजी' या नावाने वैचारिका आजकाल ओळखली जाते. हे नाव अगदी सार्थ आहे. कारण आय्डिऑलजीत आय्डियाला, कल्पनेला, प्राधान्य दिले जाते आणि या विशिष्ट कल्पनेनुसार जीवनरीत ('वे ऑफ लाइफ') घडविण्यावर जोराचा भर दिला जातो. पण या 'आय्डिऑलजी'चे 'वैचारिका' हे रूपांतर मात्र योग्य नाही. कारण 'वैचारिका' या शब्दाने विचाराचे प्राधान्य सूचित केले जाते, कल्पनेचे नव्हे. कल्पना ही केवळ 'असिद्ध पूर्वकल्पना' या नात्यानेच विचाराचे अंग होत असते.

विचार, विचारप्रक्रिया, हे जग व जीवन यांच्या मुळाशी असलेल्या सत्याचे संशोधन करण्याचे व त्याचे यथार्थ दर्शन करून घेण्याचे अमोघ साधन आहे.

अनुक्रमणिका

ात, विचारप्रक्रियेंत, दोष असला तर त्याच्या साहाय्याने होणाऱ्या सत्य-दोष येणे अपरिहार्य आहे. म्हणून कोणत्याहि वैचारिकेच्या मुळाशी जी क्रिया असते तिचे स्वरूप आधी यथार्थतेने समजून घेतले पाहिजे आणि ाष आहे की सदोष आहे, हे पाहिले पाहिजे. म्हणजेच तिच्या मर्यादा केल्या पाहिजेत; तिचा आकार काटेकोरपणे समजून घेतला पाहिजे. कोणतीहि वैचारिका ही कोणत्या ना कोणत्या निश्चित स्वरूपाच्या क्रियेचा परिणाम असते. परिणाम म्हणजे कार्य (' इफेक्ट '). आणि कार्य हें कारणावाचून घडत नसते, हा एक निरपवाद असा सिद्धांत आहे. हणून वैचारिका व विचार-प्रकिया यांच्यात कार्यकारण संबंध आहे. हा णसंबंध नीट समजून घेतल्याशिवाय कोणत्याहि वैचारिकेची यथार्थता वा ता सिद्ध केली जाणार नाही. आपल्याला आधुनिक उदारमतवाद व ा साम्यवाद या दोन वैचारिकात जो प्राणघातक संघर्ष दिसून येतो त्याचे मजून घ्यावयाचे आहे. या दोन्ही वैचारिका आधुनिक विज्ञानाचीच दोन ाहेत, हे ऐतिहासिक सत्य आहे. विज्ञान आणि विज्ञानजन्य यंत्रे यांचा सामा-व्यनात अनिर्बंध वापर, हेच या दोन्ही वैचारिकांचे मुख्य अधिष्ठान आहे.

वैचारिका आणि संघर्ष

स्तुत: वैचारिकांची भिन्नता हे त्यांच्यात संघर्ष निर्माण करण्याचे कारण ? घोडा गाईहून भिन्न आहे आणि गाय घोडयाहून भिन्न आहे, तरी संघर्ष मुळीच दिसून येत नाही. म्हणून भिन्नता हे संघर्षाचे कारण संभवू ही. उदारमतवाद व साम्यवाद हे वैचारिक दृष्ट्या भिन्न दिसत असले तरी ळेच त्यांच्यात संघर्ष उद्‌भवण्याचे काहीच कारण नाही. पण त्यांच्यात : स्पष्ट दिसतो मग त्याचे कारण काय असावे ?

संघर्ष मानवनिर्मित आहे, हे स्पष्ट आहे. पण तो विचारनिर्मित आहे र्थात् नाही. कारण विचारा-विचारात भिन्नता असली तरी केवळ ही संघर्षाचे कारण होऊ शकत नाही. शिवाय विचार हे सत्यदर्शनाचे साधन ळे आणि भिन्नभिन्न विचार हे सत्यदर्शनावर, अंशात्मक का होईना, ाडणारे असल्यामुळे संपूर्ण सत्यदर्शनासाठी त्यांच्या सहकार्याचीच ता असते. पण हे केव्हा ? तर संपूर्ण सत्यदर्शन हवे असेल तेव्हा. आणि दर्शन नकोच असेल, तर विचाराची भाषा बोलणेहि व्यर्थ आहे. कारण वैचारिक प्रक्रिया, ही सत्यदर्शनासाठीच आकारास येत असते.

णून दोन अथवा अनेक वैचारिकात जेव्हा संघर्ष माजलेला दिसतो तेव्हा चाराशी, विचारप्रक्रियेशी, कसलाहि संबंध नसतो. कारण संघर्ष,

प्राणघातक संघर्ष, हा विचारजन्य नसून विकारजन्य असतो. आणि विचार आणि विकार यांच्यात जमीन–अस्मानचे अंतर असते; एवढेच नव्हे तर प्रकाश आणि काळोख यांच्यात जेवढा स्वभावसिद्ध विरोध असतो तेवढाच विचार व विकार यांच्यात असतो. किंबहुना विकारामुळे उद्‌भवणाऱ्या संघर्षाचे निराकरण करण्यासाठीच विकाराचा अवतार असतो. आणि विचाराने अनेकविध विकारांचे आणि तज्जन्य अनेकविध संघर्षांचे कारण कळले, तर या संघर्षाचे निराकरण करता येईल, अशी विचारापासून, विचारप्रक्रियेपासून, अपेक्षा केली जात असते.

वैचारिका–विरुद्ध–वैकारिका

म्हणून वैचारिका जर विचारजन्य असतील तर त्यांच्यात, त्या कितीहि भिन्न भिन्न असल्या तरी, संघर्ष संभवत नाही. आणि म्हणून जेथे जेथे संघर्ष असतो तेथे तेथे विचार नसतो, हे एक निरपवाद असे सत्य मानावे लागते आणि यावरून जो निष्कर्ष निघतो तो असा की, ज्या अर्थी उदारमतवाद व साम्यवाद यांच्यात प्राणघातक संघर्ष दिसून येतो त्या अर्थी या दोन्ही वैचारिकांच्या मुळाशी विचार नसून विकारच असला पाहिजे.

हा विकार कोणता, हेहि पाहिले पाहिजे. उदारमतवाद्यांना वाटते की, आपली वैचारिका हीच सत्यनिष्ठ आहे. उलट, साम्यवाद्यांना वाटते की आपली वैचारिका हीच अधिक सत्यनिष्ठ आहे. आणि सत्यनिष्ठेशिवाय मानवी कल्याण संभवत नसल्यामुळे, आपणच सत्याचे व मानवी कल्याणाचे खरे कैवारी आहोत आणि आपला व आपल्या वैचारिकेने ठरविलेल्या सत्याचा विरोध करणारे जे जे असतील ते ते आपलेच नव्हे, तर सत्याचे व मानवी कल्याणाचेहि वैरी असलेच पाहिजेत; अशा विकारी अभिमानाने व अभिनिवेशाने या दोन्ही वादांचे पुरस्कर्ते ग्रस्त झालेले आहेत. हा अभिमान व अभिनिवेश हाच यांच्यातील प्राणघातक संघर्षाला कारणीभूत झालेला विकार होय. सारांश, उदारमतवाद व साम्यवाद यांना वैचारिकांऐवजी वैकारिकांचे रूप प्राप्त झाले आहे.

विचाराचे वैरी

विकार हा विचाराचा सर्वात मोठा वैरी आहे. मानवी जीवनातील सर्व प्राणघातक संघर्षाचे मूळ विकाराच्या आहारी जाण्यात साठलेले आहे. विकाराच्याहि मागे विचार असतो, बुद्धिनिष्ठ वैचारिका असते, असा एक भ्रम सांप्रत दृढमूल होऊन बसल्यासारखा दिसतो. वर म्हटल्याप्रमाणे, वस्तुस्थिति अशी आहे की; विचार व विकार यांच्यात स्वभावतःच, प्रकाश व काळोख यांच्यातील

विरोधाइतकाच, सर्वंकष विरोध आहे. मानवा – मानवातील संघर्ष हे विचार-जन्य नसून विकारजन्य असतात, हा निरपवाद असा सिद्धांत आहे. या संघर्षांचे निराकरण करण्यासाठीच आणि मानवी जगात शांतता, सद्भाव व सुव्यवस्था नांदविण्यासाठीच विचाराची आवश्यकता असते. पण एकाची विचारजन्य वैचारिका जेव्हा दुसऱ्याच्या हाती जाते तेव्हा ती, अभिमान – अभिनिवेशजन्य अशा विकारामुळे, संघर्षाचेच शस्त्र होऊन बसते आणि त्या वैचारिकेच्या मुळाशी असलेला विचार गतप्राण होतो व त्यावर केवळ विकारांचेच साम्राज्य पसरविले जाते.

यंत्राचा अनिर्बंध व निर्बुद्ध वापर हे जसे विद्यमान जगात सामाजिक संघर्षाचे मूळ होऊन बसले आहे, तद्वत् विज्ञान व तज्जन्य आधुनिक वैचारिका ह्याहि यंत्राप्रमाणेच पिशाच्च्यांच्या हाती कोलिते दिल्याप्रमाणे वर्तू लागल्या आहेत. यांचा विचाराशी, यथार्थ ज्ञानाशी व मानवी कल्याणाशी यत्किंचितहि संबंध नाही, हे ओळखल्याशिवाय आज जगात सर्वत्र माजलेला जो वैचारिक गोंधळ, म्हणजेच विकारांचा नंगा नाच, चालू आहे, तो कदापीहि संपुष्टात आणता येणार नाही.

अविद्या, अस्मिता, राग, द्वेष व अभिनिवेश हे पाच, मानवाला अनादि कालापासून लागलेले महाक्लेश, म्हणजेच मूलभूत विकार आहेत आणि ते, जग व जीवन यांच्या सत्यदर्शनाच्या आड येणारे दुराराध्य असे प्रत्यवाय आहेत, असा सांख्ययोग व वेदान्त या वैदिक दर्शनांनी अत्यंत सूक्ष्म विचाराने संशोधून काढलेला सिद्धान्त आहे. हे पाचहि महाक्लेश अथवा महाविकार विचाराचे, यथार्थ ज्ञानाचे व मानवी कल्याणाचे महावैरी आहेत. मानवी अंतःकरणावर जोपर्यंत यांचा वरचष्मा राहील तोपर्यंत विचार व सत्यदर्शी वैचारिका यांचा प्रभाव मानवी जीवनावर पडणे दुरापास्त आहे.

दुर्दैव हे आहे की, आधुनिक विज्ञान, तज्जन्य सर्व वैचारिका व विज्ञानजन्य यंत्रांचा अनिर्बंध वापर, हेच मानवी विचाराचे, यथार्थज्ञानाचे, प्रगतीचे व मानवी कल्याणाचे गमक मानले जाऊ लागले आहेत ! आधुनिक विज्ञानाच्या वैचारिक मर्यादा ध्यानात न घेता वैज्ञानिक शोध व यंत्रांचा अनिर्बंध वापर यांच्या हपापापायी आपली बुद्धि गहाण ठेवणे म्हणजेच 'बुद्धिवादी' बनणे, असे निर्बुद्ध समीकरण आज सर्व जगात रूढ होऊन बसले आहे. आधुनिक विज्ञानाचे शोध कितीहि नेत्रदीपक व विस्मयजनक असले, तरी त्यांचा मानवी कल्याणाकडे उपयोग कसा करावयाचा, हा स्वतंत्र विचाराचा प्रश्न आहे. हा विचार, मानवाला विकारांच्या आधिपत्याखालून विमुक्त करून त्याला सद् – विचारानुगामी कसे

बनवावयाचे, या प्रश्नाशी निगडित आहे. विज्ञान, वैज्ञानिक शोधांचा व्यावहारिक जीवनात अनिर्बंध वापर आणि विज्ञानावर बांडगुळाप्रमाणे (parasites) उगवलेल्या 'वैचारिका' यांच्या प्रभावामुळे निर्माण झालेल्या विकारांच्या मगरमिठीतून मानवाला सोडवून त्याला सद् – विचारानुगामी बनविण्याचा आणि त्याच्या कल्याणासाठी सर्वांगीण विकासासाठी काय केले पाहिजे हे ठरविण्याचा जो प्रश्न आहे, तो वैज्ञानिक विचारप्रक्रियेच्या ज्या मर्यादा आहेत त्या जाणून घेतल्याशिवाय कदापीहि सुटणार नाही.

वस्तुस्थिति अशी आहे की, विज्ञानानुगामी व तज्जन्य यंत्रानुगामी अशा ज्या आधुनिक **'वैचारिका'** म्हणून मानल्या जातात, त्या **'वैचारिका'** नसून त्या **'वैकारिका'** आहेत आणि वर्तमान जगातील प्राणघातक संघर्ष हे वैचारिकांचे संघर्ष नसून वैकारिकांचे संघर्ष आहेत.

एकाच दृष्टांताने हे विधान स्पष्ट करता येते. आधुनिक विज्ञानात 'इझम'ला यत्किंचितहि स्थान नाही. जुने न्यूटोनियन् फिजिक्स आणि नवे रिलेटिव्हिटी व क्वांटम् फिजिक्स यांच्यात जमीन–अस्मानचे अंतर आहे. तरीपण 'न्यूटोनिझम्', 'आइन्स्टीनिझम्', 'प्लँकीझम' असे शब्द विज्ञानात वापरले जात नाहीत. तो शुद्ध मूर्खपणा आहे, हे विज्ञान ओळखते पण याच विज्ञानामुळे प्रस्फुरित झालेले 'वाद' मात्र मार्क्सिझम्, सोशॅलिझम, कम्युनिझम, आयडियालिझम, रियालिझम, युटोपियानिझम, इत्यादि 'इझम्'ची रूपें घेऊन मानवी जीवनात सत्यदर्शी वैचारिका म्हणून, सर्रास मिरवू लागले आहेत. हे एक अगडबंब थोतांड आहे. 'इझम्' म्हणजे वैचारिका नसून **वैकारिका**, हे सत्य ओळखल्याशिवाय वर्तमान जगातील वैचारिक गोंधळ व तज्जन्य संघर्ष संपुष्टात येणार नाहीत.

卐

सावरगाव–डुकरे

सर्वांगीण विकासाच्या आघाडीवर आदर्श गाव

प्रा. श्री. गो. काशीकर

भारतातील एखाद्या सामान्य खेडयाचे चित्र डोळयासमोर आणा. लहान-लहान झोपडया अस्ताव्यस्त पसरलेल्या आहेत. बाहेर भरपूर हवा–प्रकाश असूनहि झोपडी कोंदट, धुराने भरलेली व अंधारी आहे. समोरच घाण पाण्याची डबकी व गोठा असून तेथून शेण–घाणीचा दर्प व माशांचा घोंघाट सगळीकडे पसरला आहे. रस्ते–रस्ते कसले ते, केवळ चिंचोळया पट्टया–पावसाळयात चिखलाने व इतर वेळी धुळीने भरलेले आहेत. दारिद्र्याची लक्तरे प्रत्येकाच्या घरावर लोंबत आहेत. व्यसने, कर्जबाजारीपणा व भांडणे यांचे व्रण प्रत्येकाच्या अंगाला पडले आहेत. रोज भल्या पहाटी न्याहारी घेऊन शेतात जावे, दिवसभर राबावे व संध्याकाळी जड झालेलं शरीर व मन उचलत खोपाटात ढकलून द्यावं. सारा शुकशुकाट. जग काय आहे ह्याचा जणू पत्ताच नाही. कधीकाळी कुठून जिल्हा-ळयाच्या माणसाचं पत्र जरी आलं तरी ते वाचून घेण्यासाठी दोघाचौघा तथाकथित शिकलेल्या लोकांचे पाय धरावे लागतात.

आणि ह्या पार्श्वभूमीवर सावरगावचे चित्र पहा. सावरगावच्या पोवाडया-प्रमाणे आपल्यालाहि वाटेल, "प्रत्यक्ष पहिलं आजवर ज्याचं ऐकत होतो नाव। खरच आहे सुंदर सावरगाव ।।"

बुलढाणा जिल्हयात चिखलीपासून तीन मैलावर आडवळणाच्या जागी असलेलं हजार – बाराशे वस्तीचे गाव. त्या ठिकाणी काय काय असेल असं आपणाला वाटतं. पाहिजे ते सारं काही आहे.

काही घरे पक्की बांधलेली व काही कुडाची पण व्यवस्थित आहेत. रस्ते गावाच्या मानाने मोठे, सरळ व स्वच्छ आहेत. त्याच्या दोन्ही बाजूंना एकूण ५००० फूट लांबीच्या नाल्या बांधून काढलेल्या आहेत. जागोजाग कचरापेटया व मुत्रीघरे आहेत. रस्त्याच्या कोपऱ्यावर कंदील आहेत. घराच्या किंवा विहि-रीच्या भोवती डबकी आढळत नाहीत. प्रत्येक घरावर नावाच्या पाटया आहेत.

ह्या लहानशा खेडयात संस्था तरी किती आहेत ! हजार वस्तीच्या ह्या गावात दोन हजार पुस्तके व ३० नियतकालिके असलेले सुभाष वाचनालय आहे. इंग्रजी ८ वी पर्यंत शाळा आहे, दवाखाना आहे, सूतिकागृह आहे. भारत व्यायाम

शाळा आहे. व्हॉलीवॉल, बॅडमिंटन व हुतुतु यांची क्रीडांगणे आहेत. सार्वजनिक रेडिओ असलेले मनोरंजन केन्द्रहि आहे. गावकरी दरवर्षी 'ज्ञानमंदिर' नावाचे हस्तलिखित काढतात. दोन उत्कृष्ट दर्जाची कलापथकेहि ह्या गावात




सावरगाव येथील सुभाष वाचनालय व मनोरंजन केंद्र

आहेत. १९५५ मध्ये अमरावती येथे झालेल्या वैदर्भीय कलापथकांच्या स्पर्धेत येथील कलापथकाने पहिला क्रमांक मिळविला होता. येथे भजनमंडळीहि आहे व तिने १९५६ मध्ये चिखली येथील भजन-मंडळींच्या स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळविला. सहकारी शेतीचा प्रयोगहि ह्या ठिकाणी अल्प-प्रमाणावर करण्यात आला आहे. तसेच मृतपशूंच्या अस्थिचर्माचा उपयोग करण्यासाठी मृतपशूनिकास केन्द्र येथे कार्य करीत आहे. आणि लक्षात ठेवा, ह्या नुसत्या पाट्या लावणाऱ्या संस्था नाहीत, तर प्रत्यक्ष कार्य करणाऱ्या जिवंत संस्था आहेत. जीवन विकास सहकारी समिति नावाच्या १९५२ साली स्थापन झालेल्या मध्यवर्ती पंजीयन संस्थेच्या मार्गदर्शनाखाली व नियंत्रणाखाली या सर्व संस्था सुसूत्रपणे कार्य करीत असतात.

परंतु आश्चर्य वाटण्यासारख्या गोष्टी याहूनहि निराळ्याच आहेत. कायद्यांनी, मोठमोठ्या योजनांनी व मोठ्यामोठ्यांच्या प्रयत्नांनी जे इतरत्र

फारसे साधले नाही ते येथे साधले आहे. एकेकाळी दारूच्या पेल्यात गटंगळचा खाणारा हा गाव आज त्या व्यसनापासून पूर्णपणे मुक्त आहे. दारूत सदैव




सावरगावच्या नागरिकांची प्रतिज्ञा

डुंबणाऱ्या येथील नारायणराव पाटलांनी दारू कशी सोडली ही कथा गडकऱ्यांच्या एकच प्यालावरील उतारा व त्याहूनहि अधिक रोमहर्षक आहे. तसेच गावात जातिभेद नाहीत, अस्पृश्यता नाही. स्पृश्यास्पृश्यांचे सहभोजन, हळदीकुंकू, एकत्रित समारंभ हे कार्यक्रम येथील लोकांच्या अंगवळणी पडले आहेत. गावात निरक्षर मनुष्य सहसा दृष्टीस पडावयाचा नाही. भारतीय खेडचांचा शाप ठरलेल्या कर्जबाजारीपणाचा तर येथे मागमूसहि नाही. गावात भिकारीहि नाही. गावकऱ्यात भांडणे नाहीत, दुही नाही. आपापल्या पक्षनिष्ठा बाजूला ठेऊन सारे गावकरी गावची सारी कामे एकजुटीने करतात. विकेन्द्रीकरणावर आधारलेली लोकशाही यशस्वी होण्याकरिता स्थानिक शासन संस्थांची कामे कोणत्या व्यापक मनोभूमिकेवरून केली पाहिजेत ह्याचे प्रात्यक्षिक सावरगावच्या ग्रामपंचायतीत पहावयास मिळते.

पण सावरगावचे खरे कौतुक करावयास पाहिजे तेथील लोकांच्या कल्पकतेबद्दल. शहरी लोकांनी किंवा केवळ पुस्तकी विद्या मिळविणारांनी खेड्यासाठी बनविलेल्या योजना बहुधा 'भाकरी मिळत नाही तर फळे खा' हे सांगण्यासारख्या असतात. अशा वरून लादलेल्या आणि त्याहि अवास्तव योजना अपयशी


ठरण्याचाच संभव फार असतो. सावरगावच्या लोकांनी स्वतःची परिस्थिति लक्षात घेऊन स्वतःच स्वतःच्या पंचवार्षिक योजना बनविल्या आहेत, आणि अनुकरणाच्या



सावरगाव येथील वार्ताफलक

मागे न लागता खेड्यांचे काही प्रश्न खेड्याच्या पद्धतीने सोडविण्यात विशेष कल्पकता दाखविली आहे. उदाहरणार्थ, खेड्यातील रस्त्यांचा प्रश्न हा एक अतिशय कठिण प्रश्न समजला जातो शहरी विद्वानांनी यासंबंधी जे उपाय सुचविले ते अतिशय खर्चाचे असल्यामुळे अशक्य कोटीतले झाले आहेत. परंतु सावरगावच्या लोकांनी रस्त्यासाठी दगड, मुरुम, गिट्टी काहीहि न वापरता केवळ काळी माती व रेतीचा उपयोग करून बाराहि महिने रहदारीला योग्य राहील असा रस्ता बनविला आहे. रस्ता बनविण्याची इतकी सोपी. कमी खर्चाची व टिकाऊ पद्धति पाहून अमेरिकन तज्ज्ञ श्री. एफ्. आय्. वेल यांनी लिहून ठेवले आहे, "I am of the opinion that this is the answer to village road.' तसेच, गावात ठिकठिकाणी झाडाखाली ओटे बांधून चारचौघांनी एकत्र बसण्याची व्यवस्था केली आहे. गावाच्या मध्यभागी एक प्रशस्त चौक बनविला आहे. जवळच वार्ताफलकावर रोजच्या महत्त्वाच्या बातम्या गावकऱ्यांकरिता लिहून ठेवल्या जातात. गावात कुठेहि काही कार्यप्रसंग असल्यास तो हनुमानमंदिरातील दिवाणखान्यात साजरा करण्यात येतो. अशा रीतीने मंदिराला धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्याचे केंद्र बनवून वर्तमानयुगात मंदिरांचा उपयोग कसा व्हावयास

पाहिजे, याचा एक सुन्दर नमुना सावरगावच्या लोकांनी प्रस्तुत केला आहे. ावात ठिकठिकाणी भिंतीवर उत्कृष्ट संतवचने लिहून आणि रोज सायंकाळी स. ेक



सावरगाव येथील बोध वाक्ये

प्रार्थना ाचरून सावरगावने उत्तम संस्कारांचे वातावरण स्वत:भोवती निर्माण केले आहे. दर आठवड्याला एक दिवस गावात प्रभात फेरी निघते. या वेळी देशभक्तिपर व समाजहितपर गीते गाइली जातात व प्रत्येक घरातून मूठमूठ ज्वारी गोळा करण्यात येते. या मुष्टिसंचयातून होणारे उत्पन्न सार्वजनिक कार्यासाठी उपयोगात आणले जाते. या साऱ्याच योजना खेड्यातील जीवनपद्धतीशी पूर्णपणे अनुरूप आणि म्हणूनच अतिशय कौतुकास्पद आहेत.

या लहानशा गावाने आजवर पंचायतपर्व, सेवादलशिबिर, बुनियादी शिक्षण शिबिर, सर्वोदय शिबिर, जिल्हा विकास परिसंवाद, जिल्हा शिक्षक परिषद, खेळाचे सामने इ० कितीतरी मोठमोठे कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडले आहेत व राज्यपाल श्री. श्रीप्रकाश, राज्यपाल श्री. ह. वि. पाटसकर, केंद्रीय मंत्री श्री. पंजाबराव देशमुख, न्यायमूर्ति बी. पी. सिन्हा, श्री. गोपाळराव खेडकर, श्री. एस्. एम्. जोशी, श्री. आ. रा. देशपांडे आदि थोरांकडून उत्तम अभिप्राय मिळविले आहेत.

भारतदेश खेड्यात राहतो. म्हणून खेड्यांच्या विकासावरच भारताचा विकास आहे. हा विकास कशा पद्धतीने व्हावा याचा अचूक मार्ग सावरगाव दाखवीत आहे.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संमेलनातील कार्यकर्त्यांचा परिचय

श्री. य. गो. मालोदे

सावरगाव डुकरे हे गाव अगदीच लहान. तिथे श्रीमंतहि कोणी नाही, पण कर्तबगारीच्या दृष्टीने हे गाव कित्येक मोठ्या गावांनाहि मागे पाडील असे आहे. त्यामुळेच विदर्भ साहित्य संमेलनासारखा मोठा सोहळा यंदा ह्या गावी भरत आहे. ज्यांच्या कर्तृत्वाने हे संमेलन यशस्वी होणार ह्याची खात्री आहे, अशा प्रमुख कार्यकर्त्यांचा परिचय येथे देत आहे.

श्री. संतोषराव नारायणराव पाटील

हे स्वागत मंडळाचे अध्यक्ष असून सावरगावच्या विकासकार्याचे प्राण आहेत. १९३५ पासून त्यांनी श्री. सखारामपंत पाटील, श्री. त्र्यंबकराव पाटील व श्री. पुंडलीकराव पाटील ह्या आपल्या सहकाऱ्यांबरोबर ग्रामसुधारणेला वाहून घेतले आहे. १९४३ ते १९५१ पर्यंत ते तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष होते. १९४५ ते ५० पर्यंत जिल्हा सेवादलाचे संघटक, १९४८ ते १९५५ पर्यंत चिखली जनपदाचे अध्यक्ष, नंतर चिखलीच्या शेतकी संस्थेचे चिटणीस, आणि आता जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष व विदर्भ विभागीय ग्रामोद्योग सल्लागार समितीचे सदस्य ह्या नात्यांनी श्री. संतोषराव ग्रामोन्नतीच्या विविध कार्यात धडाडीने भाग घेत आहेत. ग्रामीणांच्या विकासाबद्दल आत्यंतिक तळमळ, समतोल विचारसरणी, कल्पकता आणि धडाडी ह्या गुणांमुळे संतोषरावांनी ग्रामविकासाचे आपले ध्येय साध्य करून दाखविले आहे. सावरगावच्या विकास कार्याचे ते प्राण आहेत, एवढे सांगितले म्हणजे पुरे.



प्रा. प्रभाकर वामन ऊर्ध्वरेषे



विदर्भ साहित्य संघाच्या खामगांव शाखेला अनेक उत्साही कार्यकर्ते लाभले आहेत त्यांपैकी प्रा. ऊर्ध्वरेषे एक महत्त्वाचे कार्यकर्ते होत विदर्भ साहित्य संघाच्या केन्द्रीय कार्यकारी मंडळाचेहि ते सदस्य आहेत. खामगाव येथील महाविद्यालयात ते इंग्रजीचे प्राध्यापक असून वृत्तपत्रातून व नियतकालिकातून त्यांनी टीकात्मक लिखाण विपुल प्रमाणांत केले आहे. गॉर्कीची 'आई' इत्यादि ५ ७ पुस्तकांचे त्यांनी मराठीत अनुवादहि केले आहेत. संमेलनाच्या स्वागत मंडळाचे ते कार्याध्यक्ष आहेत.

श्री. गोपाळ विष्णु महाजन

संमेलनाच्या कोषाध्यक्षपदाचे जोखमीचे काम श्री. महाजन यांनी स्वीकारले असून गेल्या १०-१२ वर्षांपासून ते चिखलीच्या शेतकी संस्थेचे अध्यक्ष या नात्याने समाजकार्य करीत आहेत. चिखली शहर काँ. कमिटीचे ते अध्यक्षहि आहेत. चिखलीतील एक प्रमुख व प्रतिष्ठित नागरिक आणि दिलदार व प्रेमळ कार्यकर्ते म्हणून श्री. महाजन बुलढाणा जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. त्यांची सौजन्यपूर्ण वागणूक त्यांच्या अंतःकरणाचे मोठेपण पटविते.

श्री. राजाभाऊ मलकाप्पा बोंद्रे

गेल्या १५ वर्षांपासून चिखली नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून आपल्या कार्याने श्री. बोंद्रे अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. उदार अंतःकरणाचे म्हणून त्यांची ख्याती आहे. ते एक उत्तम शेतकरीहि आहेत. संमेलनाच्या स्वागतमंडळाचे ते उपाध्यक्ष आहेत.

श्री. सखाराम अर्जुन पाटील



सावरगावकर विकास कार्याच्या चार आधारस्तंभापैकी श्री. सखारामपंत हे महत्त्वाचे आधारस्तंभ होत. जीवन-विकास सहकारीसंस्थेचे ते अध्यक्ष असून चिखली जनपद सदस्य व न्यायपंचायतीचे अध्यक्ष ह्या पदावरून ते मोलाचे ग्रामीण विकासाचे कार्य करीत आहेत. चिखली येथील कापूस बाजार मंडळाचे ते तीन वर्षे अध्यक्ष होते. उत्तम शेतकरी व धडाडीचे कार्यकर्ते म्हणून सखारामपंतांची ख्याती आहे. विदर्भ साहित्य संमेलनाच्या स्वागत सरचिटणीसांची महत्त्वाची जबाबदारी ह्यावेळी त्यांनी स्वीकारली आहे.

श्री. गोविंददासजी भाटिया

बुलढाणा जिल्ह्यातील दानशूर नागरिक म्हणून श्री. गोविंददासजी प्रसिद्ध आहेत. खामगाववरून ते विधानसभा-सदस्य म्हणून निवडून आले आहेत. बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे व खामगाव जनपद सभेचे अध्यक्ष ह्या नात्यानेहि ते भरीव सामाजिक कार्य करीत आहेत. संमेलनाच्या स्वागतमंडळाचे तेहि एक उपाध्यक्ष आहेत.


ह्याशिवाय डॉ. पु. गो. एकबोटे, खामगाव; डॉ. ना. के. महाजन, चिखली; श्री. दिवाकर आगाशे, बुलढाणा; श्री. वा. व्यं. फंजपूरकर, चिखली; श्री. माधवराव देशमुख, सेलसूर; श्री. श्रीराम पाटील, म्हसला बु।। व श्री. नरेन्द्र बोर्डे, सावरगाव डुकरे ह्या कार्यकर्त्यांचाहि उल्लेख करणे आवश्यक आहे.

卐

विदर्भ साहित्य संमेलन

अधिवेशन २२ वे, सखरगात (डुकरे)

दि. १३ व १४ फेब्रुवारी १९६०



उद्घाटक

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण,

मुख्यमंत्री, मुंबई राज्य.

★

अनुक्रमणिका

२२ वे विदर्भ साहित्य संमेलन, सावरगाव

स्वागत कार्यकारी मंडळ

स्वागताध्यक्ष—श्री. संतोषराव पाटील, सावरगाव (डुकरे).

कार्याध्यक्ष—प्रा. प्र. वा. ऊर्ध्वरेषे, खामगाव.

कोषाध्यक्ष—श्री. गो. वि. महाजन, चिखली.

स्वागत सरचिटणीस—श्री. स. अ. पाटील, सावरगाव (डुकरे).

उपाध्यक्ष—श्री. राजाभाऊ बोंद्रे, अध्यक्ष, म्यु. क. चिखली; श्री गोविंदासजी भाटिया, विधानसभा सदस्य, खामगाव; डॉ. पु. गो. एकबोटे, खामगाव; डॉ. ना. के. महाजन, चिखली; श्री. लक्ष्मणराव भटकर, संसद सदस्य, चिखली.

चिटणीस—श्री. दिवाकर आगाशे, बुलढाणा; श्री. वा. त्र्यं. फैजपूरकर, चिखली; श्री. माधवराव रामराव देशमुख, सेलपूर; श्री. श्रीराम देवसिंग पाटील, म्हसला बु॥; श्री. नरेंद्र वोर्डे, सावरगाव (डुकरे).

सभासद—श्री. पंढरीनाथ सीताराम पाटील, चिखली; श्री. हरी त्र्यंबक सावजी, चिखली; श्री. पु. ल. पाटील, सावरगाव (डुकरे); श्री. ड. शि. सरदार, सावरगाव (डुकरे); डॉ. रा. ग. खेकाळे, चिखली; श्री. त्र्य. पु. पाटील, सावरगाव (डुकरे); श्री. अ. ह. पाटील, बायगाव; श्री. त्र्यं. न. पाटील, देऊळगाव राजा; डॉ. शुक्ल, पिंपळगावसराई; श्री. आत्माराम पांडे, बुलढाणा; श्री. नामदेवराव मेहेत्रे, चिखली; डॉ. पी. यु. सरनाईक, चिखली; श्री. पु. आ. पवार, चिखली; श्री. गु. ना. देशमुख, साखळी; प्रा. वि. ए. तारे, खामगाव; प्रा. पद्माकर डावरे, खामगाव; श्री. शंकरराव देशमुख, विधानसभा सदस्य, मेहेकर; श्री. म. मु. कोलवाडकर, मेहेकर.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य सम्मेलन
अधिवेशन २२ वे, सावरगाव-डुकरे

कामाच्या सोयीसाठी नियुक्त केलेल्या समित्या

(१) **अर्थ समिति**—१. श्री. बाबासाहेब सखाराम अर्जुन पाटील, २. श्री. पुंडलिकराव लक्ष्मण पाटील, ३. श्री. संतोषराव नारायण पाटील, ४. श्री. राजाभाऊ वोंद्रे, ५. गो. वि. ऊर्फ बाबु सावजी, ६. श्री. वा. व्यं. फैजपूरकर.

(२) **मंडप समिति**—१. श्री. नारायणराव आश्रुजी पाटील, २. श्री. हिंमतराव वानजी पाटील, ३. श्री. रामराव परभत पाटील, ४. श्री. त्र्यंबक रघुजी पाटील, ५. श्री. रतन आश्रुजी पाटील, ६. श्री. नथ्थु सहादु जाधव.

(४) **भोजन समिति**—१. श्री. त्र्यंबकराव पुंजाजी पाटील, २. श्री. हिंमतराव वाळाजी पाटील, ३. श्री. संतोषराव नथ्थुजी पाटील, ४. श्री. गुलाबराव दौलत पाटील, ५. श्री. आश्रुजी बळवंत पाटील, ६. श्री. बाज़ीराव दगडूजी पाटील, ७. श्री. शामराव नारायण पाटील, ८. श्री. उत्तम शिवराम सरदार, ९. श्रीमती गयाबाई लक्ष्मण डुकरे, १०. श्रीमती पन्याणबाई यशवंत.

(४) **कार्यक्रम व्यवस्था समिति**—१. श्री. संतोषराव नारायणराव पाटील, २. श्री. नरेंद्र वोर्डे, ३. श्री. राजाराम रामचंद्र सिताफळे.

(५) **सांस्कृतिक कार्यक्रम समिति**—१. श्री. वा. व्यं. फैजपूरकर, २. श्री. मनोहर जानराव पाटील, ३. श्री. आसाराम जाणू मिस्तरी, ४. श्री. लक्ष्मण नारायण पाटील, ५. श्री. रूस्तुम बापुराव वायाळ.

(६) **प्रचार समिति**—१. श्री. नरेंद्र बोर्डे, २. श्री. विठ्ठल सोमाजी पाटील, ३. श्री. शंकरराव सखाराम पाटील, ४. श्री. मनोहर जानराव पाटील, ५. भाऊराव तुळशीराम जाधव.

अनुक्रमणिका

(७) **स्वास्थ्य समिति**—१. श्री. विष्णु पुंजाजी पाटील, २. श्री. नारायण राजाराम पाटील, ३. श्री. यशवंतराव कुसळकर, ४. श्री. फुलसींग बंडूजी शिंगणे, ५. श्री. तुकाराम बाळाजी पाटील, ६ श्री. लिलाबाई बोकील, ७. श्री. तुळशीराम नामा जाधव.

(८) **प्रदर्शन समिति**—१. श्री. रामभाऊ उखर्डा मंगड. २. श्री. रामराव कमळु पाटील, ३. श्री. राजाराम रामचंद्र सिताफळे, ४. श्री. भिकाजी आश्रुजी जाधव, ५ श्री. श्रीमती गयाबाई हरि पाटील.

(९) **पाणी व्यवस्था समिति**—१. पुंडलीक लक्ष्मण पाटील, २. श्री. त्र्यंबक बाळाजी पाटील, ३. श्री. साहेबराव रामा पाटील, ४. श्री. पुंडलीक सिताराम पाटील, ५. श्री. राजाराम जयाजी जाधव.

(१०) **प्रकाश व्यवस्था समिति**--१. श्री. आसाराम जाणू मिस्तरी, २. श्री. सदाशिव गणपत मिस्तरी, ३. श्री. भिकन नारायण पाटील, ४. श्री. मोहन भिमाजी पाटील, ५. श्री. लक्ष्मण गणपत नाटकर.

(११) **कार्यालय व्यवस्था समिति**—१. श्री. नरेंद्र वोर्डे, २. श्री. पंडितराव माणिकराव पवार, ३. श्री. फुलसींग बंडू शिंगणे.

ज्यांना सत्कार आवडत नाही त्यांचा सत्कार

प्रा. श्री. गो. काशीकर

प्रसिद्धीच्या लखलखाटात मोठमोठी कामे करणे एकवेळ सहज शक्य असते, परंतु एकाकी जीवनाची मिळमिळती ज्योत हाती धरून अंधःकारयुक्त अरण्यातून मार्ग काढणे महा कठिण! सत्ता नाही, संपत्ति नाही, कीर्ति नाही — आणि त्यांची हावहि नाही — अशा स्थितीत चिकाटीने समाजकार्य करीत राहणे म्हणजे आत्माहुतीचे द्वारा चालविलेला अखंड यज्ञ होय, अखंड यज्ञच — होय! क्षणभर जळणे सोपे पण असे अखंड धुमसत राहणे कठिण! कळसाचे आकर्षण सर्वांना असते पण पाया होण्याची हिंमत फारच थोड्यात असते. तथापि पायावरच सगळ्या इमारतीची मदार असते हे लक्षात ठेवले पाहिजे. स्वार्थनिरपेक्ष बुद्धीने, जनसेवेच्या खऱ्या तळमळीने, आपणास प्रामाणिकपणे जे सत्य प्रतीत होईल त्यावर निष्ठा ठेऊन चिकाटीने स्वतःला झिजविणारे महापुरुष हेच कोणत्याहि समाजविकासाला आधारभूत असतात. स्वतः झिजून ते इतरांना सुगंध देतात; स्वतः जळून इतरांना प्रकाश देतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या देशात अशा त्यागी, ध्येयनिष्ठ कार्यकर्त्यांची अखंड परंपरा चालू होती. एका पुढाऱ्याच्या नावाबरोबर सहस्रावधि सेवकांची नावे घ्यावीत एवढी त्यांची संख्या होती. आज स्वातंत्र्यकाळात अशा त्यागी सेवकांची समाजाला अत्यंत गरज आहे. पण दुर्दैवाने त्यांची संख्या कमी कमी होत चालली की काय असा संशय येतो. अशा वेळी अंधारात राहून काम करणारे जे काही थोडेफार समाजसेवक आहेत त्यांना प्रकाशात आणून त्यांच्यापासून इतरांनी — विशेषतः नव्या पिढीने — कित्ता गिरवावा अशी परिस्थिति निर्माण करणे आवश्यक आहे. विदर्भ साहित्य संघाने प्रस्तुत संमेलनात आयोजित केलेल्या सत्कारसमारंभाचा हेतु त्या त्या समाजसेवकांच्या सेवेचा गौरव करावा हा तर आहेच पण त्यावरोबरच वरील मार्गदर्शनाचाहि हेतु त्यात आहे.

हा हेतु आहे म्हणूनच सत्काराला काही समाजसेवक तयार झाले आहेत. केवळ व्यक्तिगत सत्कार असता तर कदाचित् ह्यांपैकी एकहि सत्काराला तयार झाले नसते.

अंधारात राहून काम करू इच्छिणारांची नावे मिळविणे देखील कठिण असते. नावे मिळविल्यावर सत्काराकरिता संमति मिळविणे त्याहूनहि कठिण.


कारण सत्कार हा त्यांना एक मोठा प्रहारच वाटतो. ह्या समारंभाच्या मानकऱ्यांपैकी एक—श्री. शं. गो. ऊर्फ अण्णासाहेब डवीर—यांनी कळविलेली मनःस्थिति प्रायः प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. ते म्हणतात, "तुम्ही माझ्यासारख्या लहानशा माणसानिमित्त ठरविलेला कार्यक्रम कोणत्या हेतूने ठरविला व आपल्याला फलप्राप्ति काय होणार हे माझ्या ध्यानात येत नाही. व या कार्यक्रमात मला स्वारस्यहि वाटत नाही.···रंगभूमीवर सर्व जनतेपुढे येऊन काम करण्याचे सामर्थ्य माझ्याजवळ नाही. मी चार भिंतीच्या आत अल्पस्वल्प काम करतो. स्वभावधर्माप्रमाणे समाजात मी समरस होऊ शकत नाही. कामावाचून बोलणे सुचतहि नाही. एकांतात राहणे बरे वाटते. अशाप्रकारे मी एकाप्रकारे मुका असलेला व आचारविचाराने भिन्न असलेला मनुष्य तुमच्या चौकटीत कसा बसू शकेल याची मला चिंता वाटते व त्यामुळे आपले निमंत्रण हे माझ्या दृष्टीने संकट वाटू लागले आहे."

विदर्भ साहित्य संघ ही साहित्यिक तशीच सांस्कृतिक संस्था असल्यामुळे व सांस्कृतिक व्यासपीठ निर्माण करणे ही आजची नितान्त आवश्यकता असल्यामुळे त्याला पोषक असा हा सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला गेला आहे. ह्या समारंभातील मानकरी केवळ थोर समाजसेवक आहेत एवढेच नव्हे तर साहित्याच्या क्षेत्रातहि त्यांनी कामगिरी बजाविली आहे हे विशेष होय.

आणखी विशेष हा की ह्या मानकऱ्यात आर्यसमाजी व हिंदुमहासभेच्या विचाराचे, सत्यशोधक व ब्राह्मणेतर पक्षाचे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे, काँग्रेसचे व विशेषतः सर्वोदयवादी विचारांचे आणि निःपक्ष वृत्तीचे अशा भिन्न भिन्न विचारसरणीचे कार्यकर्ते एकत्रित झाले आहेत. परंतु समाजाची कळकळ ह्या सर्वांत सारखी आहे. आपापल्या ध्येयांना त्यांनी जीवन वाहिले आहे. सत्ता, संपत्ति आणि कीर्ति यांचो हाव त्यांनी धरली नाही. आपल्याला जे सत्य प्रतीत झाले त्याचा त्या सर्वांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने व चिकाटीने पाठपुरावा केला आहे. आणि त्यांच्या ह्या गुणांचा गौरव करण्यासाठीच हा सत्कारसमारंभ आहे. परंतु हे भिन्न भिन्न विचारसरणीचे लोक एका व्यासपीठावर आणता आले ह्यात विदर्भ साहित्य संघाचाहि फार मोठा गौरव आहे. विदर्भ साहित्य संघाच्या पक्षनिरपेक्ष धोरणाची ही साक्ष आहे. सरस्वतीच्या मंदिरात कोणीहि अस्पृश्य नाही, याची यात प्रचीति आहे. सांस्कृतिक व्यासपीठाच्या भव्य कल्पनेची ह्यात झलक आहे.

ह्या सत्कार समारंभाचे मानकरी पुढीलप्रमाणे होत.

श्री. पन्नालाल व्यास, खामगाव (जन्म १८८१)—सत्कारासाठी निवडलेल्या मानकऱ्यात सर्वांत वृद्ध असलेले खामगावचे श्री. पन्नालाल व्यास यांनी



(तरुणपणीचे छायाचित्र)

राजकीय चळवळीतील शूर सेनानी म्हणून आपले आयुष्य व्यतीत केले आहे. ब्रिटिश अमदानीत कोणत्याहि आपत्तीची पर्वा न करता निधड्या छातीने त्यांनी निरनिराळ्या चळवळीत भाग घेतला. कुस्ती, मलखांब, इ० व्यायामाचा छंद त्यांना लहानपणापासूनच असल्यामुळे लढवय्येपण त्यांच्यात पूर्णपणे मुरलेले आढळते.

१९०४ मध्ये त्यांनी कांग्रेसमध्ये प्रवेश केला; व बंगाल विभाजनाविरुद्धच्या आंदोलनात धडाडीने भाग घेतला. लो. टिळकांचे ते निःसीम भक्त. त्यामुळे १९०८ मध्ये लोकमान्यांना शिक्षा झाली त्यावेळी यांचेवरहि राजकीय खटला भरण्यात आला. होमरूलच्या चळवळीतहि त्यांनी भाग घेतला. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीत व बार्डोलीच्या सत्याग्रहात त्यांनी धडाडीने भाग घेतला. या वेळेपर्यंत ते काँग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यानंतर त्यांनी आर्यसमाजाच्या व विशेषतः स्वामी श्रद्धानंदांच्या शुद्धिसंघटन कार्याला वाहून घेतले. खामगाव येथे प्रताप व्यायाम शाळा व आर्यसमाज यांची स्थापना केली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदुमहासभा यांच्याहि कार्यात त्यांनी भाग घेतला. पन्नालालजींची सामाजिक व राजकीय चळवळीमधील कामगिरी केवळ विस्मयजनक आहे. मानस-

पूरच्या मोर्च्यात त्यांनी भाग घेतला. सतत चौदा दिवस आंदोलन चालविले. आर्यसमाज व हिंदुमहासभेच्या वतीने हैद्राबाद सत्याग्रहाचे कार्यहि त्यांनी अत्यंत धडाडीने केले. कलकत्ता ते मुंबई आणि लाहोर ते हैद्राबाद प्रचाराच्या मोहिमा काढल्या. पाद्री, मौलवी इत्यादि लोकांशी शास्त्रार्थासाठी विवाद केले. सर्व प्रकारच्या लोकात प्रचार करता यावा म्हणून इंग्रजी, मराठी, हिन्दी, उर्दू, पर्शियन, अरेबिक, गुजराथी व राजस्थानी या भाषांचे त्यांनी अध्ययन केले. साऱ्या आयुष्यभर या ना त्या कार्यासाठी ते सतत लढत राहिले. आज वयाला ८० वर्षे झाल्यामुळे त्यांचे शरीर थकले आहे. त्यांना जागचे उठवत नाही. तरी देखील बसल्या जागेहून, विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याचे समाजकार्य ते करीतच असतात.

श्री. शं. गो. डवीर (जन्म १८९२)—सन्मानाचे दुसरे मानकरी श्री. शं. गो. ऊर्फ अण्णासाहेब डवीर म्हणजे विदर्भातील एक अत्यंत त्यागी व ध्येयनिष्ठ समाजसेवक. ते वाशीम येथील रहिवासी. धंदा वकिलीचा पण जेमतेम निर्वाहाला मिळविण्यापलिकडे त्यांनी वकिलीत कधीच जास्त लक्ष घातले नाही.



आणि आता तर त्यातूनहि ते निवृत्त झाले आहेत. त्यांचे कौटुंबिक जीवन अत्यंत अडचणीचे असूनहि सारे आयुष्य त्यांनी समाजकार्याला वाहिलेले आहे. अण्णासाहेबांचे संपूर्ण जीवन म्हणजे एक खडतर व्रत आहे, तपस्या आहे. १९२० च्या असहकारितेच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. १९३० च्या जंगल-सत्याग्रहात भाग घेतल्यामुळे त्यांना शिक्षाहि झाली. लो. टिळकांच्या पक्षाचे तसेच काँग्रेसचे कार्य त्यांनी अत्यंत चिकाटीने केले. [illegible] १९२७ च्या

हिन्दुमुस्लिम झगड्यात पद्मतीर्थाचे प्रकरण थेट प्रीव्ही कौंसिलपर्यंत लढवून त्यात १९४३ साली यश मिळविण्याची जी चिकाटी अण्णासाहेबांनी दाखविली ती केवळ असामान्य होय. हा लढा लढण्यासाठी त्यांनी आपली संपत्ति, आरोग्य व कायद्याचे ज्ञान सारे काही पणाला लावले होते. १९३१ पासून अण्णासाहेबांचे मन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे वळले व त्याचे जिल्हा संघचालक म्हणून ते काम करीत असतात. काही वर्षापूर्वी वत्सगुल्म – माहात्म्य ह्या पोथीचे संशोधन करून ती प्रसिद्ध करण्याचे अत्यंत किचकट कार्य अण्णासाहेबांनी पूर्ण केले. पोथीचे संशोधन करता यावे म्हणून उतारवयातहि त्यांनी संस्कृत भाषेचा विशेष अभ्यास सुरू केला, पोथीतील तीर्थक्षेत्रे शोधून काढण्यासाठी शरीर थकले असूनहि तरुणाच्या उत्साहाने त्यांनी जागोजाग जाऊन नाले, विहिरी, भग्न इमारती यांचा तपास केला, गावोगाव हिंडून पैसा जमा केला व मुद्रणव्यवस्थाहि स्वतःच बघितली. लहान सहान कार्य देखील अत्यंत काळजीपूर्वक करण्याची त्यांची हातोटी केवळ विलक्षण आहे. त्यांचे भाषाशुद्धीचे कार्यहि उल्लेखनीय आहे. मराठीत परकीय भाषेचे शब्द ते स्वातंत्र्यवीर सावरकरांप्रमाणे अत्यंत कटाक्षाने टाळतात. आज त्यांनी दोन कामे अंगावर घेतली आहेत. एक वाशीम ह्या गावाला त्याचे पुरातन वत्सगुल्म हे नाव प्राप्त करून देण्याचे व दुसरे, वाशीमच्या ज्या ठिकाणावरून भारतीय भूमध्यरेषा जाते तेथील पुरातन मध्यमेश्वर मंदिराचे पुनरुज्जीवन करण्याचे. ह्या लहान कामाकरिता देखील त्यांना उतारवयात जिवाचे रान करावे लागत आहे. अत्यंत प्रखर कार्यनिष्ठा, तेजस्वी व कणखर जीवन, पूर्णपणे निःस्वार्थी वृत्ति, अन्यायाची तीव्र चीड व प्रसिद्धीपराङ्मुखता हे अण्णासाहेबांचे विशेष होत. समाजकल्याणासाठी कणाकणाने झिजणारे त्यांचे जीवन म्हणजे दिव्यत्वाचा अंश आहे. आपल्या ऋषितुल्य व ध्येयनिष्ठ जीवनतपस्येने सर्वपक्षीयांच्या अंतःकरणात त्यांनी आदराचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. वाशीम येथील टिळक स्मारक विश्वस्तमंडळ; श्री. नंगे महाराज संस्थान, स्वाध्याय मंडळ, संस्कृत भाषा संवर्धक मंडळ, सार्वजनिक वाचनालय, राष्ट्रीय गणेशोत्सव इत्यादि कित्येक संस्था व कार्यक्रम अण्णासाहेबांच्या प्रेरणेचे स्फुलिंग आहेत. अलिकडे स्वतःवर आमरण उपवासाची आपत्ति ओढवून घेऊन वाशीम येथील बालाजीमंदिरातील झगडा मिटविण्याचे कार्य त्यांनी केले आहे. श्री. अण्णासाहेब म्हणजे वाशिमची एक जिवंत संस्था आहेत.

श्री. महादेव सीताराम मुंडले, जोशी (जन्म १८९४) —समाजसुधारक, कायदेपंडित, शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वचिंतक या स्वरूपात श्री म. सी. मुंडले यांनी बहुमोल कामगिरी केली आहे. वार लावून आणि दुसऱ्यांच्या आश्रयाने

श्री. मुंडले यांना स्वत:चे शिक्षण पूर्ण करावे लागले. १९२० साली त्यांनी मोर्शी येथे वकिली सुरू केली. तत्पूर्वी वकिलीचे शिक्षण घेत असतानाच श्री. चितळे यांच्या समवेत, 'Chitale and Mundle's Digest of the C. P. & Berar' हा ग्रंथ त्यांनी प्रकाशित केला. महाराष्ट्रीय ज्ञानकोशाच्या संपादक-मंडळातहि त्यांनी निरलसपणे बहुमोल कार्य केले.

समाजसुधारणेच्या – विशेषत: अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात श्री. मुन्डले यांनी हिरीरीने भाग घेतला. तीस-चाळीस वर्षापूर्वीच्या काळात अस्पृश्यता निवारणाचे कार्य म्हणजे एक अग्निदिव्यच होते. हे कार्य करणाराला परक्यापासून व आप्तेष्टापासूनहि अनेक प्रकारच्या अडचणी सोसाव्या लागत. अशा स्थितीतहि श्री. मुन्डले यांनी आपले कार्य सोडले नाही. स्व. डॉ. आंबेडकर यांनी चालविलेल्या 'समता' नियतकालिकामधून त्यांनी या विषयावर लेख प्रसिद्ध केले. 'समता प्रवर्तकमंडळ' नावाचे मंडळ स्थापन केले व अध्यक्ष या नात्याने त्याचे कार्य चालविले. आज विदर्भ हरिजन सेवक संघाचे ते महामंत्री आहेत.

ब्राह्मण असूनहि ब्राह्मणेतर चळवळीत श्री. मुन्डले यांनी हिरीरीने भाग घेतला. मुम्बईच्या 'ब्राह्मण-ब्राह्मणेतर पत्रिकेतून' या संबंधी त्यांनी लिखाणहि प्रसिद्ध केले आहे. सुधारणावादानुसार त्यांनी आपल्या मुलामुलींची लग्ने केवळ २०-२५ रुपये खर्चात केली व हुंडा घेतला नाही किंवा दिला नाही. तसेच

श्राद्धाऐवजी गरिबांना भोजन देण्याचा उपक्रमहि त्यांनी सुरू केला. तसेच प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर श्री. मुन्डले यांनी द्वितीय विवाह विधवेशी केला.

मोर्शी येथील श्रीशिवाजी शिक्षण मंडळाचे ते एक संस्थापक आहेत व १९३८ पासून अध्यक्ष म्हणून या संस्थेचे कार्य अत्यंत निष्ठापूर्वक व शिक्षण-प्रसा‹ च्या तळमळीने केले आहे. याशिवाय विकासमंडळ, वकीलसंघ इ० संस्थां‹ › त्यांनी कार्य केले आहे.

तत्‹ ›ानाच्या क्षेत्रात 'व्यवहारशास्त्र अथवा सुबोध गीता' या शीर्षकाखाली पुरुष‹ › मासिकात त्यांनी लिखाण केले. हेच पुढे 'गीताप्रणीत व्यवहारशास्त्र' म्हणून ग्रंथरू‹ › प्रसिद्ध करण्यात आले. भगवद्गीतेतील तत्त्वज्ञान विशद करणाऱ्या उत्‹ ›ंथात या ग्रंथाची गणना होते. नागपूर विद्यापीठाने या ग्रंथाला सुवर्णपदक दिले‹ › मराठी ग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर, मराठी ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे व राष्ट्रीय व‹ ›य नागपूर या संस्थांनीहि या ग्रंथाला पारितोषिके दिली आहेत. याचे हिंदीमध्‹ ›षांतरहि झाले आहे. याशिवाय पुरुषार्थ, जीवनविकास इ० मासिकात त्यां‹ ›त्मिक लिखाण प्रसिद्ध झाले आहे.

कोणत्याहि प्रक‹ ›ावाजा न करता आपल्याला जे साधते ते समाजसेवेचे कार्य करीत राह‹ ›वरहि आपण काहीच केले नाही अशा निर्लेप वृत्तीने वागणे हे श्री. मुंडले यांच्या कार्यपद्धतीचे वैशिष्टच सांगता येईल.

श्री. मा. ज. कानेटकर (जन्म १८९८) सत्काराचे चौथे मानकरी श्री. मा. ज. कानेटकर हे नागपूरचे. अत्यंत कळकळीचे समाजसेवक म्हणून श्री. कानेटकर यांचा दर्जा फार मोठा आहे. शिक्षकाचा धंदा सोडून १९२० मध्ये त्यांनी असहकार चळवळीत प्रवेश केला. १९२२ मध्ये मुळशी सत्याग्रह व १९३० ची सविनय कायदेभंगाची चळवळ यात भाग घेतल्यामुळे तुरुंगवास पत्करावा लागला. १९३४ मध्ये त्यांनी निःस्पृह साप्ताहिक सुरू केले. नावाप्रमाणेच ते व त्याचे संपादक निःस्पृह असल्यामुळे या साप्ताहिकाला अनेक आपत्तींना तोंड द्यावे लागले. ते वारंवार बंद पडायचे व पुन्हा सुरू व्हायचे. अखेरीस १९५३ मध्ये ते कायमचे बंद पडले. तथापि निःस्पृहमधील लिखाण समाजजीवनाला इतके मूलगामी पद्धतीने स्पर्श करणारे असे की निःस्पृहची आठवण आजहि वाचकांच्या मनात ताजी आहे व ते श्री. कानेटकरांना अजूनहि निःस्पृहचे संपादक म्हणूनच ओळखतात. १९४६ ते १९५२-५३ पर्यंत सावंगा (जिल्हा छिंदवाडा) येथे राहून कानेटकरांनी निरलसपणे, समाजसेवेच्या खऱ्या कळकळीने व निःस्वार्थपणे ग्रामसुधारणेचे कार्य केले आहे. ते एक कांग्रेसचे त्यागी व निष्ठावंत कार्यकर्ते आहेत.

निरनिराळ्या नियतकालिकामधून सामाजिक, राजकीय इ० प्रश्नावर कानेटकरांनी किती लिखाण केले ह्याची त्यांनाच मोजदार नसेल इतके ते विपुल




आहे. त्यांची ग्रंथसंपदाहि फार मोठी आहे. प्रेम की स्वैराचार, World Crisis under Oriental Search-light, Tilak and Gandhi, Last chance to the Congress, The only road to world peace इ० ग्रंथ त्यांनी प्रकाशित केले आहेत. शामकाका, तर मग आम्ही काय करावे हे त्यांचे भाषांतरित वाङमय होय.

सूक्ष्म वुद्धिमत्ता, नाविन्यपूर्ण विचार, सडेतोड आचरण व निःस्पृह जीवन हे कानेटकरांचे वैशिष्टच सांगता येईल. त्यामुळे त्यांना जीवनांत कितीतरी स्थित्यंतरे अनुभवावी लागली व ती सर्व त्यांनी बेदरकार वृत्तीने अनुभवली. त्यांची कितीदा तरी उपेक्षा झाली, पण त्याची त्यांनी तमा बाळगली नाही. त्यांना जीवनात कितीतरी कटु अनुभव आले आहेत. पण एवढे असूनहि त्यांची कुणा-विरुद्धहि तक्रार नाही. प्रस्तुत सत्काराच्या निमित्ताने पाठविलेल्या एका पत्रांत ते कळवितात—'जीवनाविरुद्ध अथवा समाजाविरुद्ध एकहि आक्षेप अगर तक्रार नाही. ईश्वराने सर्व कांही इतके उत्तम निभावून नेले की यानंतरहि जर थोडीहि कुरकुर शिल्लक राहिली तर तो कृतघ्नपणाच ठरेल.'

श्री. पंढरीनाथ पाटील (जन्म १९०३)—श्री. पंढरीनाथ पाटील हे चिखलीचे राहणारे. झाडाच्या पानांच्या पत्रावळी शिवून त्या विकाव्यात व

मिळणाऱ्या पैशातून शिक्षण करावे अशा पद्धतीने यांनी आपले माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. परंतु १९२१ मध्ये शाळा सोडून पंढरीनाथांनी असहकारितेच्या चळवळीत उडी घेतली; व जांभुळा गावी गावकऱ्यांची ग्रामपंचायत व शाळा सुरू केली. ह्याच सुमाराला सत्यशोधक समाज व ब्राह्मणेतर पक्ष यांच्या विचाराची पकड पंढरीनाथांच्या मनावर बसली; व त्यांनी ब्राह्मणेतरांच्या विकासाच्या कार्याला स्वतःला वाहून घेतले. चिखलीपासून तो नागपुरापर्यंत तुफानी दौरे केले. बुलढाणा, मोर्शी, वर्धा, अमरावती इत्यादि ठिकाणी जिवापाड मेहनत घेऊन अधिवेशने भरविली. १९३७ व १९४६ मध्ये ते कायदेमंडळात निवडून आले व तेथूनहि त्यांनी बहुजनसमाजाच्या हितासाठी बहुमोल कामगिरी केली. १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात सामील झाल्यामुळे त्यांना कारावासहि भोगावा लागला.



१९२७ साली मलकापूरवरून आत्मोद्धार नावाचे साप्ताहिक श्री. पंढरीनाथ पाटील यांच्या संपादत्वाखाली सुरू झाले. काही वर्षे वर्धा येथील 'ब्राह्मणेतर' साप्ताहिकातहि त्यांनी काम केले. ह्या व इतर नियतकालिकामधून बहुजन-समाजाच्या विकासासाठी त्यांनी आत्यंतिक तळमळीने जळजळीत लिखाण प्रसिद्ध केले. महात्मा ज्योतिबा फुले यांचे पहिले विस्तृत चरित्रहि त्यांनी प्रसिद्ध केले आहे. आज पंढरीनाथांचे शिक्षणकार्याकडे विशेष लक्ष गेले आहे. चिखली येथे एक उत्कृष्ट दर्जाची बहूद्देशीय शाळा स्थापन करून तिच्या कार्यात ते सतत मग्न असतात. शिवाजी शिक्षण मंडळाचेहि ते एक कार्यकारी सभासद आहेत.

बुलढाणा जिल्हा व विशेषतः चिखली तालुका आज विकासकार्याच्या आघाडीवर आढळतो ह्याचे बीज श्री. पंढरीनाथ पाटलांच्या ध्येयनिष्ठ, तळमळीच्या, प्रभावी कार्यात आहे. गेली चाळीस वर्षे बहुजनसमाजाच्या उन्नतीचे कार्य ते निर्व्याजपणे, निश्चयाने व धडाडीने करीत आहेत.

समारोप

हा सत्कार नेत्यांचा नाही, तो समाजसेवकांचा आहे--दुर्मिळ होत चाललेल्या ध्येयनिष्ठ, त्यागी तापसांचा आहे--ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. सेवकापेक्षाहि तो त्यांच्या सेवेचा आहे हे म्हणणे अधिक योग्य ठरेल. असे सेवक दुर्मिळ होत चालले आहेत ही गोष्ट खरी जरी असली तरी विदर्भात अजूनहि कित्येक समाजसेवक ठिकठिकाणी आपल्या सेवाकार्यात मग्न असलेले आढळतात, ही अत्यंत समाधानाची गोष्ट आहे. विदर्भ साहित्य संघाच्या केन्द्रीय कार्यकारिणीने आपल्या शाखांना व संमेलनाच्या कार्यकर्त्यांना विचारून योजना निश्चित केल्यानंतर आणखी किती तरी सन्मानार्ह व्यक्तींची नावे त्यांच्या लक्षात आली. पुसदचे श्री. शंकरराव सरनाईक व नागपूरचे श्री. अप्रबुद्ध यांचा सत्कारहि ह्या संमेलनात होणार होता, परंतु व्यक्तिगत अडचणीमुळे त्यांना सत्काराचे निमंत्रण स्वीकारता आले नाही. तथापि हा सत्कार प्रतीकात्मक आहे; तो मुख्यतः व्यक्तीचा नसून विशिष्ट प्रवृत्तीचा आहे आणि म्हणूनच तो त्या प्रवृत्तीच्या सर्व लोकांचा आहे ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे.

卐

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य सम्मेलन

अधिवेशन २२ वे, सावरगाव-डुकरे

शनिवार दि. १३ व रविवार दि. १४ फेब्रुवारी १९६०

स्वागताध्यक्ष श्री. संतोषराव पाटील यांचे भाषण

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण, संमेलनाध्यक्ष श्री. शेंडे, सन्माननीय प्रतिनिधी व बंधुभगिनींनो !

विदर्भ साहित्य संघाच्या बाविसाव्या अधिवेशनासाठी या ठिकाणी एकत्रित आलेल्या आपणा सर्वांचे आमच्या लहानशा सावरगावच्या वतीने अन्तःकरणपूर्वक स्वागत करताना साहजिकच मला अत्यंत हर्ष होत आहे. अशा प्रकारचा साहित्यिकांचा व साहित्यप्रेमी रसिकांचा मेळावा या आडवळणाच्या खेडेगावी भरावा ही गोष्ट आम्हाला अर्थात्च आमच्या दृष्टीने महान् सौभाग्याची व अभिमानास्पद आहे.

वस्तुतः लहान खेडयात विदर्भ साहित्य संमेलन भरण्याचा हा पहिलाच प्रसंग नाही. गेल्या वर्षीचे संमेलनहि एका खेडेगावी, चांदा जिल्ह्यातील तळोधी येथे भरले होते. यंदाहि वि. सा. संघाने तीच परंपरा पुढे चालवून आमच्या गावाला हे अधिवेशन भरविण्याची संधी दिली यात आमच्या गावाचा तर गौरव आहेच, पण त्याचबरोबर वि. सा. संघाने साहित्याचा संदेश ग्रामीण जनतेपर्यंत नेऊन पोचविण्याचे धोरण निश्चितपणे अंगिकारले असल्याचेच त्यावरून स्पष्ट होत असून ती गोष्टच ग्रामीण जनतेच्या दृष्टीने अधिक मह-

त्वाची व अभिनंदनीय आहे. आजच्या स्वतंत्र भारतात व लोकशाहीच्या युगात ग्रामीण जनतेला सुशिक्षित व अधिक सुसंस्कृत करण्याचे प्रचंड विकासकार्य सुरू आहे. त्या राष्ट्रीय धोरणाला पोषक असा हा निर्णय घेतल्याबद्दल मी वि. सा. संघाचे विदर्भातील ग्रामीण जनतेच्या'वतीने कृतज्ञतापूर्वक आभार मानतो. वि. सा. संघाचे अध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचीहि हे संमेलन सावरगावलाच भरावे अशी फार फार इच्छा होती व त्यांच्या आणि श्री. भाऊसाहेब माडखोलकर, श्री. पु. य. देशपांडे व श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या प्रेरणेने व पुढाकारानेच हा निर्णय पक्का झाला व आम्हाला या संमेलनाची तयारी करण्यातहि त्यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. श्री. शेंडे यांचा सावरगाववर फार पूर्वीपासून लोभ असल्याकारणाने आम्हाला ते आमच्यापैकीच एक वाटतात, त्यामुळे त्यांचे आभार मानणे हे काहीसे औपचारिकच असले तरीसुद्धा या प्रसंगी त्यांच्याविषयीचा आमचा आदर, प्रेम व कृतज्ञताभाव जाहीरपणे व्यक्त करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. विशेषतः संघाध्यक्ष म्हणून या कामी पुढाकार घेतल्यानंतर संमेलनाध्यक्ष म्हणून त्यांचीच बिनविरोध निवड झाली, हाहि एक सुयोगच म्हटला पाहिजे. श्री. शेंडे हे थोर साहित्यिक म्हणूनच त्यांची ही निवड झाली हे तर आहेच, पण त्याचबरोबर ते स्वतः श्रमजीवी जनतेपैकीच असून त्यांच्या साहित्यातहि भारतीय जनतेतील गरीब, ग्रामीण जनतेचे उत्कट व सहानुभूतिपूर्ण चित्रण आहे. असा हा आमच्या परिचयाचा, आमच्याविषयी व एकंदरीने ग्रामीण व दलित जनतेविषयी कळकळ व आत्मीयता बाळगणारा साहित्यिकच या अधिवेशनाला अध्यक्ष म्हणून लाभल्यामुळे हे संमेलन वैशिष्टयपूर्ण रीतीने व यशस्वीपणे पार पडेल (व त्यात व्यवस्थेच्या बाबतीतील आमच्या उणीवा व त्रुटी सहज खपून जातील !), असा मला पूर्ण भरवसा आहे.

सावरगाव–डुकरे हे नाव विदर्भाच्या जनतेला अपरिचित नाही. स्वातंत्र्यापूर्वीच्या काळापासूनच आमच्या गावाने स्वावलंबन व एकजुटीच्या आधारावर ग्रामविकासाचे कार्य हाती घेतलेले होते. महात्मा गांधीप्रणीत स्वातंत्र्यसंग्रामात ग्रामोद्धाराच्या कार्याला महत्त्वाचे स्थान

होते. त्या कार्यक्रमाला अनुसरून स्वच्छता, साफसफाई, रस्ते बांधणे, शिक्षणाचा प्रचार, अस्पृश्यता नष्ट करणे, आदि बाबीत आमच्या गावाने नमुनेदार कार्य करून दाखविले. जीवन विकास सहकारी समिति या संस्थेच्या नेतृत्वाखाली समग्र गावकऱ्यांनी या ग्रामोद्धाराच्या चळवळीत भाग घेऊन ११०० वस्तीच्या चिमुकल्या खेड्याचे नाव सर्वतोमुखी केले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या गेल्या बारा वर्षांच्या काळातहि सावरगावने ही प्रगति कायम ठेवल्यामुळे 'सर्वांगीण विकासाच्या आघाडीवरील गाव' ही आमच्या गावाची कीर्ति अधिक दूरवर पसरली आहे. या प्रगतीचा तपशील सांगण्याचे हे स्थळ नव्हे; शिवाय आमच्या गावची वैशिष्टयपूर्ण प्रगति हेच या संमेलनासाठी सावरगावची निवड होण्याचे मुख्य कारण व आपणापैकी अनेकांच्या आगमनामागील एक हेतु आहे हे उघड गुपित आहे, तेव्हा येथील प्रगतीची आपण स्वतः येथील मुक्कामात पाहाणी करालच, म्हणून मी त्याविषयी अधिक बोलणार नाही. मात्र सरकारी योजनेनुसार जे विकासकार्य भारताच्या हजारो खेड्यात होत आहे, तसे कार्य आम्ही आधीपासूनच करीत असल्यामुळेच आदर्श गाव असा लौकिक आमच्या गावाला प्राप्त झाला आहे हे थोडासा आत्मश्लाघेचा दोष पत्करूनहि या प्रसंगी नमूद केल्यावाचून व या कार्यात पुढाकार घेणाऱ्या सर्व लहानथोर कार्यकर्त्यांचा अभिमानाने उल्लेख केल्यावाचून मला राहवत नाही. विदर्भ साहित्य संघाने हे संमेलन या आडवळणाच्या गावी भरविण्याचे ठरविले व मुंबई राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी या संमेलनाचे उद्‌घाटन करण्यासाठी येथे येण्यास संमति दिली हाहि आमच्या राष्ट्रविकासाच्या कार्यातील आमच्या श्रमाचा व सेवेचाच गौरव आहे असे आम्ही समजतो.

गेल्या दहावीस वर्षात सावरगावला अनेक संमेलने, परिषदा, क्रीडांचे व इतर सामने, वगैरे मोठाले कार्यक्रम पार पडलेले आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकारचे मंत्री, वरिष्ठ अधिकारी, समाजाचे नेते व कार्यकर्ते यांच्या भेटीहि अनेकवार झाल्या आहेत. निव्वळ गावाची

प्रगति पाहाण्यासाठीहि दूरदूरचे पाहुणे वारंवार येत असतात. त्या दृष्टीने पाहाता सभासंमेलने ही चीज आमच्या गावाला नवीन नाही. परंतु एक मोठा फरक मात्र आहे. तो असा की आजवर जे कार्यक्रम येथे पार पडले त्या सर्वांचा आमच्या गावच्या कार्याशी काही ना काही प्रत्यक्ष संबंध होता, त्या क्षेत्राशी आमचा प्रत्यक्ष परिचय होता; उलट हे साहित्यिकांच्या मेळाव्याचे व साहित्यचर्चेचे क्षेत्र आम्हाला सर्वस्वी नवीन व अपरिचित आहे. साहित्याशी आमचा संबंध पुष्कळ आहे, पण तो निव्वळ वाचक व चाहाते म्हणून ! साहित्यनिर्मिति करणारे लेखक – कवि आदि साहित्यिक आमच्या येथे अजून झालेले नाहीत; कदाचित् या संमेलनामुळे तशी स्फूर्ति व प्रेरणा मिळून येथील कुणाची सुप्तावस्थेतील प्रतिभा जागृत होऊन आमच्या गावात साहित्यसेवक निर्माण झाले तर आम्हाला त्यात आनंदच आहे. पण तशी प्रत्यक्ष साहित्यनिर्मितीची फलनिष्पत्ति न झाली तरी निदान आम्ही ज्यांचे साहित्य आवडीने वाचतो त्यांच्यापैकी काही साहित्यिकांना जवळून पाहाता येईल, त्यांचे विचार व चर्चा ऐकायला मिळेल व एकंदरीने 'काव्यशास्त्रविनोदा'च्या सांस्कृतिक वातावरणात काळ फार चांगल्या रीतीने व्यतीत होईल हाहि लाभ थोडका नाही, अशा विचारानेच आम्ही या संमेलनाच्या व्यवस्थेची जबाबदारी पत्करली आहे. दुसरे असे की आज साहित्यनिर्मितीचे कार्य व साहित्यिकांचे वास्तव्य मुख्यत्वेकरून शहरातच असते, त्यामुळे साहित्यनिर्मिती करणारे लेखक व कवि हे शरीराने व मनाने देशातील बहुसंख्य ग्रामीण जनतेपासून दूरच असतात. आजच्या मराठी वाङमयात तरी माझ्या मते बव्हंशी हीच परिस्थिति आहे. शहरातील सुशिक्षित मध्यमवर्गाचे जीवन – तेहि मर्यादित स्वरूपात – या साहित्यात प्रतिबिंबित होते, पण ग्रामीण जनतेची परिस्थिति, तिच्या आशाआकांक्षा, तिचे प्रश्न याचे यथार्थ चित्रण या वाङमयात आढळत नाही. तेव्हा वाङमयनिर्मिति करणाऱ्या प्रतिभावंतांना व प्रज्ञावंतांना मुद्दाम ग्रामीण जनतेच्या नजीक आणावे व तिचे म्हणणे त्यांना ऐकवावे, हा जो

अनुक्रमणिका

खेड्यात संमेलन भरविण्याचा मुख्य हेतु, तोच डोळ्यासमोर ठेवून आम्ही आपल्या स्वागतासाठी यथाशक्ति तयारी केलेली आहे. तीत पुष्कळ उणीवा व दोष असतील, नव्हे आहेत, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे, पण त्याबाबत आपण उदार अंतःकरणाने आम्हाला क्षमा करून या संमेलनाचे कामकाज यशस्वी रीतीने पार पाडाल अशी आमची श्रद्धा आहे.

सावरगाव–डुकरे हे विकासाच्या आघाडीदरील गाव असले तरी हजारबाराशे वस्तीच्या चिमुकल्या खेड्याची शक्ति मर्यादितच असणार, त्यामुळे सावरगावला हे संमेलन भरविण्याची कल्पना निघताच आम्ही येथील प्रमुख गावकऱ्याशी सल्लामसलत करून लगेच आमच्या तालुक्याच्या ठिकाणाकडे, चिखलीला धाव घेतली. चिखलीचे नगराध्यक्ष श्री. राजाभाऊ बोंद्रे, तसेच श्री. गोपाळ विष्णु उर्फ बाबु सावजी, श्री. माधवराव देशमुख, या भागातील जुने नामवंत पुढारी श्री. पंढरीनाथ पाटील, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. ना. के. महाजन, श्री. फैजपूरकर, आदि कार्यकर्त्यांनी या कामी संपूर्ण सहकार्य देण्याचे मान्य केल्यावर मगच आम्ही येथे संमेलन भरविण्याचे निश्चित केले. तसेच खामगावचे पुढारी आमदार श्री. गोविंदरावजी भाटिया व खामगाव येथील वि. सा. संघाच्या शाखेचे अध्यक्ष डॉ. एकबोटे व इतर कार्यकर्त्यांनी, तसेच या जिल्ह्यातील आमदार श्री. भिकूजी पाटील व ठिकठिकाणच्या इतर कार्यकर्त्यांनी आम्हाला या कामी बहुमोल सहकार्य देऊ केले. अशा रीतीने हे संमेलन सावरगावला होत असले तरी त्यामागे या जिल्ह्यातील अनेक कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहकार्याची शक्ति उभी आहे व म्हणूनच स्वागतसमितीत या जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणच्या कार्यकर्त्यांचा समावेश आहे. अशा रीतीने एका परीने हे संमेलन म्हणजे फक्त सावरगावतर्फे भरत नसून चिखली तालुक्याचे वतीने व बुलढाणा जिल्ह्याचे वतीनेच भरत आहे असे म्हणणे अधिक सार्थ ठरेल. वि. सा. संघाच्या सध्याच्या शाखा त्या त्या शहरापुरत्या मर्यादित क्षेत्रात कार्य करीत आहेत; त्या ऐवजी आता जिल्हा-शाखा

स्थापन करण्याची योजना विचाराधीन आहे असे समजतें. त्या दृष्टीने पाहाता या संमेलनाचे निमित्ताने बुलढाणा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचे सहकार्य घडून आले आहे ती या जिल्हाशाखांच्या स्थापनेची नांदी ठरल्यास संघटनेच्या क्षेत्रातील ती एक महत्त्वाची कामगिरी ठरेल यात शंका नाही.

बुलढाणा जिल्ह्याची वाङमयीय व सांस्कृतिक परंपरा व कामगिरी पुष्कळच मोलाची आहे. महानुभाव पंथाच्या श्री. चक्रध स्वामींच्या वास्तव्याने व संचाराने पुनीत झालेल्या या भूमीत, श्री. शिवरायांच्या मातुश्री जिजामाता यांनी आपले बालपण घालविले त्या या भागात अलिकडच्या काळातहि नामवंत साहित्यिकांनी आपल्या प्रतिभेची व लेखणीची करामत दाखविलेली आहे. मराठी नाटच व विनोदी वाङमयाचे भीष्माचार्य श्री. श्रीपाद कृष्ण ऊर्फ तात्यासाहेब कोल्हटकर यांची कर्मभूमि खामगाव व जळगाव जामोद हीच होती व त्या निमित्त त्यांचे स्मारक म्हणून नाटचगृह उभारण्याच्या वि. सा. संघाच्या खामगाव शाखेच्या प्रयत्नांची आपल्याला माहिती आहेच. त्याचप्रमाणे सुप्रसिद्ध कवि श्री. मुरलीधर अनंत गुप्ते उर्फ 'बी' यांचेहि वास्तव्य नोकरीनिमित्त मलकापूर येथे होते. आज हयात असलेल्या ज्येष्ठ वैदर्भीय साहित्यिकांपैकी श्री. वामन नारायण देशपांडे ('प्रतिभे'चे 'रामशास्त्री') हे आता खामगाव येथेच स्थायिक होऊन साहित्याचा व्यासंग व वाङमयनिर्मितीचे कार्य करीत असतात. याशिवाय आता नागपूरचे झालेले प्रसिद्ध विद्वान साहित्यिक डॉ वि. भि. कोलते हे मूळचे मलकापूरचे, म्हणजे याच जिह्याचे आहेत. महाराष्ट्रात सुपरिचित असलेले व रानारानात शीळ घुमविणारे प्रसिद्ध कवि श्री. ना. घ. देशपांडे हे मेहेकरलाच राहून आपले काव्य रसिकांना सादर करीत असतात. एकेकाळी कादंबरीकार म्हणून गाजलेले डॉ. ना. के. महाजन हे तर चिखलींचेच. याशिवाय जुन्या पिढीतील कवींपैकी श्री. वा. भा. दामले, श्री. ज. श्री. उर्फ तात्यासाहेब देशपांडे हे बुलढाण्याचे रहिवासी आहेत. नव्या पिढीच्या लेखकांपैकी श्री. प्रभाकर

ऊर्ध्वरेषे व श्री. पद्माकर डावरे हे प्राध्यापकद्वय खामगावीच स्थायिक झालेले असून वि. सा. संघाच्या खामगाव शाखेचेहि ते प्रमुख कार्यकर्ते आहेत. याशिवाय जळगाव जामोदचे श्री. दि. वि. जोशी, खामगावचे श्री. गोविंद भिडे, आदि काही अगदी तरुण लेखकहि आता प्रकाशात येऊ लागले आहेत.

साहित्यनिर्मितीप्रमाणेच इतर सांस्कृतिक व शैक्षणिक कार्यातहि बुलडाणा जिल्हा पुष्कळच भरीव कामगिरी करीत आहे. खामगावच्या जुन्या व मोठ्या महाविद्यालयाच्या जोडीला आता बुलडाणा येथेहि शिवाजी शिक्षणसंस्थेचे कला महाविद्यालय स्थापन होऊन त्याचा जम बसला आहे. जागोजागच्या माध्यमिक व प्राथमिक शाळांची व सांस्कृतिक कार्य करणाऱ्या संस्थांची संख्याहि वाढत आहे. लोकशिक्षण व लोकजागृतीचे कार्य करणाऱ्या साधनात वृत्तपत्रांचीहि गणना होते. तशी फार मोठी वृत्तपत्रे या जिल्ह्यात नाहीत. परंतु डॉ. एकबोटे यांनी स्थापना केलेले खामगावचे एकुलते एक 'निनाद' साप्ताहिक होते त्यात आता तेथूनच निघणाऱ्या 'शिवशक्ति' दैनिकाची भर पडली आहे.

अशा प्रकारची साहित्यिक व सांस्कृतिक पार्श्वभूमि असलेल्या बुलढाणा जिल्ह्यात सहा वर्षापूर्वी खामगावचे यशस्वी अधिवेशन भरले होते. आजचे या जिल्ह्यातले हे दुसरे संमेलन मराठीभाषिकांच्या इतिहासातील एका अत्यंत ऐतिहासिक महत्त्वाच्या व आनंदाच्या क्षणी भरत आहे. समग्र मराठी भाषिकांचे एक निराळे राज्य स्थापन होण्याचा मंगल दिवस आता अगदी जवळ आला आहे. या नव्या महाराष्ट्राच्या राज्याची धुरा वाहण्याची ऐतिहासिक जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते आपणा सर्वांचे आवडते नेते श्री. यशवंतराव चव्हाण हेच सुदैवाने आपल्या या संमेलनाचे उद्घाटक म्हणून आपल्याला लाभले आहेत. यशवंतरावजी हे नुसतेच राजकारणपटु मुत्सद्दी व राज्यकारभारधुरंधर नाहीत, तर ते स्वतः साहित्याचा रसिकतेने आस्वाद घेणारे व्यासंगी

विद्वान आहेत. त्यांच्या व्यक्तित्वाच्या अनेक ऋजु पैलूंचाहि मराठी भाषिकांना परिचय झालेलाच आहे. विदर्भातील जनतेच्या प्रगती-विषयी त्यांना वाटणारी कळकळ, जिव्हाळा व आत्मीयता यांचाहि आपणा सर्वांनी प्रत्यय घेतलेलाच आहे. या संमेलनाच्या निमित्ताने त्यांचे स्वागत करण्याची संधी आम्हाला लाभली हे आम्ही आमचे थोर भाग्य समजतो. हे भाग्य आमचे विदर्भाचे नेते खासदार डॉ. आबासाहेब खेडकर यांनी आमच्याबद्दल जी आपुलकी दाखविली त्यामुळे लाभले असल्याची आम्हाला जाणीव आहे. व म्हणून या प्रसंगी त्यांचे मनःपूर्वक आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.

आपल्या सर्वांचे स्वागत करण्याच्या निमित्ताने मी या संमेलनाची, त्याच्या वास्तूची व आजच्या ऐतिहासिक क्षणाची पार्श्वभूमि यथामति आपल्यापुढे मांडली आहे. आता आपला अधिक वेळ न घेता मी पुनः एकदा आपणा सर्वांचे मनःपूर्वक स्वागत करतो व माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांना या संमेलनाचे उद्घाटन करण्याची नम्र विनंती करतो.

विदर्भ साहित्य सम्मेलन

अधिवेशन २२ वे, सावरगाव-डुकरे

शनिवार दि. १३ व रविवार दि. १४ फेब्रुवारी १९६०

श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षीय भाषण

सन्माननीय मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण,

मान्यवर साहित्यिक वृन्द आणि श्रद्धेय बंधु–भगिनींनो,

विदर्भ साहित्य संघाच्या या उच्च व्यासपीठावरून सम्मेलनाध्यक्ष म्हणून मी एक छोटा खेडुत लेखक आपणा सर्वांना शिवकालीन पद्धतीचा मानाचा मुजरा करीत आहे. गेल्या दहा वर्षात विदर्भ साहित्य संघाची जी अल्पस्वल्प सेवा मी केली त्याची केवळ रीतसर 'पावती'च मला गेल्या वर्षी वि. सा. संघाचा अध्यक्ष बनवून दिली गेली नाही तर आता सम्मेलनाध्यक्ष बनवून सरस्वतीचा 'बहुमानाचा प्रसाद'हि देऊन माझा गौरव केला गेला ! हा मी माझा गौरव मानीत नाही तर तो केवळ विदर्भाचाच नव्हे तर अखिल मराठी मुलुखातील बहुजन समाजाचा—ज्यांनी मराठी संस्कृति, मराठी रीतभात आणि मानवता यांची बूज राखली त्या माझ्या सुसंस्कृत खेडुत बांधवांचा गौरव होय. त्यांना माझे शतशः प्रणाम !

वस्तुतः सम्मेलनाच्या अध्यक्षपदासाठी थोर संशोधक व साहित्यिक डॉ. ग. त्र्यं देशपांडे आणि ख्यातनाम टीकाकार व कवि श्री. वा. ना. देशपांडे यांचीहि नावे सुचविली गेली होती. या दोन पंडितांपैकी एकाने तरी हे मानाचे स्थान भूषवावे अशी माझी सदिच्छा होती. मी तसा प्रयत्नहि केला. पण त्या दोघाहि सुहृदांनी उलट माझ्याच नावावर भर देऊन आपली नावे परत घेतली आणि मजवरील आपला जिव्हाळा व्यक्त केला ! नियतीच्या उद्यानातील सरस्वतीच्या मंदिरात सुंदर व सुगंधित कमल किंवा गुलाब पुष्पांनाच स्थान नसून कोरांटी किंवा गुल्हारी सारख्या रानफुलांनाहि तेवढेच उच्च मानाचे स्थान आहे, याचा मला प्रकर्षाने प्रत्यय येऊन, एकतेच्या निरामय स्वत्व व सत्त्व अशा आत्म्याच्या ज्योतीचे दर्शन घडले ! आणि खेड्यातील अगदी सामान्य दगडाला भक्तिभावाने, निष्ठेने नि श्रद्धेने शेंदूर फासला तर त्या दगडालाहि देवत्वाचे रूप कसे प्राप्त होते याची प्रचीतिहि आली ! अर्थात् हा कल्याणकारी दुवा साधणारा शारदेचा निष्ठावन्त पुजारी वंदनीय आहे. त्या दृष्टीने, थोर साहित्यिक व पत्रपंडित आणि माझे हितचिंतक श्री. ग. त्र्यं. उर्फ भाऊसाहेब माडखोलकर यांचा अभिमानाने व कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे माझे कर्तव्य आहे. त्यांच्याप्रमाणेच सद्भावनेचे अमृतघट मजवर रिचवणारे श्रेष्ठ साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे, डॉ. वि. भि. कोलते, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, श्री. आ. रा. देशपांडे, डॉ. य. खु. देशपांडे, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, श्री. बाळासाहेब ढवळे, प्रा. भ. श्री. पंडित, डॉ. मा गो. देशमुख, प्रा. वा. कृ. चोरघडे, प्रा. पां. कृं. सावळापूरकर, प्रा. या. मु. पाठक आणि माझ्या पाठिशी उभे राहून मला आशीर्वाद देणारे वि. सा. संघाचे विश्वस्त लोकनायक डॉ. बापूजी अणे व न्यायमूर्ति श्री. के. तु. मंगळमूर्ति आदि हितचिंतकांना प्रणाम न करताच मी पुढे पाऊल टाकले तर वैदर्भीय रीत मी पाळली नाही — शारदेच्या दरबारात प्रवेश कसा करावा याच्या संकेताची मला जाणीव नाही असे ठरेल ! आणि म्हणून सर्वांना विनम्र प्रणाम करून आशीर्वादाची अपेक्षा करीत आहे.

अनुक्रमणिका

३

सुधारणांचे तीर्थक्षेत्र सावरगाव

विदर्भ साहित्य संघाच्या सेवेसाठी, उत्कर्षासाठी आपला देह अविरत झिजविणाऱ्या माझ्या दोन थोर सहकाऱ्यांचे स्मरण मला होत आहे! ज्येष्ठ व श्रेष्ठ संशोधक कै. हरिभाऊ नेने आणि नामवंत नाटककार कै. नानासाहेब जोग. त्यांना मी मनोभावे श्रद्धांजलि अर्पण करीत आहे!

विदर्भ साहित्य संघाची अधिवेशने केवळ शहरापुरतीच मर्यादित न ठेवता, ती खेड्यापाड्यातहि भरावीत आणि त्याद्वारे शहर व खेडी यांचे हितसंबंध दृढ होऊन एकात्मतेची भावना निर्माण व्हावी या व्यापक दृष्टिकोनाने १९५३ साली वि. सा. संघाचे अधिवेशन राष्ट्रसंत श्री. तुकडोजी महाराज यांच्या अमरावती जिल्ह्यातील गुरुकुंज–मोझरी येथे, १९५५ साली १८ वे अधिवेशन भंडारा जिल्ह्यातील तुमसर येथे, गेल्या वर्षी २१ वे अधिवेशन चांदा जिल्ह्यातील तळोधी येथे आणि या वर्षी हे २२ वे अधिवेशन बुलडाणा जिल्ह्यातील सावरगाव–डुकरे या २४० घरांच्या ११३० लोकसंख्या असलेल्या छोट्याशा गावी भरत आहे. गाव छोटे आहे पण त्याची कीर्ति सारखी दुमदुमत आहे! विदर्भाला ललामभूत असलेले आधाडीवरील हे गाव! सुधारणांचे तीर्थक्षेत्र म्हणून भारतातील थोर नेत्यांनी आणि साहित्यिकांनी त्याची एकमुखाने केलेली प्रशंसा. खेड्यापाड्यात रामराज्य निर्माण होण्याचे महात्मा गांधीजींचे स्वप्न काही प्रमाणात साकार करून दाखविणारे हे आदर्श गाव. जेथे अस्पृश्यतेचे समूळ उच्चाटण होऊन मानवतेचे यथार्थ दर्शन घडते; जेथे 'एकमेका साह्य करू अवघे। धरू सुपंथ' असा सद्भाव उत्कटतेने प्रतीत होतो; जेथे उच्च सांस्कृतिक, शैक्षणिक व नैतिक दर्जा प्रस्थापित होतो; जेथे उदात्त मराठी मन कल्याणप्रद गोष्टीकडे सारखे झेप घेते आणि जेथे शुचित्व नि मांगल्य थयथयते अशा या तीर्थक्षेत्री विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन भरावे व त्याचा अध्यक्ष होण्याचा सुयोग मला प्राप्त व्हावा हे माझे केवढे भाग्य! अर्थात् या तीर्थक्षेत्रातील मानवतेला, 'घालीन लोटांगण।

अनुक्रमणिका

वंदीन चरण । डोळ्याने पाहीन रूप तुझे ॥ ' या शब्दात माझा आत्मा केव्हाहि साद घालील ! आणि तो महाराष्ट्रातील जनतेला आवाहन करील, 'बांधवांनो, उठा सत्वरि । सांस्कृतिक जीवन उच्च करा । साहित्याच्या धवल धारेनें । एकात्मतेची कास धरा ॥'

विदर्भाची अस्मिता आणि वैदर्भीय रीति

सावरगाव येथील साहित्याच्या या व्यासपीठावर मी उभा असताना विदर्भाच्या अस्मितेचे काही आगळेच असे मंगलमय, उदात्त व सद्भावप्रेरक चित्र माझ्या नजरेपुढे तरळत आहे. प्रभु रामचंद्र आणि भगवान श्रीकृष्ण व महात्मा गौतम बुद्ध आणि श्रीचक्रधर स्वामी यांच्या पदरजाने पुनीत झालेली ही विदर्भाची भूमि. रुक्मिणी व दमयंतीसारख्या देवतांचे हे माहेरघर. लोपामुद्रा व इंदुमति या पुण्यस्त्रिया काय किंवा अगस्त्य, जमदग्नि, मार्कंडेय इत्यादि पुण्यपुरुष काय, विदर्भाचेच. ऐतिहासिक काळाच्या दृष्टीने पाहिले तरी श्रीनृसिंह सरस्वतीस्वामी, जनार्दनस्वामी, चोखोबासारखे साधुसंत; मराठीचे आद्य कवि मुकुंदराय व एकनाथ; अमृतराय, देवनाथ, दयाळनाथ, गोसावीनंदन, विठ्ठल, अनंत, शिवदिनकेसरी, शिवकल्याण, मोरेश्वर, उत्तमश्लोक, गुलाबराय यासारखे पद्यकार; भवभूतीसारखे श्रेष्ठ संस्कृत पंडित कवि व नाटककार; भारवीसारखे महाकवि, भोजासारखे राजकवि, हेमाद्रि, बोपदेव यासारखे निबंधकार आणि भट्ट भास्कर, त्रिविक्रम यासारखे ज्योतिषी विदर्भातच झाले. कविकुलगुरु कालिदास यांचे केवळ वास्तव्य विदर्भात झाले असे नाही तर उत्कृष्ट काव्यरचनाहि येथेच झाली. महानुभाव पंथाचे आद्य मराठी वाङ्मय विदर्भातच जन्मास आले. वारकरी पंथ काय किंवा नाथसंप्रदाय काय, येथेच मूळ धरून त्यांचे स्वरूप व्यापक झाले. श्रीसंत ज्ञानेश्वर, श्रीसंत तुकोबा, श्रीसंत नामदेव, श्रीसंत चोखोवा, स्वामी रामदाससारख्या साधु-संतांची जनकल्याणकारी वाणी दुमदुमली व अजूनहि दुमदुमत आहे ती विशेषेकरून विदर्भातच. खेड्यापाड्यात विठोबाची पंढरी निर्माण झाली आणि तिने धर्म आणि संस्कृतीचे जतन व संवर्धन केले. राज-शेखराने या विदर्भभूमीस 'सारस्वती जन्मभू:' म्हणून तिचे माहात्म्य

अनुक्रमणिका

विशद केले आहे. मराठी वाङमयाची व संस्कृतीची उज्ज्वल परंपरा अगदी पुरातन काळापासून या विदर्भात चालत आली आहे. तसेच ' वैदर्भी रीति ' विशेषत्वाने कीर्तिमान झाली आहे. या मानवतावादी वैदर्भी रीतीने मराठी मन केवळ अंकुरित केले नाही तर त्याला सत्पथ दर्शवून त्याचेवर मानवधर्माचे उत्तम संस्कार घडविले आहेत. विदर्भाची ही महत्ता आहे, थोरवी आहे ! विदर्भाच्या अस्मितेचे आणखी एकदोन विशेष आहेत. छत्रपति शिवाजी महाराजांचे आजोळ विदर्भातीलच आहे. ज्या सावरगावी हे सम्मेलन भरत आहे तेथून जवळच असलेले सिंदखेडराजा हे जिजामातेचे माहेर आहे, तर येथूनच सुमारे चार मैल अंतरावर मेहुणा हे गाव श्रीसंत चोखोबाचे जन्मस्थान आहे. लष्करी निशाणाला चोळी बांधून, आपल्या पराक्रमाने शिवाजी महाराजास कुंठित करून त्यांचेकडून धर्मकन्या म्हणून घेतलेली रायबागीण विदर्भातच झाली. नागपुरचे शौर्यशाली राजे भोसले घराणे तर इतिहासप्रसिद्धच आहे. याशिवाय राजकारण व समाजकारण यांचे पुण्य याच विदर्भाच्या पदरी पडले आहे ! महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, आचार्य विनोबाजी भावे सारख्या महान् नेत्यांची ही भूमि कर्मभूमि–तपोभूमि ठरली आहे. भारताला जे स्वातंत्र्य प्राप्त झाले त्याची ललकारी या पावनभूमी-वरूनच दिली गेली आहे ! एका आगळ्या कारणानेहि ही भूमि श्रेष्ठ आहे. ते कारण म्हणजे काळी माती. माणिक–मोती उगवणारी काळी माती ! वऱ्हाड हा सोन्याचा तुकडा म्हणून ख्यातनाम आहेच. या विदर्भाची दानतसुद्धा उच्च नि श्रेष्ठ आहे. इतरांनी आपल्यासाठी चांगले काय केले हे पाहाण्यापेक्षा इतरासाठी आपण काय चांगले करू शकतो हे पाहून तसा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य अशी उदात्त, परोपकारी व सहिष्णुतावर्धिनी वैदर्भी रीति तळपत आहे !

प्रेमे प्रेम बळावे, द्वेषाने अधिक वाढतो द्वेष

विदर्भाच्या अस्मितेसंबंधी कै. साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण केळकर यांनी यवतमाळ येथील विदर्भ साहित्य संघाच्या अधिवेशन

प्रसंगी दि. १७ जानेवारी १९२६ रोजी जे विद्वत्तापूर्ण अध्यक्षीय भाषण दिले ते आजच्या या परिवर्तनाच्या काळात–विशेषतः नवीन महाराष्ट्र उदयास येऊ घातला आहे अशा वेळी विचारात घेणे आवश्यक आहे. विदर्भाच्या अस्मितेबद्दल मी थोड्या विस्ताराने सांगितले त्याचा हेतुसुद्धा पर्यायाने महाराष्ट्राची अस्मिता अधिक तेजाने, अधिक प्रभावाने मराठी मनावर बिंबवावी हा आहे. त्याला एक महत्त्वाचे कारण आहे. अलीकडे विदर्भ आणि पुणे–मुंबई अशा दोन विभागात रीति, व्यवहार आणि वागणूक याबाबत नको तो द्वेष प्रत्ययास येत आहे, ही खेदाची गोष्ट आहे. आम्ही जेव्हा मराठी भाषा, मराठी संस्कृति, मराठी मन एक आहे, असे अभिमानाने म्हणतो तेव्हा, जे स्वतःकडे श्रेष्ठत्वाचा मक्ता घेऊन दुसऱ्यांना मागासलेले, कमी प्रतीचे आहेत, असा जाणूनबुजून अहंमान्य भाव राखून तसा व्यवहार करतात, माझ्या तरी दृष्टीने तशा विचारसरणीच्या व्यक्तींना ते खासच पोषक नाही. असा द्वेषभाव महाराष्ट्राला निश्चित घातक ठरेल !

विदर्भाने महाराष्ट्राला कधी परका मानला नाही, मानणार नाही, कारण महाराष्ट्र आमचा आहे. त्याची संस्कृति अधिकाधिक उज्ज्वल, तेजोवर्धित करणे हे आमचे कर्तव्य आहे. साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर उद्‌गारतात, "सह्याद्रीखालचे कोकण व घाटमाथा हा प्रांत आम्हाला वडिलांची जन्मभूमि असा वाटतो, तर गोदाकाठच्या जुन्या महाराष्ट्राचा प्रांत हा आम्हाला आजोबाच्या घरासारखा किंवा आजोळासारखा वाटतो. विदर्भ हे आपल्या प्रांताचे इतिहासप्रसिद्ध व पुरातन नाम. जुन्या विदर्भाच्या नांवाइतकेच नव्या महाराष्ट्राचे नावहि आपणास प्रिय वाटेल यात संदेह नाही. वऱ्हाडाला मी आजोळ किंवा आजोबांचे घर म्हटले ते तोंडदेखले नसून सर्वस्वी यथार्थ आहे. महाराष्ट्रीय लोक ज्या आर्यकुलात समाविष्ट आहेत ते उत्तर हिंदुस्थानातून विंध्याद्रि उजवा घालून प्रथम जुन्या महाराष्ट्राच्या विस्तीर्ण मैदानावर उतरले. त्यावेळी गोदावरीच्या दक्षिणतीराला दंडक नावाचे अरण्यच निम्मे-शिम्मे होते व हे अरण्य पुढे नाहीसे होऊन विदर्भाकडील आर्यवसति

इकडे फैलावली हे इतिहासच सांगतो. विदर्भ हेच पहिले महाराष्ट्र." मग विदर्भाची थोरवी विशद करताना तात्यासाहेब म्हणतात, "पौराणिक कथा सोडून दिल्या तरी प्रत्यक्ष ऐतिहासिक काळात महाराष्ट्रीय इतिहासाच्या व वाङमयाच्या धाग्यादोऱ्यांचे मूळ जुन्या विदर्भ देशांत म्हणजे हल्लीच्या वऱ्हाडात सापडते ही गोष्ट तर निर्णयात्मकच ठरते. विदर्भ किंवा वऱ्हाड याची परंपरा इतकी उज्ज्वल आहे की कोणाहि इतर प्रांताने त्याचे कौतुकच करावे." तात्यासाहेब केळकरांचे हे प्रांजळ मत लक्षात घेतले म्हणजे विदर्भ–महाराष्ट्र असा भेद न उरता तो एक आहे, अभंग आहे हेच सिद्ध होते. विदर्भ महाराष्ट्राचे हृदय आहे. या हृदयावर प्रहार होणे म्हणजे महाराष्ट्रशरीर निष्प्राण होणे आहे! म्हणून मला नव्या होऊ घातलेल्या महाराष्ट्राचे स्वागत करताना म्हणावयाचे आहे––कळवळून सुचवायचे आहे––

प्रेमे प्रेम बळावे, द्वेषाने अधिक वाढतो द्वेष ।
प्रेमे उदया आले, द्वेषाने ओस पाडिले देश ।।

म्हणूनच मुंबई, कोकण, ठाणे, नाशिक आदि विभागाच्या दौऱ्यावर असताना जेव्हा चर्चा करण्याचा, भाषण देण्याचा प्रसंग आला तेव्हा तेव्हा महाराष्ट्रासंबंधी विदर्भाची सद्भावना व्यक्त करून, मी आवर्जून सांगितले, "विदर्भ काय किंवा पुणे–मुंबई, मराठवाडा, कोकणपट्टी, सातारा–सोलापूर–कोल्हापूर विभाग काय एकाच शरीराचे हे अवयव आहेत. ते अवयव विकसित करणे, सुदृढ करणे व परस्परांचे हितसंबंध अधिकाधिक दृढ करून, महाराष्ट्र संपन्न, बलशाली करण्यास आपण सर्वांनी झटणे आणि त्याच्या उज्ज्वल संस्कृतीचा आदर्श निर्माण करणे आपले कर्तव्य आहे."

विदर्भात भाषा, उत्खनन व संशोधनाचे स्वतंत्र खाते हवे

आज हे अधिवेशन संपूर्ण मराठी प्रदेशाचे निखालस एकभाषी राज्य स्थापन होण्याच्या संधिकालात भरत असून त्या राज्याचे कळकळीचे प्रवर्तक, निष्ठावंत समाजसुधारक, राजधुरंधर आणि जसे आजचे तसे उद्याचे मुख्य मंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते

अनुक्रमणिका

त्याचे उद्घाटन होण्याचा सुयोग आलेला आहे, ही घटना मी मोठी औचित्यपूर्ण व अर्थपूर्ण समजतो. विदर्भातील मराठी भाषेला आजपर्यंत द्विभाषी राज्यात राहावे लागले. शुद्ध मराठीभाषी राज्यात राहण्याची ही पहिलीच संधि तिला लाभत आहे. ही संधि विदर्भातील मराठी भाषेच्या कार्यकर्त्यांनी चालविलेल्या सर्व साहित्यिक व सांस्कृतिक संस्थांच्या उत्कर्षाला पोषक होईल, अशी मला उमेद वाटते. मराठीच्या ज्या बोलभाषा विदर्भात प्रचलित आहेत, त्यांच्या शास्त्रशुद्ध पद्धतशीर संशोधनाकडे आणि व्यासंगाकडे आतापर्यंत लक्ष देण्यात आले नाही. त्याचप्रमाणे विदर्भात जी प्राचीन अनेक उध्वस्त नगरे आणि इतर सांस्कृतिक केन्द्रे सर्वत्र पसरलेली आहेत, त्यांचेहि उत्खनन व संशोधन आजपर्यंत आस्थेने होऊ शकले नाही. त्याचा परिणाम असा झालेला आहे की, विदर्भाची ऐतिहासिक संस्कृति, साहित्य आणि बोलभाषा ही तिन्हीहि उपेक्षित स्थितीत पडून राहिलेली आहेत. नव्या मराठी राज्याचे नेते आणि त्या राज्यातील ज्ञानसंवर्धनाची खाती, विदर्भातील मराठी भाषा, ऐतिहासिक वास्तूंचे उत्खनन आणि इतिहाससंशोधनाचे कार्य यांच्याकडे अगत्याने लक्ष पुरवितील, असा मला विश्वास वाटतो. यासाठी नव्या मराठी राज्यात विदर्भासाठी जर स्वतंत्र खाते उघडण्यात आले, तर ते सर्वच दृष्टींनी उपकारी व इष्ट होईल. तसेच जुन्या मध्यप्रदेशात जशी 'मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद' होती व तिने उच्च दर्जाच्या साहित्याला श्रेष्ठ पुरस्कार देऊन साहित्यिकांची बूज राखली–त्यांना प्रोत्साहित केले, तशीच शासन साहित्य परिषद नवीन मराठी राज्यात तरी त्वरित निर्माण केली जाईल व राज्यातील सर्व प्रदेशांना ती लागू करून समप्रमाणात साहित्यिकांना उत्तेजन देईल, अशी दृढाशा आहे.

वाङ्मय लोकाभिमुख असावे : ते खेड्यातील हृदयापर्यंत पोचावे

एका खेड्यात भरलेल्या साहित्याच्या व्यासपीठावरून मी बोलत आहे याची मला जाणीव आहे. ती जाणीव लक्षात घेऊन आज मला 'साहित्य' व 'वाङ्मय' या दोन शब्दावर विशेष भर द्यायचा आहे.

भारताचा आत्मा खेड्यापाड्यात वसला आहे. त्या खेड्यापाड्यांच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व नैतिक उन्नतीच्या दृष्टींनी कोणते साहित्य अथवा वाङ्मय किती लोकांच्या उद्धारार्थ फलदायी झाले आहे याचा विचार होणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने विचार करू जाता, महाराष्ट्रातील बहुजनसमाजाच्या कल्याणार्थ जर कोणते वाङ्मय उपयोगी येत असेल तर ते संतवाङ्मय व लोकवाङ्मयच होय. तसे पाहिले तर आज नामवंत गणलेल्या साहित्यिकांचे साहित्यभांडार काही कमी नाही. पण त्या साहित्याचा उपयोग केवळ विशिष्ट वर्गाच्या जीवनासाठी अगदी मर्यादित स्वरुपातच झालेला आढळून येईल. म्हणजे हे वाङ्मय अत्यल्प शहरवासी लोकासाठी, त्यातूनहि छाट करून ०·५० प्रमाणात उपयोगी ठरत असावे; परंतु बहुसंख्य खेड्यातील कोटयवधि लोकांच्या ते जराहि उपयोगी पडलेले नाही, अशी वस्तुस्थिति आहे. विद्वानांचे साहित्य शहरवासी मूठभर लोकापुरतेच मर्यादित राहिल्याने बहुजनकल्याणाचे पुण्यकार्य करण्यास ते तोकडे पडले आहे. बहुजनसमाजाच्या दृष्टीने असे वाङ्मय नष्ट झाले काय, जळाले काय सारखेच ! एका विद्वानानें संस्कृतप्रचुर म्हणा, भारदस्त भाषेत म्हणा, एक मोठा ग्रंथ निर्माण केला. खेड्यांतील जीवनावर त्याचा प्रखर प्रकाश पडावा हा तो ग्रंथनिर्मितीचा हेतु. पण तो ग्रंथ खेड्यापाड्यांतील किती लोकांच्या हाती पडला ? शहरातील एका श्रेष्ठ वाचनालयात तो ग्रंथ धूळ खात पडला—सतत चारपाच वर्षे त्या ग्रंथाला एकहि वाचक जेथे मिळू शकला नाही तेथे खेड्यातील वाचकाबद्दल न बोललेलेच बरे ! राष्ट्राच्या साहित्यभांडारात एका ग्रंथाने भार वाढला एवढेच त्या ग्रंथकाराने समाधान मानावयाचे ! आपल्या भारतात ज्यांचे ज़ीवन हे मुळी जीवनच ठरत नाही, अशा अफाट प्रमाणात वास करणाऱ्या म्हणजे ज्यांच्या कष्टावर, श्रमावर, घामावर जे पोशाखी शहरवासीय लोक जगतात – अशा श्रमजीवि, शेतकरी, मजूर, दलित आदि वर्गांच्या उन्नतीस्तव कोणते व किती साहित्य निर्माण झाले व त्याचा या बहुजनसमाजाला किती उपयोग झाला ? त्याचे जर उत्तर असेल 'कांही नाही,' तर या साहित्याचे

अनुक्रमणिका

आमच्या खेड्यापाड्यांच्या दृष्टीने मूल्यमापन शून्यवत्‌च ठरणार ! वस्तुतः अव्यक्त ते व्यक्त करणे व स्वतः शिकून इतरांना धडा देणे हे कार्य प्रत्येक सुशिक्षिताचे आहे. प्रत्येक व्यक्ति सुशिक्षित झाली पाहिजे, सुसंस्कृत झाली पाहिजे; तिने आपल्या सुखदुःखाचे समालोचन स्वतःच केले पाहिजे व ज्या दृष्टीने राष्ट्राचा दर्जा वाढेल अशी कृति आचरली पाहिजे, अशा सद्‌हेतूने प्रेरित होऊन रंजक पण बोधप्रद वाङ्मय-निर्मिति सुबोध भाषेत व्हावी आणि त्याची पोच खेड्यापाड्यातील हृदयाला जाऊन भिडेल — तेथील जनतेला आपल्या जीवनाचे प्रतिबिंब न्याहाळता येऊन, त्या वाङ्मयाद्वारे जनता आपली सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडविण्यास समर्थ ठरेल, याची दखल लेखकाने व प्रकाशकाने, साहित्यसंस्थांनी व शासनाने जागरूकतेने घ्यावयास पाहिजे. ग्रामीण जनतेसाठी जे वाङ्मय निर्माण करावयाचे ते त्या जनतेला आपले आहे — आपल्या कल्याणाचे आहे असे वाटावयास हवे. पण असे वाङ्मय खेड्यापाड्यातील जीवनाशी पूर्ण समरस होऊन, तळमळीने व कळकळीने निर्माण झाले तरच ते लोकाभिमुख होईल, हितप्रद ठरेल.

लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला

ग्रामीण जीवनात लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला यांना संस्कृतिसंवर्धनाच्या, अस्सल रीतीभातींच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे स्थान आहे. खेड्यापाड्यातील जनमनाची पकड घेण्यासाठी — तेथील लोकांना सहज व सुलभ रीतीने समजेल व उमगेल अशी भाषा — अशी बोली महाराष्ट्रातील साधुसंतांनी वापरली. त्यांनी जनतेचा आत्मा नीट हेरला. तिच्या प्रकृति व प्रवृत्तीचा नीट कानोसा घेतला — तिच्या अवस्थेचे नीट निदान केले आणि मग आपली वाणी व लेखणी त्यांनी बहुजनहिताय उपयोगात आणून तिला उन्नतीचे पथदर्शन घडविले. आपल्या महाराष्ट्रात लोकभाषेची उंची, तिची उत्तुंग भरारी आणि तिचा लखलखणारा उंची साज विशेष आहे. म्हणून साहित्यिकांनी आपल्या या ठासीव व प्रभावी लोकभाषेकडे उपेक्षित नजरेने न

अनुक्रमणिका

पाहाता तिचा यथायोग्य वापर करून मराठी भाषा संपन्न केली पाहिजे. लोकसाहित्य तर मराठी संस्कृतीचे – आचारधर्माचे उदात्त प्रतीक आहे; आणि लोककला ग्रामीणांच्या सुखदुःखांना वाचा फोडून, त्यांच्या रखरखीत जीवनात विरंगुळा निर्माण करून त्यांना स्फूर्ति देणारे अमोघ साधन आहे. 'सारजा माझे बाई, कर दळण कांडण। तुझा येईल भरतार, कर आसूनं पूजन।' अशा अत्यंत मधुर, रसाळ, संस्कृतिनिदर्शक जनपद ओव्या पहाटेच्या रम्य वातावरणात जात्याच्या घरघरीबरोबर संपूर्ण गाव भारून टाकतात; तर डफाची थाप, तुणतुण्याचा निनाद, ढोलकीचे ठेके आणि टाळांचा गजर कधी भक्तिमार्गाचा महिमा गातात तर कधी वीररसाचे पोवाडे गाऊन देश व धर्मरक्षणार्थ जनजागृति करतात. आणि म्हणून साहित्यिकांनी लोकभाषा, लोकसाहित्य व लोककला यांच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्नशील असले पाहिजे. आजच्या मुंबई राज्य सरकारने इकडे विशेषत्वाने लक्ष पुरविले आहे ही अधिक समाधानाची गोष्ट आहे – उद्याच्या नव्या महाराष्ट्रातहि या तिन्ही गोष्टीकडे सरकार कटाक्षाने लक्ष देईल, असा विश्वास वाटतो.

संतांचे लोकोत्तर कार्य अंगी बाणवा

सर्व वाङमयात संतवाङमय सर्वश्रेष्ठ आहे. संतांचे आचार, विचार आणि वचने प्रमाणभूत मानली जातात. महाराष्ट्रात जे संत होऊन गेलेत ते सर्व आशावादी आणि मानवी जीवनाचे मूल्य सिद्ध करणारे होते. धर्म आणि रूढि यांचे मंथन करून त्यांनी मानवी धर्माची शिकवणूक एका उच्च व उदात्त पातळीवरून दिली. त्यांचे कार्य केवळ भक्तिमार्गाचे नव्हते तर मनुष्यमात्राच्या कल्याणाचे आणि भावनात्मक एकतेच्या सिद्धांताचे होते. कालमानाप्रमाणे रूढि बदलली जाऊन नवीन विचारांचे – नवीन कल्पनांचे अधिराज्य प्रस्थापिले जावे आणि 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' अशा हितप्रद धोरणाचा अवलंब केला जावा असा त्यांचा आदेश होता. उदात्त, निर्मळ व प्रभावी स्वरुपाच्या त्यांच्या वाङ्मयसंपदेच्या

अनुक्रमणिका

कोंदणात त्यांची असामान्य कर्तबगारी समाविष्ट होती. त्यांच्या कामगिरीत कांही टीकाकार समजतात तसे प्रतिगामित्व नव्हते तर हृदयात परिवर्तन घडवून आणून मनुष्यत्व सिद्ध करणारे पुरोगामित्व होते. तसेच संतांसंबंधी बहुतेकांचा असाच समज आहे की संत निरुपाधिक, निरंजन, शब्दब्रम्ह व परब्रम्ह यात गुंतलेले, आपल्याच तंद्रीत रमलेले, सभोवतालच्या जगाशी संबंध न ठेवणारे आणि आपल्याच उद्धाराची कास धरणारे होते. पण असा समज असणारांनी थोडचा दूरगामी आणि व्यापक दृष्टीने विचार केला तर त्यांना असेच म्हणावे लागेल—

काय या संतांचे मानूं उपकार । मज निरंतर जागविती ।।
काय देवा यांसी व्हावे उतराई । सेविता हा पायी जीव थोडा ।।
सहज बोलणे हाचि उपदेश । करूनी सायास शिकविती ।।

म्हणून मला म्हणायचे आहे, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारे ।।' इतके लोकोत्तर कार्य संतांचे आहे. तेव्हा त्यांना प्रतिगामी समजून, ते स्वतःच्या उद्धाराप्रीत्यर्थ झिजले असा आक्षेप घेणे अन्यायकारक आहे. वस्तुतः संतांनी जनसमूहाला अज्ञानांधकारातून बाहेर काढण्याचा कसोशीने प्रयत्न करून, त्याला खऱ्या कर्तव्याची तीव्र जाणीव करून दिली आहे; आणि म्हणून लोकजागृतीचे अस्सल राष्ट्रकार्य करणारे ते क्रांतिकारक संत होते. अशा या क्रांतिकारक संतात भागवतधर्म प्रस्थापक संत ज्ञानेश्वर, बंडखोर संत चोखामेळा, प्रगतिशील संत एकनाथ, लोकप्रतिनिधि संत तुकाराम, राजकारणपटु स्वामी रामदास आदि थोर संतांचा अभिमानपूर्वक उल्लेख करता येईल. कांही टीकाकार पंडित संतांची प्रथम, द्वितीय, तृतीय अशा श्रेणी ठरविण्याचा प्रयत्न करतात ही खेदाची गोष्ट आहे; तसेच त्यांचा जातवार दर्जा ठरविणें अनिष्ट व अशोभनीय आहे. सर्व संत मग ते कोणत्याहि जातीचे वा संप्रदायाचे असोत एक होते, श्रेष्ठ होते. टीकाकारांनी आपल्या विद्वत्तेचे प्रदर्शन, जनतेचा बुद्धिभेद करून मांडणे इष्ट नाही. उलट, सर्व संतांचा उच्च आदर्श जनतेसमोर ठेवायला हवा; आणि त्या दृष्टीनेच संतवाङमयाचे

संशोधन झाले पाहिजे. धर्म, भाषा आणि संस्कृति यावर जेव्हा जेव्हा आपत्ति आली तेव्हा तेव्हा त्यांनी या सर्वांचें रक्षण करून महाराष्ट्राला सावरले. ते कर्मयोगी होते. रंजल्यागांजलेल्यांचे कैवारी होते. त्यांची भागवतधर्मीय कामगिरी म्हणजे समाजइमारतीचा पाया दृढ करणारी, संस्कृतितटाला पडूं पाहाणारी खिंडारे बुजविणारी, मोलमजुरी करून व शेतजमीन नांगरून श्रमाचे मोल ठरविणारी आणि माणुसकीच्या मर्यादा विशद करणारी होती. त्यांनी वाद करून धर्मच्छल आरंभिला नव्हता, तर भेद, कलह, फूट, विषमता नष्ट करून ऐक्य व बन्धुत्व निर्माण करण्याचे उच्चतम कार्य अंगीकारले होते. त्यांनी महाराष्ट्र ही पावनभूमि बनविली होती. त्या संतांची अमृतवाणी खेडयापाडयातील जनतेच्या जिभेवर सातत्याने तरंगत आहे – ग्रामीण आसमंत दुमदुमवीत आहे. पण या संतांचे यथार्थ दर्शन ज्या साहित्याद्वारे घडायला पाहिजे तसे बोधप्रद साहित्याचे दालन पुरते उघडले गेले नाही. काही संताबावत जाडी ग्रंथरचना झाली ही अभिमानाची गोष्ट आहे, पण काही संत अजूनहि उपेक्षिले गेले आहेत. श्रीसंत चोखामेळा, संत सावतामाळी, गोरा कुंभार, संत सेना न्हावी सारख्या संतांच्या वाङमयाचे जे संशोधन व्हायला पाहिजे व त्याच्या पुस्तिका का होईना ग्रामीण विभागाच्या घराघरात विखुरल्या पाहिजेत, असे प्रयत्न झालेले नाहीत. ते कार्य दक्षतेने व अवश्य व्हावे, अशी साहित्यिकांना विनंती आहे.

लोकसाहित्याच्या चिरंतन मूल्यांचे दर्शन घडवा

लोकसाहित्य हे जनतेचे व पर्यायाने देशाचे खरे मानधन आहे! खेडयापाडयातील जीवनसंस्कृतीची – रीतिरिवाजाची उत्कट, उदात्त व भावप्रेरक नानाविध चित्रे या लोकसाहित्यात चित्रित केली गेली असून, त्यात आमच्या खेडुत बन्धुभगिनींचा आत्मा सामावलेला आहे. संतवाङमयाइतकेच हे लोकसाहित्य श्रेष्ठ व मोलाचे आहे. ते अलिखित अक्षर वाङमय आहे. स्वयंस्फूर्तीने निर्माण होणारी ती अ लोकवाणी असून, कृषिवल जीवनातून पाझरणारे निर्मळ निर्झर

त्यात आहेत. त्यात ग्रामीण हृदयाचे उत्स्फूर्त व उत्कट बोल आहेत. अशा या मानधनाचे जितके अधिक संशोधन होईल तितके करून, त्याचे जतन व संवर्धन करणे आज अगत्याचे आहे. ग्रामीणांच्या हृदयसागरातून उगम पावलेली व त्यांच्या जिव्हेवरून तरंगत पवनाला जाऊन भिडणारी ही हितप्रद लोकसाहित्य–गंगा असून, तीत खेडुतांच्या सुख-दु:खाचे, आचारविचारांचे, कर्तव्यधर्माचे आणि रीतिरिवाजाचे अनेक मनोज्ञ प्रवाह झुळझुळत आहेत. त्यांच्या सोज्वळ, ऋजुतम भावभावनांची अनेक मूल्यवान रत्ने तिच्या पोटी दडलेली आहेत. त्याची अस्मिता काही आगळीच आहे ! इतिहास संशोधक ज्या श्रमाने इतिहासाचे संशोधन करतो, पुरातन वस्तूंच्या उत्खननाने गत काळाच्या वैभवाचे महत्त्व जनतेच्या निदर्शनास आणून देतो, अगदी तसेच हे लोकसाहित्य श्रमपूर्वक संशोधून त्याच्या चिरंतन मूल्यांचे आजच्या आधुनिक जनतेला दर्शन घडविले पाहिजे. लोकगीते, लोककथा, पोवाडे, लावण्या, भारुड आदींनी लोकसाहित्याची दालने समृद्ध आहेत. ती सर्व भाषासौंदर्य, भावसौंदर्य व विचारसौंदर्य यांनी विनटलेली आहेत. त्यात खेडुत जनतेची असीम कल्पकता, सूक्ष्म निरीक्षणशक्ति व परिस्थितीची तीव्रतर जाणीव प्रतीत झाली आहे. या जिवंत वाङमयप्रकारात ज्या रम्य उपमा, जे बोधप्रद दृष्टांत आणि मार्मिक संकेत दर्शविले आहेत व ज्या करुण, वीर, शांत इत्यादि रसांचा आविष्कार केला आहे त्याबद्दल कोणीहि आमच्या खेडुत बन्धुभगिनींचे मुक्तकंठाने कौतुकच करील ! अनुभव हेच त्यांचे खरे ज्ञान, निसर्ग हेच त्यांचे मोठे वैभव ! या लोकसाहित्याच्या क्षेत्रात नाही म्हणायला अलीकडे थोडेफार संशोधन झाले आहे. त्या दृष्टीने सानेगुरुजी, मालतीबाई दांडेकर, कमलाबाई देशपांडे, पां. श्रा. गोरे, डॉ. ना. गो. नांदापूरकर, दुर्गा भागवत, वा. कृ. चोरघडे, सरोजिनी बाबर, वि. वा. जोशी प्रभृतींचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे. पण माझी या साहित्याच्या संशोधकांना विनंती आहे की, ज्या ज्या बोलीत लोकसाहित्याचे विविध प्रकार आहेत ते जसेच्या तसे दिले गेले पाहिजेत. त्यावर कोणताहि शहरी संस्कार होता कामा नये. बनावटी रचना करून या

साहित्याच्या संशोधकांनी ते डागळू देऊ नये. त्यात आपल्या पदरची भर घालून 'पहा हे लोकसाहित्य' असा आव आणण्याचा प्रयत्न करू नये. लोकसाहित्य म्हणजे ग्रामीणांच्या जीवनाचे, संस्कृतीचे स्वच्छ प्रतिबिंब उमटविणारा आरसाच होय. या आरशाद्वारे खेडुताविषयीचे सम्यक् ज्ञान सहज होऊ शकेल. अलीकडे हे लोकसाहित्य; जुन्या पिढीतील व्यक्ति जसजशा नामशेष होत जातात तसतसे लोपले जात आहे! शिवाय, शहरी वातावरण खेड्यापाड्यापर्यंत पोचले सात असल्याने या धनाकडे दुर्लक्ष होऊन ते विरत जात आहे! तेव्हा या साहित्याच्या संशोधनाबाबत जागरूकतेनें पुढे पाऊल टाकायला हवे. ग्रामीणांच्या पूर्वेतिहासाचे दर्शन या लोकसाहित्यात प्रकर्षाने घडेल इतके ते अमूप आहे. या सर्वांचा सखोल अभ्यास करून कोणाहि संशोधकाला त्यावर मोलाचे ग्रंथ निर्माण करता येऊन, त्याच्या निर्मितीने आजच्या आधुनिक काळात योग्य ते मार्गदर्शन घडविता येईल; आणि त्यायोगे शहर व खेडे यांचा परस्पर हितसंबंध जोडता येण्यास खचितच मदत होईल.

अलिखित वाङ्मय हेच खरे अभिजात लोकसाहित्य

'लोकसाहित्य — वर की शाप?' या विषयावरील आपल्या एका भाषणात प्रा. ना. सी. फडके यांनी मोठे प्रक्षोभक विचार व्यक्त केले. ते म्हणतात, "राजकारणात वेळोवेळी जशा निरनिराळ्या घोषणा केल्या जातात तशाच त्या साहित्यातहि केल्या जातात. आज लोकसाहित्याची नवी घोषणा सवंगपणे पुढे आली आहे. परंतु आज ही घोषणा केली जात असताना तिची कल्पना स्वच्छ असावयास हवी. लोकांचे, लोकासाठी व लोकांनी निर्माण केलेले साहित्य ते लोकसाहित्य असे प्रतिपादन करीत असताना जी आग्रही भूमिका घेतली जाते, त्यातील धोके जर ओळखले नाहीत तर घात होईल. कलेच्या प्रांतात जेव्हा भलभलते लाड वाढतात तेव्हा तिचे स्वरूप हीन होते. लोकाकडे सन्मुख झाल्यावर आपण खाली जाणार आहोत की त्यांना वर आणणार आहोत हाच विचार करण्याचा प्रश्न आहे. कलेच्या उच्च आणि

अनुक्रमणिका

अभिजात पातळीवर लोकांना आणले तरच लोकसाहित्य हा वर ठरेल. मात्र कलेची अभिजात पातळी सोडली, तर तेच लोकसाहित्य शाप ठरेल." ज्या भूमिकेवरून प्रा. फडके यांनी लोकसाहित्याचे विश्लेषण केले ती भूमिका लक्षात घेतली म्हणजे ती किती ठिसूळ आहे याची कल्पना येते. कारण लोकसाहित्याचा अभिप्रेत असलेला 'अलिखित वाङमय' हा जो अर्थ तोच नेमका त्यांनी डावलला असल्याने, त्यांनी आपल्या सोयीसाठी 'अभिजात कले'च्या अवगुंठनाखाली विवेचिला आहे. मुद्दाम म्हणून साहित्यिकांनी 'लोकसाहित्य' निर्माण करणे हे वेगळे व कसल्याहि आधुनिक साधनांचा वापर न करता स्वयंस्फूर्तीने खेडुतांच्या जिव्हेवर वाङमय तरळणे हे वेगळे ! लोकसाहित्याचे मूळ नीट न समजून घेतल्याने व परंपरागत चालत आलेल्या अलिखित अक्षर वाङ्‌याचा अभ्यास न केल्याने फडक्यांनी 'लोकसाहित्य–वर की शाप ?' असा उगाच प्रश्न निर्माण करून व्यंगपूर्ण अर्थाने लोक-साहित्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला !—आणि आपल्या नेहमीच्या प्रवृत्तीनुसार लोकसाहित्यलेखकांना व सरकारला दूषणहि त्यांनी दिले ! त्यांनी खरोखरीच 'अलिखित वाङमया'चे म्हणजे ज्याला खऱ्या अर्थाने 'लोकसाहित्य' म्हणतात त्याचे संशोधन करावे आणि मग त्यासंबंधी आपली भूमिका स्पष्ट करून, लोकसाहित्याच्या त्या निकषावर, 'लोकांचे, लोकासाठी व लोकांनी निर्माण केलेले साहित्य' याची अवश्य मीमांसा करावी, अशी माझी त्यांना विनंती आहे.

संस्कृतिपोषक वातावरण निर्माण करा

आजकालच्या पिढीला एक वेगळयाच प्रकारचे अनिष्ट वळण लागल्याचे आढळून येते ! पूर्वी मराठी संस्कृतीला जे पोषक वातावरण निर्माण केले जात असे त्याला अलीकडे विकृत स्वरूप प्राप्त होत आहे. हे स्वरूप गेल्या पाव शतकापासून बळावत चालले आहे. पूर्वी प्रातः-काळी उठणे, स्नानादि विधि आटोपून थोरांच्या वचनांचे पठन, मनन, चिंतन करणे, सडासारवण होऊन मंगल वातावरण निर्माण होणे, प्रत्येक गोष्ट ठाकठिकीने–व्यवस्थित करून कष्टाची कामे करणे आदि

अनुक्रमणिका

किती तरी गोष्टी यंत्रवत होत असत; पण आज केव्हातरी झोपणे-उठणे, हाततोंड न धुताच खाणे-पिणे, थोरांच्या वचनांच्या पठना-ऐवजी शृंगारिक व बीभत्स सिनेमा गाणी गात सुटणे, पाश्चात्य पद्धतीचा भपकेवाज पोषाख करून मिरवणें आदि गोष्टींना बराच ऊत आला आहे! या सर्वांचा अर्थात्च आपल्या संस्कृतीवर अनिष्ट परिणाम झाला आहे. त्याची झळ लहानसहान बालकबालिकांनाहि लागली असून, ते नसत्या मार्गाचा अवलंब करीत आहेत. तीच गोष्ट लैंगिक व भोगवादी ललितवाङमयाची! वैचारिक वाङमयाचे अध्ययन सुटले आणि रंजनाच्या व कलेच्या नावाखाली निकृष्ट दर्जाच्या वाङमयाला आजचे वाचक बळी पडू लागले आहेत. या सर्व गोष्टींची झळ आता खेडचापाडचांनाहि ग्रासू पाहात आहे! या सर्व बाबींचा या परिवर्तनाच्या काळात आत्मलक्षी होऊन विचार करणे व संस्कृतिपोषक वातावरण निर्माण करण्याचा आणि उच्च दर्जाचे साहित्य जनतेला सादर करण्याचा कसोशीचा प्रयत्न झाला पाहिजे.

साहित्यातील शाश्वत मूल्यांची दिशा

जीवनात साहित्याला महत्वाचे स्थान आहे. साहित्य वगळले तर जीवनाला अर्थ उरणार नाही. त्यातील रस नष्ट होईल आणि त्याचे रूप वेढब बनेल. शब्दब्रम्हानेच जीवनाला विशिष्ट आकार आला आहे. शब्दशास्त्र त्यातूनच निर्माण झाले आहे आणि त्याने विश्वाचे दर्शन घडविले आहे. अर्थात् नियतीच्या प्रकियेत ज्या विविध घटना घडतात व त्याचे दृश्य स्वरुपात जे नानाविध आविष्कार होतात त्या समुच्चयाला 'साहित्य' ही संज्ञा प्राप्त झाली आहे. पण या साहित्याने जीवनातील निरामय आनंद, मंगलमय सौंदर्य आणि उदात्त भाव निर्माण केला तरच त्याचे शाश्वत मूल्य सिद्ध होते. 'कला' ही त्या विश्वस्पर्शी प्रक्रियेतूनच आकाराला आली आहे आणि म्हणून ती तशी वन्धमुक्त आहे; पण कांही स्वैर नाही. जीवन, नीति आणि कला यांचे तसे अन्योन्य संबंध आहेत. नीतीने कला बांधली जात नसली तरी तिची अवहेलना करून ती भरारीहि मारू शकत नाही. कारण त्याचा

परिणाम जीवनावर होत असतो. आणि म्हणून साहित्यनिर्मिति, जीवनाच्या सर्व कक्षा, संबंधित परिस्थिति व समाजावर होणारे परिणाम लक्षात घेऊन होणे आवश्यक असते. मनुष्यमात्राच्या सुखदुःखात साहित्य-कला अप्सरेच्या भूमिकेत वावरते आणि जीवनात आनंद-रस निर्माण करण्याचा प्रयत्न करते. निर्माण होणाऱ्या तशा वाङमयालाच ललितवाङमय म्हणतात. पण हे ललितवाङमय ध्येयवादी का भोगवादी; बोधवादी का छंदवादी आणि विचारवादी का सौंदर्यवादी असे दोन प्रवाह – दोन दिशा दर्शवून जीवनात त्याचे विशेष स्थान काय, याची पृच्छा करायची झाली तर, साहित्यिकांना कोणत्या वाटेने जावे याचा संभ्रम निर्माण होतो. त्यावेळी मानवाच्या आनंदाबरोबर कल्याणाचेहि कार्य करणारे ललितवाङमय हेच त्या दोन्ही प्रवाहांना – दिशांना एका बिन्दूपाशी आणू शकते. ख्यालीखुशालीचे, थाटामाटाचे व स्वच्छंद आचारविचार व विहाराचे भोगवादी वाङमय जीवनाचे चिरंतन मूल्य प्रस्थापित करू शकत नाही; ते ध्येयवादानेच उच्च व प्रभावी होऊ शकते. पण हा ध्येयवाद व्यक्तिनिष्ठ नसावा, आत्मनिष्ठेच्या प्रज्ञेतून समाजनिष्ठेवर आधारित असावा व त्याला आनंद व सौंदर्य याची रसपूर्ण, भावपूर्ण, गंधपूर्ण व रूपपूर्ण जोड असावी; त्याशिवाय त्याचे ईप्सित फलदायी होणार नाही. म्हणून ललितवाङमय शब्दमंत्रांनी विश्वदर्शन घडविणारे वास्तववादी असावे, पण मोहिनी टाकून अमंगलतेकडे नेणारे नसावे. ते सौंदर्यवादी असावे पण विचारवादाने मतप्रचार करणारे नसावे. ते बोधवादी असावे, पण निरनिराळ्या छंदवादात गुरफटून टाकणारे नसावे. याचा अर्थ असा की साहित्याचा आत्मा प्रकाशमान असावा व तो इतरांना प्रकाश दाखवून "'आनंद' देणारा व नियतीच्या प्रक्रियेतील घटना वास्तवतेबरोबर स्पष्ट करणारा असावा.

साहित्यात उत्कट जीवनदर्शनाची नितांत आवश्यकता

साहित्यातील जीवनदर्शनासंबंधी थोड्या व्यापक दृष्टीने विचार केला तर त्याच्या मूल्याची कल्पना येऊन, पंचवीस वर्षांपूर्वी आपण

कोणत्या मुक्कामावर होतो व आज आपला मुक्काम कुठे हे स्पष्ट होते. हरिभाऊ आपटे, वामन मल्हार जोशी, साने गुरुजींसारख्या साहित्यिकांनी साहित्याचा जो दर्जा व जी मूल्ये सिद्ध केली, आपल्या भरीव वाङमयाद्वारे जे जीवनदर्शन घडविले, तो दर्जा व ती मूल्ये आजकालच्या साहित्याने निर्माण केली आहेत का? असा प्रश्न उपस्थित होऊन मन खिन्न होते! ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे प्रभृति प्रतिभासंपन्न साहित्यिकांनी कांही काळ तो दर्जा व ती मूल्ये सिद्ध केली खरी; पण त्यांना जी स्थिरता व परिणामकारकता हवी होती ती मात्र बहुतांशी डळमळली! कांहीशा भोगवादाकडे झुकून फडके व माडखोलकर यांनी समाजाला हादरा दिला–त्यातून माडखोलकरांनी वेळीच स्वतःला सावरून घेतले; पण फडके मात्र 'मागणी तसा पुरवठा' म्हणून केवळ आपल्या नावाच्या बळावर 'बाजारू वाङमय' खपवू लागले! खांडेकरांनी आपला ध्येयवादी दृष्टिकोन मात्र बदलला नाही, पण ललितवाङमयात ध्येयवाद किती मर्यादित स्वरुपात असावा याचे पुरते निदान न केल्याने ते कांहीसे रेंगाळले! पु. य. देशपांडे यांनी मात्र मध्ये कांही काळ जाऊ देऊन आपली अध्यात्मिक बैठक निर्माण केली. पण काहीहि असले तरी या साहित्यिकांनी आपल्या एका भर उमेदीच्या काळात साहित्याच्या मूल्यांची बूज राखली हे मात्र खरे! त्याचप्रमाणे प्रा. सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. अनंत काणेकर, प्रा. वा. कृ. चोरघडे, श्री. प्रभाकर पाध्ये, श्री. गो. रा. दोडके प्रभृति कथाकार व निबंधकारांनी साहित्याचे दालन समृद्ध केले; त्याचा विशिष्ट दर्जाहि प्रस्थापित केला; पण अलीकडे त्यांची गति बरीच मंदावली आहे. कवि केशवसुतानंतर अनिल (आ. रा. देशपांडे), बा. सी. मर्ढेकर, कुसुमाग्रज (वा. वि. शिरवाडकर), आनंदराव टेकाडे, ना. के. बेहरे, यशवंत, गिरीश, (कानेटकर) वा. ना. देशपांडे, भ. श्री. पंडित, ना. घ. देशपांडे, प्रा. या. मु. पाठक प्रभृति कवींनी काव्यप्रांत संपन्न केला. माधवज्युलियनचे स्थान कांही वेगळे आहे. केशवसुत व माधवज्युलियन यांनी जे अर्थपूर्ण भावविश्व निर्माण केले त्याची मूल्ये उच्च आहेत.

राम गणेश गडकरी यांचाहि दर्जा तितकाच श्रेष्ठ आहे. कवि अनिलांनी मात्र काव्याची एक नवीन प्रभावी वाट निर्माण केली. शरच्चन्द्र मुक्तिबोध, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, पु. शि. रेगे, द. चिं. सोमण प्रभृति कवि नवकाव्याची अर्थात् मुक्तछंदप्रणीत वाट डौलाने आक्रमित आहेत; पण केव्हा केव्हा त्यांचा डौल डगमगत असतो असेहि आढळून येते ! मर्ढेकरी वाटेने जाणाऱ्या त्यांच्या शिष्यांनी तर अलीकडे 'नवकाव्य' म्हणून कहर केला आहे ! अण्णासाहेब किर्लोस्कर, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी, मामासाहेब वरेरकर, वीर वामनराव जोशी, ना. रा. बामणगावकर, प्र. के. अत्रे, अनंत काणेकर प्रभृति नाटककारांनी मराठी रंगभूमि सजविली आहे, संवर्धिली आहे. पण पंचवीस वर्षापूर्वी मराठी साहित्याची कथा, कादंबरी, काव्य, नाटक आदि जी दालनें समृद्ध झाली होती, त्यांना जो दर्जा प्राप्त झाला होता, तो अलीकडील काळात मात्र बराच ढासळला आहे ! पूर्वीची, हरिभाऊ आपटयांच्या काळातील ती उच्च प्रभावळ आज उरली नाही. साहित्यातील जीवन-दर्शन व मूल्ये त्या प्रकर्षाने आढळत नाहीत. साहित्यात शाश्वत मूल्ये ठरणारे जीवनदर्शन घडावे असे आज तीव्रतेनें वाटू लागले आहे. त्या दृष्टीने, साहित्यातील जीवनदर्शनासंबंधी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार मननीय वाटतात. ते म्हणतात, "मानव ज्या वेळी पृथ्वीवर अवतीर्ण झाला त्या वेळी तो स्वतःबरोबर वाङमय-ज्योति घेऊन आला. विश्वाची प्रतिभात्मक जाणीव या ज्योतीत साठविलेली होती. विश्वाची सर्जनशक्ति व मानवाची कर्तृत्वशक्ति ही जवळ जवळ एकरूप आहे. मानवाला कर्तृत्वाशिवाय भोक्तृत्व नाही. त्याला विश्वाची निर्मिति करण्याची शक्ति प्राप्त झाली आहे. त्याची ही शक्ति देशकालबद्ध असते. त्या शक्तीने मानव सुन्दर व कलात्मक वाङमय निर्माण करतो. आपल्या भोवतालच्या परिस्थितीशी सतत संघर्ष करीत मानव्य हे जे सतत देवत्वाशी व नियतीशी झगडत आले आहे त्यातून निर्माण झालेली मूल्ये, हे साहित्याचे मूल्यविश्व

होय; व हेच मूल्यविश्व म्हणजेच पर्यायाने संपूर्ण मानवाचे दर्शन. हेच साहित्यातील जीवनदर्शन होय." आजच्या या बदलत्या काळात– विज्ञानयुगाच्या काळात तर्कतीर्थांनी ज्या व्यापक अर्थाने साहित्यातील जीवनमूल्यासंबंधी विचार व्यक्त केले त्यांचा अवश्य विचार व्हायला पाहिजे.

साहित्यातील विकृतीला आळा घातला पाहिजे

साहित्य हे पूर्वी एका विशिष्ट वळणाचे–एका विशिष्ट आकार-बंधांनी बांधलेले पण प्रभावी असे. त्यातील समाजदर्शन उठून दिसे. पण अलीकडे साहित्याचे नवनवीन प्रयोग सुरू झाले. नवकथा, नव-काव्य, नवनाटच हे ते विशेष प्रकार होत. परंतु या नवनवीनतेच्या नावाखाली आज इतका एकांगीपणा, अतिरेकीपणा व विकृतपणा निर्माण झाला की साहित्यविषयक मूलतत्त्वे–एखाद्याला मुळाक्षरे शिकवावीत त्याप्रमाणे – पुन्हा शिकविण्याची गरज आहे असे वाटू लागते. आजच्या नवकवींचे भरमसाट 'नवकाव्य' पाहिले म्हणजे किती खालची पातळी गाठली गेली आहे, याचा प्रत्यय येतो. ज्याला जीव-नानुभूति नाही, व्यासंग नाही, कसली वैचारिक बैठक नाही तो कवि छाती फुगवून जी भरारी मारतो ती पाहिली म्हणजे कविता किंवा काव्य कशाला म्हणावे हेच कळत नाही. एका पदवीधर कवीचे काव्य वाचल्यावर, ते कोणत्या छंदात वा वृत्तात आहे, असे मी विचारले, तेव्हा तो हातवारे करीत उत्तरला, "नवकाव्याला छंद किंवा वृत्त कसले ? शब्दांची जुळणी आहे बस्स !" त्याला सहज छंद–वृत्ताची माहिती विचारली तेव्हा त्याला काहीच उत्तर देता येईना ! बरं, आशयाबद्दल विचारलं तर तो, 'प्रतिमा' व 'प्रतीके' हे दोन पाठ केलेले शब्द उच्चारून, स्वतःच्या कवितेचा अर्थ सांगायला असमर्थ ठरला ! तीच गोष्ट नवकथेची. मनोविश्लेषण–मनोविश्लेषण म्हणून कथा कोणत्याहि साच्यात व धाटणीत मांडली की झाली नवकथा ! आणि नवनाटच––त्या नाटककाराच्या हावभावानेच सिद्ध होते ! आजच्या साहित्याला असे विकृत स्वरूप प्राप्त झाले आहे, तेव्हा

त्याचा दर्जा किंवा मूल्य काय ठरणार ? आणि त्याचा समाजावर परिणाम तो कोणता होणार ? तेव्हा साहित्यात येत असलेल्या विकृतीला आता आळा घातला पाहिजे व नवोदित लेखकांना उत्तेजन देताना ' अनुभूति ' प्राप्त करण्याची व ' व्यासंगी वृत्ति ' राखण्याची जाणीवहि करून दिली पाहिजे.

कांही नामवंत साहित्यिकांचे कार्य

आजच्या साहित्यप्रांगणांतील खंदे कथाकार म्हणून श्री. पु. भा. भावे आघाडीवर असून, ते आपल्या लेखणीने महाराष्ट्र हलवून सोडत आहेत. तसेच अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांताराम (के. ज. पुरोहित), व्यंकटेश माडगूळकर हे विशेषत्वाने तळपत आहेत. पण गंगाधर गाडगीळसारख्या नामवंताच्या लेखणीतून बाहेर पडणाऱ्या बऱ्याच लघुकथा खालची पातळी गाठून विकृत मार्ग आक्रमित असल्याचे आढळून येते ! वास्तवता, मनोविश्लेषण व समाजधारणा याबाबत त्यांचा दृष्टिकोन मोठा विचित्र वाटतो ! नाटयाच्या क्षेत्रात कै. नानासाहेब जोग व श्री. वा. वा. भोळे यांनी कांही वेगळे स्थान प्राप्त केले; तर श्री. पु. ल. देशपांडे, श्री. वि. वा. शिरवाडकर, श्री. मो. ग. रांगणेकर, श्री. ह. वि. देसाई, श्री. वसंतराव वरखेडकर, श्री. विजय तेंडुलकर, श्री. वसंत कानेटकर, श्री. बाळ कोल्हटकर, सौ. मुक्ताबाई दीक्षित, श्री. पु. व्यं. दारव्हेकर, सौ. सुमतिबाई धनवटे प्रभृति नाटककार मराठी रंगभूमीला एक आगळेच स्वरूप देऊन बहार आणीत आहेत. नाटयसमीक्षणाच्या व रंगभूमीच्या अभ्यासाच्या बाबतीत श्री. वसंतराव देसाई कै. चिंतामणराव कोल्हटकर, श्री. द. रा. गोमकाळे, डॉ. रा. शं. वाळिंबे यासारख्या समीक्षकांनी भरीव कार्य केले आहे. मध्यंतरीच्या काळात रंगभूमीला अवकळा आली होती. पण आता ती नव्या तेजाने तळपून भव्य आकारास येत आहे. आपल्या राज्य सरकारनेहि तिकडे विशेष लक्ष पुरवून नाटयसंस्थांना, कलाकारांना उत्तेजन देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे. सौ. मालतीबाई बेडेकर, र. वा. दिघे, श्री. ना. पेंडसे, शरच्चन्द्र टोंगो,

शं. वा. शास्त्री, गो. नी. दांडेकर यांनी बजावलेली कामगिरी विशेष आहे. प्रादेशिक स्वरुपाच्या कादंबऱ्या निर्माण करून, श्री. ना. पेंडसे व गो. नी. दांडेकर हे खरोखरीच साहित्याची मोठी सेवा करीत आहेत. उपेक्षित भागाकडे दक्षतेने लक्ष पुरवून तेथील जीवनाचे यथार्थ दर्शन जितके अधिक घडविता येईल तितके घडविणे आज आवश्यक आहे. कोकणपट्टी, मराठवाडा, ठाणे – चांदा – भंडारा आदि विभागाकडे साहित्यिकांनी अगत्य करून लक्ष पुरविले पाहिजे व तेथील श्रमजीवि, दलित, आदिवासी लोकांच्या रखरखीत जीवनावर प्रकाश टाकणारे वाङमय निर्माण केले पाहिजे. एका दुसऱ्या दृष्टीने नाथमाधव व वि. वा. हडप या लेखकांचा मला विशेष उल्लेख करावासा वाटतो. त्यांनी मराठे व पेशवे यांच्या ऐतिहासिक काळातील जीवनदर्शनाचे व वस्तुस्थितीचे मोठे मार्मिक चित्र रेखाटून, ज्या ऐतिहासिक कादंबऱ्या निर्माण केल्या आहेत त्या निःसंशय उच्च दर्जाच्या आहेत. आजहि अशा प्रकारच्या ऐतिहासिक कादंबऱ्यांची व कथांची नितांत आवश्यकता आहे.

विद्वज्जनांच्या साहित्याचा आदर्श राखा

विदर्भाच्या पुरातन काळापासून चालत आलेल्या इतिहास, ज्योतिषशास्त्र, धर्मशास्त्र, टीकाशास्त्र, साहित्यशास्त्र आदि विविध क्षेत्रांची उज्ज्वल परंपरा कै. विद्वद्रत्न डॉ. भाऊजी दप्तरी, कै. यादव माधव काळे कै. पं. घुलेशास्त्री, कै. हरिभाऊ नेने, कै. नी. ब. भवाळकर, कै. नारायणराव अळेकर; लोकनायक डॉ. बापूजी अणे, महामहोपाध्याय डॉ. वा. वि. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. बा. ग. खापर्डे, डॉ. शं. दा. पेंडसे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. पु. य. देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, डॉ. मा. गो. देशमुख, श्री. वा. ना. देशपांडे, डॉ. वा. ना. पंडित, श्री. गु. ह. देशपांडे यासारख्या विद्वानांनी चालवून साहित्याची मौलिक सेवा केली आहे. त्याच प्रभावळीत श्री. दे. गो. लांडगे, डॉ. अ. ना. देशपांडे, प्रा. श्री. भा. वर्णेकर, प्रा. व पां. कृ. सावळापूरकर, प्रा. श्री.

मा. कुळकर्णी, श्री. अ. ज. राजुरकर, श्री. शं. गो. चट्टे यांच्यासारख्या विचक्षणांचे कार्यहि विशेष आहे. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी अली-कडे भारतीय साहित्यशास्त्रावरील उच्च प्रतीचा ग्रंथ लिहून आपली प्रगाढ विद्वत्ता सिद्ध केली आहे नागपूर विद्यापीठाने या ग्रंथाबद्दल त्यांना डॉक्टरेट (डी. लिट्) ही पदवी दिली आहे. आणि मराठीतील सांप्रतचा अखिल भारतीय प्रतिष्ठेला उतरणारा असा सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून साहित्य अकादमीने पाच हजारांचे श्रेष्ठ पारितोषिकहि देऊन डॉ. देशपांडे यांचा गौरव केला, ही वैदर्भीयांना विशेष अभिमानाची गोष्ट आहे. पं. बाळशास्त्री हरदास यांची धर्मशास्त्रावरील कामगिरी मोलाची आहे; आजच्या पिढीला नीतिमत्ता व संस्कृति या दृष्टीने निर्माण झालेले त्यांचे ग्रंथ विचारप्रेरक वाटतात. मराठी मातृभाषा असून ज्यांनी हिंदीवाङमय भरदार करण्याचा प्रयत्न केला अशा एका थोर साहित्यिकाचा – श्री. अनंतराव शेवडे यांचा अभिमानपूर्वक उल्लेख केला पाहिजे. तसेच कै. गुरुवर्य किसन फागोजी बनसोडे, कै. ग. म. ठवरे आणि पं. सीतारामशास्त्री कुरुंदकर, आचार्य दादा धर्माधिकारी, श्री. मा. ज. कानेटकर, श्री. अप्रबुद्ध, श्री. शंकरराव सरनाईक, श्री. बा. सं. गडकरी, श्री. शं. गो. डवीर, श्री. म. सी. मुंडले प्रभृति विचारवंतांची साहित्योपासना उच्च प्रतीची आहे.

त्याचप्रमाणे विदर्भात नव्या दमाचे तरुण संशोधक, टीकाकार, कथा –कादंबरीकार, नाटककार व कवि पुढे सरसावत आहेत. त्यादृष्टीने प्रा. सुरेश डोळके, श्री. व्यं. नी. पंडित, श्री. मा. कृ. पारधी, प्रा. प्रभाकर ऊर्ध्वरेषे, प्रा. पद्माकर डावरे, श्री. मु. प. भिशीकर, श्री. शांताराम जैन, प्रा. माणिक के. बैतुले, श्री. पां. ब. गाडगीळ, श्री. केशव केळकर, श्री. व्यं. ब. पुराणिक, श्री. दि. वा. फडणीस, श्री. तु. ना. काटकर, श्रीमती सुगंधा शेंडे, श्री. वसंतराव वऱ्हाडपांडे, प्रा. द. भि. कुळकर्णी, प्रा. मधुकर आष्टीकर, श्री. शंकरराव कुळकर्णी, सौ. इंदुमति शेवडे, श्री. गुणाकर देशपांडे, प्रा. मा. ल. व्यवहारे, सौ. उषाताई लिमये, सौ. प्रमिला भागवत, सौ. शांताबाई दंडिगे, सौ. इंदुमति गंधे, श्री. बाळ गंगाधर देव, श्री. म. त्र्यं. देव, श्री. सुनिल सुभेदार, श्री. गोपाळराव

गिरडकर, श्री. बावा मोहोड, श्री. उद्धव शेळके, प्रा. राम डोके आणि श्री. श्याम सोनारे, श्री. ल. वा. पडोळे, श्री. श्री. वि. गंधे, श्री. ग्रेस, डॉ. ना. के. महाजन, श्री. म. ना. सरपटवार, श्री. मधुकर वाव्रगावकर, श्री. गंगाधर पानतावणे, श्री. वसु भगत, श्री. मा. गो. जामदार, श्री. दिनकर देशपांडे, सौ. आशालता जाधव, श्री. मनोहर वझे, श्री. ना. हि. सोनडुले, सौ. अनुराधा परांडे, मनोहर वझे, श्री. श्रीपाद कावळे, श्री. प्रभाकर चांदेकर, श्री. आकाशानंद (आ. वा. देशपांडे), श्री. मनोहर तल्हार, श्री. देवराव उदापुरे, श्री. वा. ना. दिगम आदि साहित्यिक मित्रमंडळीचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

आजच्या तरुण संशोधकांनी व साहित्यिकांनी केवळ ललित-वाङ्मयावरच भर न देता, विद्वज्जनांनी जी उज्ज्वल परंपरा निर्माण केली आहे व वैचारिक प्रतिष्ठा प्राप्त करणारे जे मौलिक साहित्य निर्माण करून जो आदर्श पुढे ठेवला आहे त्याचे अनुकरण करून मराठी साहित्याचे स्थान उच्च व उदात्त राखण्याचा प्रयत्न कसोशीने करायला हवा.

स्त्रिया व बालके यांचेसाठी उत्कृष्ट वाङ्मय हवे

आज मला आणखी एका गोष्टीवर विशेष भर द्यावयाचा आहे आणि तो म्हणजे आधुनिक स्त्री–जीवनावर, त्यांच्या भाव–भावनावर प्रकाश टाकून आजच्या स्थितीचे वास्तवपूर्ण दर्शन घडेल व त्यांना आपल्या संस्कृतीचे संवर्धन करता येईल अशी वाङ्मयनिर्मिति होणे, हा होय. त्याचप्रमाणे बालमनावर उत्तम संस्कार घडून त्यांना पुढे आपले जीवन नीट न्याहाळता येणारे – त्यांना, आपण स्वतंत्र देशाचे समंजस नागरिक होणार आहोत याची जाणीव होणारे साहित्य निर्माण व्हावे व ते त्यांना सुलभतेने वाचायला मिळावे, अशी दखल घेणे आज आवश्यक आहे. अलीकडे मनात विकृति निर्माण होईल – त्यांच्या प्रकृति व प्रवृत्तीवर अनिष्ट परिणाम घडेल असे वाङ्मय घडत आहे. पालकांनी इकडे आता कटाक्षाने ध्यान देऊन आपल्या

अनुक्रमणिका

मुलाबाळांच्या हाती बालमनाला उत्कृष्ट वळण लागणारे साहित्यच देण्याचा प्रयत्न करावा आणि लेखकांनी त्या दृष्टीनेच मनोरंजनपर पण बोधप्रद बालसाहित्य निर्माण करावे, अशी विनंती आहे.

विविध बोली अभ्यासून मराठी भाषा समृद्ध करा

आपल्या महाराष्ट्रात वऱ्हाडी, नागपुरी, कोकणी, पुणेरी, चन्द्रपुरी, गोंडी, कोरकु, हळबी अशा अनेक विविध बोली आहेत. त्या बोलीत विविध वाक्प्रचार आहेत, म्हणी आहेत, गाणी आहेत, कथा आहेत. त्या सर्वांचे संशोधन करून, मराठी भाषा अधिक समृद्ध व संपन्न करण्यासाठी त्यांचा समन्वय घडविण्याचा प्रयत्न करायला हवा. एकमेकांच्या बोलीला किंवा वाक्प्रचाराला हिणविण्यापेक्षा सौहार्दाने मराठी भाषेला अधिक उन्नत व प्रभावी कसे करता येईल याचा विचार केला पाहिजे. परकीय शब्दांची भेसळ आपल्याला चालते पण आपल्याशी मिळत्या असणाऱ्या शब्दांचा मात्र आपण अव्हेर करतो. विविध बोलीतील काही शब्द खटकणारे किंवा जाणवणारे राहू शकतील, पण पुढे सरावाने त्यांची दीप्ति झळकल्याशिवाय राहणार नाही. म्हणून मराठीला संबंधित अशा सर्व बोलींचा समन्वय घडविण्याचे कार्य साहित्यिकांनी करावे असे विनम्रपणे सुचवितो.

वास्तववादी शुद्धलेखनात व लिपीत सुधारणा हवी

ज्या बहुजनसमाजाच्या दृष्टीने साहित्याच्या अंतरंगासंबंधी मी बोललो, त्याच बहुजनसमाजाच्या दृष्टीने साहित्याच्या बहिरंगासंबंधी म्हणजे लेखनपद्धतिसंबंधी बोलणे मी आवश्यक समजतो. देवनागरी लिपी ही हळूहळू अखिल भारतीय लिपी होऊ पाहात आहे व भारतीय एकतेच्या दृष्टीने हे सर्वस्वी योग्यहि आहे. मराठी साहित्य याच लिपीत लिहिले जाते ही खरोखर मोठी भाग्याची गोष्ट आहे. देवनागरी लिपी ही जगातील एक शास्त्रशुद्ध लिपी आहे. वास्तवता हा तिचा फार मोठा गुण आहे. परंतु सध्याच्या मराठी लेखनपद्धतीत लिपीवर नको तिथे अनुस्वारांना बसवून तिला एकप्रकारची विकृति आणली आहे. ऱ्हस्वदीर्घासंबंधीहि मराठी लेखनपद्धतीत बरीच

अवास्तवता आढळते. याचा परिणाम असा झाला आहे की शिकल्या-सवरलेल्या पदवीधरांनादेखील मराठी शुद्धलेखन साधत नाही. विश्व-विद्यालयातसुद्धा शुद्धलेखनाकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांना गुण द्यावे लागतात. मातृभाषा म्हणून ज्या मराठीचा आपण अभिमान बाळगतो व जिच्या नावावर वेगळ्या मराठी घटकराज्याची मागणी करतो ती मराठी भाषा सुशिक्षितांनादेखील शुद्ध लिहिता येऊ नये ही अत्यंत शोचनीय अवस्था आहे. परंतु यात सुशिक्षितांचा जितका दोष आहे, तितकाच किंवा त्याहूनहि अधिक लेखनपद्धतीतील अवास्तवतेचा दोष आहे. या अवास्तववादी लेखनपद्धतीमुळे अन्य भाषिकांना मराठी भाषा शिकायला अतिशय कठीण वाटते. मराठी मन समजून घेण्याला त्यांना या लिपीचीदेखील अडचण होत असावी.

या सर्व दृष्टींनी मराठीलेखनपद्धतीत वास्तववादी दृष्टीने सुधारणा व्हावयास पाहिजे. १९५३ साली विदर्भ साहित्य संघाने नेमलेल्या प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. डॉ. शं. दा. पेंडसे, प्रा. डॉ. मा. गो देशमुख व कै. प्रा. ह. ना. नेने या विद्वानांच्या समितीने सुचविलेले नियम या दृष्टीने प्रशंसनीय आहेत. विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने ह्या नियमांना मान्यताहि दिली आहे. तसेच मराठवाडा विद्यापीठ आणि पुणे विद्यापीठ यांच्या अभ्यास मंडळाने ह्या नियमांची शिफारस केली आहे असे कळते. अशा रीतीने ह्या नियमांना हळूहळू अधिकाधिक मान्यता मिळत आहे. परंतु जुन्याचा वृथा अभिमान धरणारे काही विद्वान या प्रगतिपर प्रवाहाला रोखू पाहात आहेत. आपल्या प्रतिष्ठेचा उपयोग करून भाषेला डबक्याचे स्वरूप ते देऊ पाहात आहेत. त्यांनी आपला दुराग्रह सोडून भाषेचा जिवंत प्रवाह वाहता ठेवावा, अशी त्यांना माझी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाने व नागपूर विद्यापीठाने मान्य केलेले नियम वास्तववादी दृष्टीने वर्तमानकाळाची गरज भागविण्यास पुरेसे नाहीत, असे मला वाटते. परंतु देवनागरी लिपीला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी भिन्न भाषिक त्या लिपीचा सुलभतेने

उपयोग करून एकमेकाची भाषा शिकू शकतील, अशी तिची घडण ठेवावी लागेल. यादृष्टीने शब्दाचे वेगवेगळे उच्चार व मुख्य लकबी लिपीतून स्पष्ट होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ—च वर्गीय अक्षरांचा उच्चार मराठीत दोन पद्धतीने होतो; एक संस्कृतातल्याप्रमाणे तालव्य व दुसरा काहीसा दन्त्य. तसेच 'पुण्यात' हा शब्द 'पुणे गावा'त आणि 'पापविरोधी जे पुण्य त्यात' या अर्थी वेगवेगळा उच्चारला जातो; पण लेखनपद्धति मात्र सारखीच आहे. तसेच कित्येक अनुस्वारांचे उच्चार पूर्णानुनासिकासारखे नसून अर्धानुनासिकाचे किंवा केवळ विशेष लकबीचे असतात. यांच्या उच्चाराचे वेगळेपण लिपीतूनहि स्पष्ट व्हावयास पाहिजे. पडलं, गेलं, पाहिलं इत्यादि शब्दातील अन्त्य अक्षराचा जोर देऊन होणारा उच्चार सुद्धा अनुस्वाराने केला जातो. पण हा अनुस्वाराचा दुरुपयोग आहे. हे सर्व उच्चारभेद लीपीतून व्यक्त करण्यासाठी नवीन चिन्हे शोधून काढण्याची किंवा अक्षरांना त्या त्या वेळी विशिष्ट वळण देण्याची अखिल भारतीय पद्धति शोधून काढण्याची आवश्यकता आहे. अक्षरावर अर्धचन्द्र देणे किंवा अक्षराखाली टिंब देणे या चिन्हांचा ह्या दृष्टीने उपयोग करून घेता येईल.

लेखनपद्धतिप्रमाणेच लिंगविचारहि अखिल भारतीय – नव्हे जागतिक – पातळीवरून व्हावयास पाहिजे, असे मला वाटते. कपाट म्हटले की नपुसकलिंगी आणि आलमारी म्हटली की स्त्रीलिंगी हे केवळ अशास्त्रीय होय. सगळ्या निर्जीव वस्तूंना नपुसकलिंगी मानावे व सजीव प्राण्यांचा लिंगभेद वास्तवतेवर आधारावा या दृष्टीने भाषेची प्रगति होणे इष्ट होईल. परंतु हा फार दूरचा विचार आहे, म्हणून केवळ त्याचा सूत्रपात करून ठेवतो.

अज्ञात जगाचे शास्त्रीय संशोधन व्हावे

आपल्याला दिसणाऱ्या या दृश्य जगाव्यतिरिक्त एक वेगळे अदृश्य जगहि आहे. त्या जगाकडे पाश्चात्य संशोधकांचे लक्ष वेधले गेले आहे, पण आपल्याकडे तसे लक्ष वेधले गेले नाही. त्या अज्ञात जगाकडे मी आपणा सर्वांचे लक्ष वेधू इच्छितो. हे अज्ञात जग मोठे प्रभावी

असून, नकळत त्याचे दृश्य जगावर विशेष परिणाम घडत असतात. प्राचीन काळी ऋषि – महामुनी आपल्या तपोबळावर जगाला जिंकणारी सिद्धि – साधना प्राप्त करून घेत असत याची आपल्याला माहिती आहे. तंत्र – मंत्र किंवा सिद्धि – साधना हा एक संशोधनाचा महत्त्वाचा विषय आहे असे मला वाटते. त्यासंबंधीचा अज्ञात जगाशी आपला प्रत्यक्ष संबंध न आल्याने तिकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक आहे. त्या अज्ञात जगातील शक्ति प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य जर कोणाला लाभले तर तो दृश्य जगातील प्रसंगाच्या वेळी त्या शक्तीचा सदुपयोग करून घेऊ शकतो. भूत – पिशाच्चांचे एक वेगळे जग आहे व ते जग दृश्य जगाला बाधक आहे असे आपण समजतो. माझ्या दृष्टीने ते बाधक नसून पोषक करून घेता येण्यासारखे आहे, अशी माझी धारणा आहे. या जगात भूत – पिशाच्च असे काही नाही. मनुष्य मृत्यु पावल्यानंतर, त्याचे जे आयुष्य उरते ते अज्ञात जगात शिलकेत असते; आणि ते पूर्ण होईपर्यंत मृतात्मा अदृश्य रूपाने भटकत असतो. ज्याला आपण मृतात्मा म्हणतो तो वस्तुतः मृतात्मा नसतो. त्याचे ते पवित्र मनोद्रव्य असते. मनुष्याचा मृत देह पंचतत्वात विलीन झाल्यावर ते मनोद्रव्य मात्र त्याची मर्यादा संपेपर्यंत इच्छित गोष्टीसाठी वावरत असते. या मनोद्रव्यात कोणतेहि कार्य करून घेण्याची प्रबल शक्ति असते. ही शक्ति आत्मसात् करून घेण्याचा दृश्य जगातील व्यक्तीने प्रयत्न केला व तिला तसे साध्य झाले तर विज्ञान शास्त्रातील संशोधनाप्रमाणे त्याहि संशोधनाला मोठे महत्त्व प्राप्त होण्यासारखे आहे. हे कार्य अर्थात् धाडसाचे आहे. ते संशोधकाच्या आध्यात्मिक शक्तीवर अवलंबून आहे. अलीकडे सिद्धि – साधनेच्या नावावर जे चमत्कार करून कीर्ति व पैसा प्राप्त करण्याचा बरेच व्यक्ति प्रयत्न करतात त्यापैकी हे संशोधन नाही. मंत्रतंत्रावर चमत्काराचे प्रदर्शन मांडणारे खरे सिद्धि – साधक नव्हेत. पण हा प्रश्न वेगळा आहे. मला अज्ञात जगाच्या शक्तिबाबत, आधात्मिक शक्तीच्या संशोधकांनी शास्त्रीय संशोधन करण्याचा प्रयत्न करावा एवढेच सुचवायचे आहे.

अनुक्रमणिका

मानवांच्या कल्याणार्थ 'सांस्कृतिक व्यासपीठ' निर्माण करा

माझ्या एका श्रेष्ठ साहित्यकार मित्राने, 'तुम्ही खेड्यातील साहित्यसम्मेलनाच्या व्यासपीठावरून कोणता संदेश द्याल?' अशी पृच्छा केली होती. मी वयाने, ज्ञानाने, अनुभवाने व वुद्धिमत्तेने अगदी कनिष्ठ आहे. मी एक खेडुत लेखक आहे, हे सांगितलेच आहे. मग या श्रेष्ठ साहित्याच्या व्यासपीठावरून संदेश देण्याची माझी पात्रता तरी काय आहे ? गेल्या पंधरावीस वर्षापूर्वी खेड्यापाड्यात शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य करण्याचा मी सामान्यत: एक तप अल्पसा प्रयत्न केला होता. ग्रामीण जीवन जगणाऱ्यांची अवस्था व दर्जा याची तीव्र जाणीव मला झाली आणि त्याच वेळी समाजाला उन्नत करण्यासाठी 'सांस्कृतिक व्यासपीठा'ची नितांत आवश्यकता आहे, याची कल्पना मला येऊन, त्या दिशेने काही पावले पुढे टाकण्याचा मी प्रयत्नहि केला. नीति, संस्कृति, कला – साहित्य व शिक्षण यांवर मी विशेष भर दिला होता. पण हे कार्य विद्वानांनी सभासम्मेलनाच्या प्रसंगी केवळ शब्दांनी व्यक्त करून होणारे नाही, त्यासाठी भरीव योजना आखून, त्या कार्यान्वित केल्यानेच होणार आहे याची जाणीव झाली पाहिजे व तसे प्रत्यक्ष प्रयत्नहि व्हायला पाहिजेत. माझ्यासारख्या अडाणी व निर्धन व्यक्तीने आणि तेहि कोणाचा कसला आधार, वा कसली साथ नसताना ती जबाबदारी निभविण्याचा, त्या ब्रिटिश अमदानीत प्रयत्न करणे काही सोपे काम नव्हते. परंतु एकदा मनावर घेतल्यावर मागे पाऊल घेणे हेहि मला – माझ्या प्रकृतीला – मानवणारे नव्हते. म्हणून 'सांकृतिक व्यासपीठा'ची कल्पना मी शक्यतेप्रमाणे अमलात आणण्याचा प्रयत्न केला. १९४३–४४ सालच्या 'तरुण भारत' दैनिकात मी दोन लेख लिहिले. 'मराठी वाङमय खेड्यापर्यंत कसे पोचेल ?' हा एक, व 'ग्राम सुधारणा कशी घडविता येईल ?' हा दुसरा. या दोन्ही लेखात सांस्कृतिक व्यासपीठाच्या दृष्टीने विवेचन करून एक सात कलमी योजना मी जाहीर केली होती. या योजनेबाबत त्यावेळी महात्मा गांधीजी यांचेशी चर्चा करण्याचाहि योग आला होता. तसेच डॉ. बाबासाहेब

अनुक्रमणिका

आंबेडकर यांचेशीसुद्धा मी चर्चा केली होती. माझे एक ज्येष्ठ हित-चिंतक श्री. भाऊसाहेब माडखोलकर यांना माझ्या या योजनेची केवळ कल्पनाच आहे असे नाही तर त्यांनी माझे कार्यहि जातीने पाहिले होते व मला उत्तेजनहि दिले होते. आजचे समाजकल्याण मंत्री श्री. बाळासाहेब तिरपुडे हे तर त्या काळी काही वर्षे मला सहकार्य देत होते. १९४८ साली गोंदिया येथील विदर्भ साहित्य संघाच्या अधि-वेशन प्रसंगी, 'मराठी वाङ्मयापासून माझ्या अपेक्षा' या विषयावरील परिसंवादात भाग घेताना मी माझ्या सांस्कृतिक व्यासपीठाच्या कल्पनेचा पुरस्कार केला होता. हे सर्व काही नमूद करण्याचे कारण सांस्कृतिक व्यासपीठाची माझी जुनी कल्पना स्पष्ट व्हावी हे आहे. जुनी या अर्थाने की ती ब्रिटिश सत्तेच्या काळी केली गेली होती आणि नवीन या अर्थाने की ती मध्येच खंडित झाल्यावर, आज या स्वातंत्र्याच्या काळात नवे रूप घेऊन, आजच्या या व्यासपीठावर येत आहे.

पण त्याबरोबर मला एक गोष्ट स्पष्टपणे नमूद केली पाहिजे ती ही की, १५ नोव्हेंबर ५९ रोजी अकोला येथे विदर्भ साहित्य संघाच्या शाखांच्या प्रतिनिधींचे जे संमेलन भरले होते त्याप्रसंगी ख्यातनाम साहित्यिक व तत्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे यांनी 'सांस्कृतिक व्यासपीठा'ची नवीन कल्पना दर्शवून, तिचे मोठ्या कळकळीने व तळमळीने समर्थन केले, ही होय. या कल्पनेसंबंधी मी काही विवेचन करण्यापेक्षा, श्री. देशपांडे यांनी डिसेंबर १९५९ च्या 'युगवाणी'च्या अंकात या सांस्कृतिक व्यासपीठासंबंधी महत्त्वपूर्ण विचार एक स्फुट लिहून व्यक्त केले आहेत तेच येथे संक्षेपाने निर्देशित करतो. ते म्हणतात, "चैतन्यशक्तीचे मंत्र–तंत्र आत्मसात करण्यास एक प्रकारचे वातावरण आवश्यक असते. हे असे वातावरण निर्माण करण्याचे कार्यच आज सर्वश्रेष्ठ महत्त्वाचे झाले आहे. हे वातावरण निर्माण करण्यासाठीच आज भारतात एका नव्या विशाल व स्वतंत्र अशा सांस्कृतिक व्यासपीठाची आवश्यकता आहे. राजकारण, अर्थ-कारण व समाजकारण इत्यादि सर्व कारणावर आपला प्रकाश व

प्रभाव पाडू शकेल असे हे सांस्कृतिक व्यासपीठ असले पाहिजे. हे प्रतिभेचे कार्य असल्यामुळे साहित्य, कला व संस्कृति यांची जोपासना करणाऱ्या सर्व साहित्यिक संस्थांनी असे हे नवे सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्यासाठी आता कंबर कसली पाहिजे. ही केवळ संकटात सापडलेल्या भारताची तात्पुरती गरज नसून ती एक जागतिक आवश्यकता आहे. सर्व देशात अशी नवी सांस्कृतिक व्यासपीठे आकारास आली पाहिजेत. आणि या सर्व देशादेशातील व्यासपीठांच्या सहकार्याने एक जागतिक व्यासपीठ आकारास आले पाहिजे. असे झाले तरच परमाणुस्फोटकांच्या प्रलयकारी महायुद्धापासून व मानवी संस्कृतीच्या सर्वनाशापासून आधुनिक जग आपले संरक्षण करू शकेल."

श्री. बाबासाहेब देशपांडे यांच्या या शब्दांनीच, माझी पूर्वीची कल्पना जमेस धरून, विदर्भ साहित्य संघाच्या या साहित्याच्या व्यासपीठावरून मी अत्यंत आवश्यक असलेले 'सांस्कृतिक व्यासपीठ' निर्माण करण्याचा पुरस्कार मनःपूर्वक करीत आहे. 'सांस्कृतिक व्यासपीठा'चा पुरस्कार करताना माझे संपूर्ण लक्ष खेड्यापाड्यावर केन्द्रित झाले आहे. कारण खेडीच भारताचा 'आत्मा' आहे. या आत्म्याच्या म्हणजेच मानवाच्या मानव्याच्या कल्याणाचा प्रश्न या सांस्कृतिक व्यासपीठाच्या कल्पनेत सामावला आहे. संस्कृति, कला, साहित्य आणि शिक्षण यावर भर देऊन मी या सांस्कृतिक व्यासपीठाद्वारे भारतातील प्रत्येक खेडे न् खेडे विकसित व उन्नत होऊन, केवळ सुशिक्षित, सुसंस्कृत, कलासंपन्न न होता, उदात्त जीवनमूल्ये प्रस्थापित करणारे; नीतिमत्तेने व मानवतेने उदात्त सांस्कृतिक मूल्ये सिद्ध करणारे व आपला प्रदेश आणि पर्यायाने आपला देश बलशाली, वैभवसंपन्न व जगतोद्धारक शक्ति निर्माण करणारे आदर्श बनावे, अशी प्रबळ आशा, अशी प्रबळ सदिच्छा मी व्यक्त करीत आहे. हे सांस्कृतिक व्यासपीठ आकारास आणण्यासाठी विदर्भ साहित्य संघ विदर्भापुरते का होईना अवश्य प्रयत्नशील राहील; आणि त्याचे लोण खेड्यापाड्यापर्यंत पोचेल याची दखलहि घेईल

याबद्दल मला शंका नाही. साहित्यविषयक, सांस्कृतिक व शैक्षणिक संस्थांनी आणि शासनानेहि या सांस्कृतिक व्यासपीठाचा हिरीरीने पुरस्कार करून जनकल्याण. अवश्य साधावे, अशी माझी सर्वांना कळकळीची हाक आहे, विनंती आहे !

सज्जनहो, आतापर्यंत आपण सुहृदांनी माझ्यासारख्या छोट्या खेडुत लेखकाचे अगदी साध्या–माझ्या मराठी मायबोलीत दिले गेलेले साधेच भाषण शांतपणे ऐकून घेऊन मजवर जो जिव्हाळा व्यक्त केला त्याबद्दल मी आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. या सम्मेलनाच्या प्रेमळ स्वागत मंडळाने तर मजवर अनंत उपकार करून ठेवले आहेत. त्यांचा मी कायमचा ऋणी आहे आपणा सर्वांचा आशीर्वाद मागून, पुन्हा एकदा मी एवढाच भाव व्यक्त करीन––

खेड्यापाड्याकडे चिंचोळ्या वाटेने जाणारा मी अगदी सामान्य पांथस्थ ! पण या वाटेवर अत्यंत जिव्हाळ्याने आपण सर्व हितचिंतकांनी मजवर सद्भावपुष्पवृष्टि करून माझे स्वागत केले ! आपणा सर्व हृदयवंतांची व माझ्या ग्रामीण बांधवांची मनोभावे सेवा करण्याचे सामर्थ्य निसर्गदेवता मला प्रदान करो ! जयहिंद !

[हे भाषण विदर्भ साहित्य संघपुरस्कृत शुद्धलेखनाच्या नियमानुसार]

अनुक्रमणिका